# पुनर्मिलन

- श्री रामचंद्र मुळे





# पुनर्मिलन...

दोन हातांचे मिलन.......
दोन मनांचे मिलन......
बंधुभगिनीचे मिलन.......
मातापुत्रांचे मिलन.......

**सारेच पुनर्मिलन !!!**

प्रस्तुत कादंबरी प्रत्यक्षात लिहिली आहे १९५७-५८ च्या दरम्यानच्या काळात. तेव्हा फाळणीचे पडसाद सर्वत्र उमटत होते. त्याच पार्श्वभूमीवर ह्या कादंबरीचे कथानक आधारीत आहे.

**पुनर्मिलन** कादंबरीचे लेखक **श्री. रामचंद्र मुळे** यांनी ही कादंबरी स्वतःच्या खर्चाने प्रकाशित करून त्याची PDF File ई साहित्य प्रतिष्ठानच्या वाचकांना विनामूल्य उपलब्ध करून दिली.

**ई साहित्य प्रतिष्ठान**

**श्री. रामचंद्र मुळे**

यांचे मनःपुर्वक आभार मानते.

बहारदार प्रणयकथा

# पुनर्मिलन

नैतिक बंधनाच्या जाळ्यांत सापडलेल्या
प्रेमवीर तरुणाची बहारदार
आणि हृदयंगम प्रणयकथा

– लेखक –

**श्री. रामचंद्र गंगाधर मुळे**

फोन : ९८२१०९९१८८

ई–मेल : rgmulay@gmail.com

# पुनर्मिलन

**आवृत्ती : दि. १ सप्टेंबर २०२१**

**प्रकाशक**
श्री रामचंद्र गंगाधर मुळे
ई-मेल : rgmulay@gmail.com

**टाईप सेटींग आणि डिझायनिंग**
सौ. नेहा रिसबूड, पुणे

खासगी वितरणासाठी

# – लेखकाचे मनोगत -

पुनर्मिलन...

प्रस्तुत कादंबरी प्रत्यक्षात लिहिली आहे १९५७–५८ च्या दरम्यानच्या काळात. तेव्हा फाळणीचे पडसाद सर्वत्र उमटत होते. त्याच पार्श्वभूमीवर ह्या कादंबरीचे कथानक आधारीत आहे.

ही कादंबरी लिहून झाल्यावर मला वाचकांसाठी प्रसिद्ध करणे शक्य झाले नाही. अर्थार्जन करून घरची जबाबदारी सांभाळणे त्याकाळी मला अत्यंत गरजेचे होते. त्यामुळे हा कादंबरीचा विषय नंतर मागे पडत गेला. बराचसा काळ लोटला. आता निवृत्ती नंतर माझं सहज लक्ष गेलं ह्या कादंबरीच्या हस्तलिखिताकडे. माझ्या मुलीची नणंद श्रीमती नेहा रिसबूड या प्रकाशन क्षेत्रातच कार्यरत आहेत. त्यांच्याशी सहज बोलताना हा विषय निघाला आणि त्यांनी आनंदाने ही जबाबदारी स्वतः कडे घेतली. ही कादंबरी प्रसिद्ध करतांना मी मुळ लिखाणात कांहीच बदल केला नाही. त्यामुळे कथानकाची मांडणी, भाषा आणि शैली जुन्या काळातील वाटेल हे कादंबरी वाचताना वाचकांनी लक्षात घ्यावे.

ही माझी पहिलीच कादंबरी असल्याने मी आवृत्ती वगैरे कांहीं काढणार नाही. कांहीं मोजक्या प्रती छापून झाल्यावर मी ही कादंबरी Online ( soft version ) स्वरूपात वाचकांसाठी ठेवणार आहे.

मला आशा आहे ह्या कादंबरीच्या माझ्या वाचकांना ही कादंबरी आवडेल. कादंबरी वाचून झाल्यावर आपला अभिप्राय माझ्या ई–मेल वर जरूर कळवावा.

**– रामचंद्र मुळे.**

# १.

आकाश ढगाळलं होत. वारा आपल्या थंड स्पर्शानं मानवाला आणि प्राणिमात्राला दूर सारून वेड्यासारखा पळत होता. काही वेळाने पाऊस पडणार यात तिळमात्र शंका वाटत नव्हती. दिनकर दिवसभर दमून आता क्षितिजापलीकडे त्या निळ्या सागरामध्ये बुडी मारणार होता. चौपाटीवर एकंदरीत वादळी वातावरण दिसत होते. लोक नेहमीप्रमाणे वाळूला आश्रय द्यायला आज तयार नव्हते. ते नुसतेच इतःस्ततः भटकत होते. तशातच एक तरुण चौपाटी वरूनच चर्नीरोड स्टेशनकडे लगबगीने जात होता. त्याचा चेहरा उतरलेला आणि अगदी चिंताक्रांत दिसत होता.

तो जेव्हा चर्नी रोड स्टेशनवर आला त्या वेळी गाडी सुटण्याच्या बेतातच होती. चटकन जाऊन त्याने एक फर्स्ट क्लास चा डबा पकडला आणि गाडी सुटलीही. ती वेड्यासारखी धावू लागली. त्या तरुणाचे डोकेही वेड्यासारखेच कुठेतरी अंतराळात भ्रमण करीत होते. आपण कुठे आहोत, कुठे चाललो आहोत, याची तरी त्याला शुद्ध होती की नाही कोण जाणे?

''मंगल नार्वेकर''

दारात उभा राहिलेला तो तरुण वरील शब्दांनी भानावर आला. त्याने मागे वळून पहिले. तो अजूनही

काहीसा गोंधळल्यासारखाच दिसत होता.

‘‘नावाप्रमाणेच मंगल !’’

‘‘मग?’’ समोर बसलेल्या एका तरुणीचे लंपट उद्गार ऐकून त्याने जरा चिडूनच प्रश्न केला, पण त्या तरुणीचे त्याकडे लक्ष होते कुठे?

ती तशीच पुढे म्हणाली, ‘‘बसा ना खाली. उभे का?’’

आताशी तो तरुण कुठे भानावर येऊ लागला होता. ही एक नवीनच तरुणी आहे. हिला आपण कधीही पाहिले नाही. मग ही एवढी आस्थेवाईकपणे का बोलते आहे हे त्याला कळेना. आपले नाव तरी हिला कसे समजले हेही त्याला उमजेना. तो पुन्हा गोंधळला. त्याचा पहिला दुःखी चेहरा अजूनही पूर्ण निवळला नव्हता. त्याची विचार मालिका पुन्हा सुरू झाली.

‘‘मी म्हणते.....’’

‘‘काय म्हणता तुम्ही?’’ त्याने खोचक नजरेने तिच्याकडे पाहत विचारले.

त्याची मनःस्थिती नीट असती तर त्यानेही त्या तरुणीची नीटपणे चौकशी केली असती. मंगलने शुभमंगलचा श्री गणेशा आजच केला असता, पण आज तो पूर्व स्मृतीने अगदी व्याकूळ झाला होता. त्याला आज काहीच सुचत नव्हते. त्याच्या हृदयाची धडधड ऐकू येत होती, म्हणूनच तो जिवंत आहे असे मानण्यास हरकत नव्हती. त्याचे मन मात्र केव्हाच मेले होते. त्या समोर बसलेल्या तरुणीला काय माहिती की, हा तरुण आता मनातून यमपाशाची आराधना करीत असेल म्हणून!

‘‘तुम्ही खाली का बसत नाही?’’

त्या तरुणीने मंगलची पुन्हा एकदा समाधी उतरवली. मंगल आपल्या तंद्रीतच दारातून आत येऊन तिच्या समोरच बाकावर बसला, पण त्याचे लक्ष मात्र खिडकीबाहेरच होते.

‘‘हे पहा......’’ ती तरुणी पुन्हा बोलली.

मंगलने तिच्याकडे एकवार तिरस्कारानेच पाहिले.

‘‘काही तासापूर्वी आनंदाने दुथडी भरून वाहणारं तुमचं मन आता इतकं खिन्न का झालं?’’ तिने विचारले.

‘‘तुम्हाला त्याच्याशी काय कर्तव्य आहे?’’ त्याने रागानेच विचारले आणि

तो पुन्हा बाहेर पाहू लागला.

‘‘पण मला वाटत ...... ’’

‘‘तुम्हाला काय वाटत त्याची मला मुळीच गरज नाही.’’ तो अगदी चिडूनच म्हणाला. स्वतःच्या विचारमालिकेत ही त्याला अडगळ वाटली. त्या तरुणीनेही त्याची मनःस्थिती ओळखून गप्प राहण्याची जणू त्याच्यावर मेहेरबानीच केली. गाडीचा वेग आता कमी कमी झाला होता. गाडी हळू हळू दादर स्टेशनवर उभी राहिली सुद्धा. तो तरुण चटकन खाली उतरला आणि त्याने आपला मार्ग सुधारला. आपल्या तंद्रीतच तो घरी आला. कपडे न काढताच त्याने आपले अंग कॉटवर फेकून दिले. त्याच्या डोक्यात तर आता स्थैर्यामुळे झंझावात सुरू झाला होता. पूर्व स्मृतींनी त्याचा ऊर दाटून आला......

.....आपले कराचीतील सुखी जीवन त्याला आठवले. कराचीतील हिंदू मुसलमानांचा दंगा आठवला. त्या वेळी वडील मुंबईला होते. याच घरात राहात होते. याच बंगल्यात त्यांनी आपल्या इस्टेटीचे वर्धन केले. कराचीत आई, दहा वर्षाची माझी वामनमूर्ती आणि आठ वर्षाची शोभा... आम्ही तिघेजण दंग्यात सापडलो. मुसलमानानी धुमाकूळ घातला. त्या वेळी आई, शोभा आणि माझी चुकामूक झाली आणि मी चुकतमाकत थोड्याश्या तुटपुंज्या माहितीवर वडिलांकडे पोहचविला गेलो. आई आणि शोभा गेल्या त्या गेल्याच. अजून त्यांचा पत्ता नाही. मी बी.ए. पास झालेलं आईला ऐकायचं होतं. मला मिळणारी बक्षिसं आईला बघायची होती. शोभाला आपली वहिनी पाहायची होती; पण.......पण ते सर्व हवेत विरलं. वडीलही स्वर्गवासी झाले आणि त्यांच्या इस्टेटीचा मी मालक झालो. आई नाही, शोभा नाही आणि बाबाही नाहीत. मग काय त्या इस्टेटीला जाळायचं आहे ? कुणाकरिता जगायचं मी आता ? कोण आहे माझं या जगात? कुठे आहे तो निर्दयी यम ? अजूनही तो जागा झाला नाही का ?......

असे एक ना दोन....कितीतरी प्रश्न त्याला भेडसावीत होते, पण इतक्यात शेजारच्या उषाने घरात प्रवेश केला आणि रडक्या आवाजातच ती म्हणाली, ‘‘कधी नेणार सिनेमाला आम्हाला ? लबाड कुठला ! आम्हाला फसवतो. मी आता आईलाच जाऊन सांगते की, दादा मला सिनेमाला नेत नाही म्हणून!’’

मंगलची विचारशृंखला तुटली. त्याने त्या रडक्या उषाकडे पाहिले. त्याचा ऊर पुन्हा भरून आला. अशीच होती आपली शोभा. अशीच हट्ट करायची....

तो चटकन उठला. त्याने तिला उचलून घेतले आणि पटापट तिचे दोनतीन पापे घेऊन तिची समजूत घातली. त्याने घड्याळाशी विचारपूस केली. साडेआठ वाजले होते. तो तिला घेऊन सिनेमाला जायला निघाला. तिच्या आईला जाऊन सांगितले. रात्रीची वेळ आणि उषाला चालवणार नाही म्हणून त्याने टॅक्सी केली. आणि तो प्लाझाला आला. सिनेमाचं नाव होतं 'प्यारकी दुनिया'. उषाला रात्र झाल्यामुळे लवकरच झोप लागली. तिचा हट्ट नुसत्या थिएटरवर आल्यानेच भागला होता. मंगलचे मन मात्र विचलित होऊ लागले. प्रेम ही अशी एक चीज आहे की, त्या पुढे प्रत्यक्ष देव प्रसन्न होऊन समोर उभा राहिला तरी ते तुच्छ आहे. त्या दोन जीवांच्या प्रेमामुळे त्या दोघांना आपल्या मात्यापित्यांना मुकावे लागते. मातापित्यांना मुकावे लागले तरी हरकत नाही, पण प्रेम ही एक संजीवनी आहे आणि ते अमर आहे. अशा ठळक प्रसंगांनी त्याचे चित्त थरारले. त्याला रेल्वेतील प्रसंग आठवला. त्या तरुणीला आपण अगदी झिडकारून लावले. आपल्याशी किती आस्थेवाईकपणे वागत होती ती ! पण मला त्या वेळी प्रेम म्हणजे काय याचा विसर पडला होता. किती सुंदर होती ती तरुणी ! ......

असाच काहीतरी विचार करीत तो उठला. खेळ अजून संपायचा होता. उषाला घेऊन भारावलेल्या मनानेच तो घरी आला. उषाची आई वगैरे निजले होते. त्याने उषाला घरातच निजवले आणि तोही बिछान्यावर पडला. त्याच्या मनात पुन्हा पुन्हा तेच विचार येऊ लागले.....

.....किती सुंदर होती ती तरुणी ! तिचे ते काळे डोळे सुरम्यामुळे नजरेचा अधिकच वेध घेणारे दिसत होते. तिचे ते काळे कुळकुळीत लांबसडक केस, तिचे चाफेकळीसारखे नीटस नाक, कुंदकळ्यांसारखे दात, ते गुलाबी गाल, गौरकाया आणि मुसमुसलेले तारुण्य पाहिलं की, कोणताही तरुण सकाळी मी केला तसा गाढवपणा करणार नाही. उगीचच आपण तिला झिडकारलं. ती स्वतःहून आपल्याशी बोलत होती. मग आपणच तिला का टाळावं ? तिच्यात काय व्यंग होतं म्हणून आपण तसा मूर्खपणा केला ? फिरून भेटेल का ती ? भेटली, तर मी तिची क्षमा

मागेन. आता भेटली, तर तिचा मी मुळीच अव्हेर करणार नाही. माझ्या जीवनात ती संगीत फुलवेल. माझं नीरस जीवन ती सरस करेल. बस्स ! तिच्याच करिता आपण जगायचं ! फक्त तिच्याचकरिता....... तिच्याचकरिता.... हो ! पण नाव काय तिचे ? तेही आपण विचारले नाही. उद्या भेटली तर सगळे विचारू ! ...... अन.....

असेच विचार करीत मंगल झोपी गेला.

सकाळी उठून मंगलने आपले सर्व प्रातर्विधी आटोपले. आज आपली दाढी त्याने दोनदा केली. नेहमी पायजम्यावर हिंडणाऱ्या मंगलने आज वुलनचा सूट चढविला होता. गेल्या पाच वर्षात मुळीच स्पर्श न केलेला नेकटाय त्याने आज नकळतच हाताळला. नेहमी खादीची टोपी घालून देशभक्तीचे सोंग करणाऱ्या मंगलने आज वासाचे तेल लावून केसांचे आणि कंगव्याचे मिलन केले होते. नेहमीचे जाकीट जाऊन त्याची जागा वुलनच्या कोटाने घेतली होती. रुमालावर नकळत सेंट्स टाकले गेले. आज त्याच्यात मनस्वी फरक झाला होता. त्याच्यात नवचैतन्य रसरसू लागले होते. त्याचा चेहराही आज इतका आनंदी होता की, आज पाहणाऱ्याला स्वप्नातसुद्धा वाटणार नाही की, काल हाच तरुण यमपाशाची आराधना करीत असेल. काहीही असले तरी उगवलेला दिवस तो शुभ मानीत होता.

अगदी व्यवस्थित पोशाख करून एकवार कपाटाच्या मोठ्या आरशात आपली छबी त्याने न्याहाळून पाहिली. तासाची नोट्स बुके घेतली आणि एक समाधानाचा सुस्कारा सोडून त्याने दाराला कुलूप घातले. पॉलिशमुळे तकतकीत दिसणाऱ्या बुटाचा एक एक पाय आतुरतेने टाकीत त्याने काणे यांचे भोजनगृह गाठले. पायऱ्या चढता चढताच त्याने रिस्टवॉच वरून नजर फिरविली आणि आपले जेवण त्याने भराभर आटोपले. आज वसंतरावांकडे जाऊन जेवण्याचे त्याने मुद्दामच टाळले होते आणि संध्याकाळी काहीतरी थाप ठोकून वेळ मारून नेण्याची तयारी ठेवली होती, कारण अशा थाटात तिथे गेलों तर नक्की थट्टा मस्करी, गौप्यस्फोट होणारच हे त्याला माहीत होते. दररोजच्या गाडीला पाच मिनिटे बाकी होती.

त्यांनी झपझप पावले टाकून स्टेशन गाठले. तोच गाडी आलीही. त्याने आजूबाजूला बघितले. गाडीचे डबे चोरट्या नजरेने न्याहाळण्यास सुरुवात केली, पण त्याचा हेतू सफल होण्यास फारसा त्रास पडला नाही. एका फर्स्टक्लास च्या दाराशीच ती तरुणी उभी होती. बहुधा तीही मंगललाच हुडकीत असावी. मंगलनेही ते हेरले. इतक्यात गाडी हलली. मंगलने पळत जाऊन तो ठरावीकच डबा गाठला......

तो तरुण आपल्या डब्याकडेच येत आहे हे पाहून ती बाकावर जाऊन अगदी शांत आणि गंभीर चेहरा करून बसली. मंगल डब्यात चढला आणि तिच्यासमोरच सीटवर जाऊन बसला. त्याने थोडा वेळ वाट पाहिली, पण ती काहीच बोलली नाही. तरीपण ती आपल्याकडे चोरट्या नजरेने बघत आहे हे मंगलच्या दृष्टिपथातून सुटले नाही. थोड्या वेळाने मंगलनेच बोलायला सुरुवात केली.

‘‘का....रागावलात वाटत?’’

‘‘रागवायला काय झालं? आम्ही नसतो रागवत कुणावर.’’ तिने मिस्कील हास्य करीत उत्तर दिले.

‘‘मग बोलला का नाहीत इतका वेळ? कालच्या माझ्या बोलण्याचा राग आला असेल नक्की आपणाला, पण नाईलाज होता माझा. माझी मनःस्थितीच बरोबर नव्हती काल. सॉरी.’’

‘‘हो ...हो... बराच फार्स चाललंय की, आणि काल आपणच सांगत होता ना आपल्या भाषणात की, मानवी मनाच्या सुखदुःखाचे उन्हाळे पावसाळे क्षणाक्षणाला बदलत असतात. काल आपण त्याचंच प्रात्यक्षिक केलंत मला वाटत ! बाकी एकंदरीत आपलं भाषण फार सुंदर झालं ! आजकालचे तरुण आणि तरुणी... विषयही फार सुंदर होता. उगीच नाही फर्स्ट प्राईझ मिळालं! दोन मनांच्या मिलनाने प्रौढांची मने उगीच दुखावली जातात.... तरुण नि तरुणी यांची मन जर एकाच वेळी एकमेकांकडे आकर्षिली गेली, तर तेथे निर्माण होणारं प्रेम अमर असतं ! किती सुंदर सत्य आपण शोधून काढलंत ! पण तरुण पिढीची मनं मारायला हे प्रौढ टपलेले असतात. असंही आपण सांगितलंत. सौंदर्य प्रसाधनाने सौंदर्य वाढते म्हणून निसर्ग कां पायाखाली तुडवायचा ?... एक एक वाक्य किती मोलाचं होतं आपलं ! ...’’

ती बोलतच होती. मंगल स्तुतीसुमनांनी अगदी भारावून गेला होता. नुसत्या हुंकाराशिवाय आणि स्मितहास्याशिवाय तो काहीच करू शकत नव्हता.

ती पुढे म्हणाली, ''मला फार फार आवडलं आपलं भाषण!''

''मग?'' मंगल सहजच पुढे म्हणून गेला, पण त्याकडे तिचे लक्ष होते कुठे? ती आणखीही पुढे म्हणाली, Congratulations !''

''Thank You. पण आपलं नाव काय ?'' मंगलने स्पष्टच विचारले.

''अस्मत''

''ओ हो .... आपण मुस्लिम तर?'' त्याने हसत हसत विचारले.

''मग काय झालं त्यात?'' तिने एकदम चिडून विचारले.

''झालं नाही काही पण.....'' तो गंभीर झाला होता.

''पण काय ?'' तिने उत्सुकतेने विचारलं!

''पण नावावरून धर्म ओळखू शकलो की नाही मी?'' मंगलने वेळ मारून नेली.

''त्यात काय मोठंसं?'' समाधानाचा सुस्कारा टाकीत अस्मत म्हणाली.

''बरं ते असू द्या. कुठे राहता आपण?'' गाडी अगदी रुळावर आणण्याच्या विचाराने त्याने पहिला प्रश्न विचारला.

''माटुंग्याला असते मी !''

''विल्सनलाच आहात वाटतं?''

''हो. ज्युनिअर बी.ए.ला आहे या वर्षी.'' पुढच्या प्रश्नाचा रोख साधूनच तिने उत्तर दिले.

''असं का? फारच मजल मारली आहे की मग !''

''नाही. तुमच्यापेक्षा एक वर्ष मागेच आहे.....''

बोलता बोलता केव्हा ग्रांट रोड स्टेशन आलं ते कळलंही नाही. ग्रॅन्ट रोडला गाडी उभी राहिली. तेव्हा ते दोघे भानावर आले आणि खाली उतरून कॉलेजचा रस्ता त्यांनी धरला. रस्त्यात दोघेही एकमेकांशी विशेष कांहीच बोलले नाहीत. एकमेकांकडे मात्र चोरून बघण्याचा कार्यक्रम कॉलेजच्या आवारापर्यंत चालूच होता...

आज पहिले लेक्चर मराठीचे होते. प्रोफेसर वर्गात आले आणि हसत हसतच त्यांनी आजच्या चर्चेचा विषय सांगितला, 'चित्रपट तारक की मारक'!

कॉलेजकुमारांना आज फार हायसे वाटले. ते आनंदाने फुलून गेले. आपणाला ज्ञात असलेल्या एखाद्या चित्रपटाविषयी प्रोफेसर बोलू लागले, की आपणाला तो पूर्वीच माहीत असल्याने पुनःप्रत्ययाचा एक विशेष आनंद होत होता. विद्यार्थी असो वा विद्यार्थिनी असो, सर्व जण आजचे लेक्चर विशेष कान देऊन ऐकत होते. त्याला अपवाद मात्र एकच होता......

अस्मत !

तिचे लक्ष आज कशातच लागत नव्हते. तिचे मन कुठेतरी कल्पनेच्या अंतराळात भ्रमण करीत होते. आज ती कसलेतरी सुंदर स्वप्न रंगवीत होती. ती स्वःताचे व्यक्तित्व क्षणमात्र विसरली होती. चौपाटीवर, मलबार हिल वर फिरणारी प्रेमी लैला मजनू तिच्या डोळ्यापुढे तरळू लागली....

संध्याकाळची वेळ असेल आणि मंगलबरोबर मी अशीच फिरायला गेले असेन. सूर्य मावळून गेल्यावर थोड्याच वेळात पिठासारखे स्वच्छ चांदणे पडले असेल. मलबार हिलवर कमला नेहरू पार्कमध्ये मंगल आणि मी हिरवळीवर बसलो असू. मंगल माझ्याशी मधून मधून नेत्रपल्लवी करेल. मग माझा हात तो हातात घेईल. मी त्याच्याकडे एका मादक नजरेने पाहीन. अन ......

तिचे दिवास्वप्न असेच चालू होते. दुसरे प्रोफेसर केव्हा आले हे देखील तिला कळले नाही. दुसरा.. तिसरा... चौथा... सर्व तास संपून गेले. प्रोफेसर येऊन बडबडत आणि निघून जात. अस्मतला त्याची मुळीच क्षिती वाटत नव्हती. नेहमी प्रत्येक प्रोफेसरचे लेक्चर लक्षपूर्वक ऐकून, ऐकता ऐकता टाचण काढणारी अस्मत! आज तिचे लक्ष वर्गात होते कुठे? तिला जिकडे तिकडे मंगल दिसत होता......

कॉलेजची शेवटची घंटा झाली आणि कॉलेज सुटले. कॉलेजसमोरचा रस्ता गजबजून गेला. एवढ्या गर्दीतून नेत्रबाण सुटत होते. कित्येक शरण येत होते. एकमेकांच्या हृदयाला मार लागत होता. अस्मत त्याला अपवाद ठरली नसती, पण ती आपल्या व्यक्तीला शोधीत होती. कॉलेजच्या आवाराबाहेर येऊन ती मागेपुढे बाजूला नजर रोखून पाहू लागली, पण पंधरावीस मिनिटे वाट पाहूनही तिच्या पदरी शेवटी निराशेचे माप पडले. ती भारावलेल्या अंतःकरणाने जड पावले टाकीत स्टेशनवर आली.

गाडी आली. अस्मत गंभीर चेहऱ्यानेच आणि जड अंतःकरणानेच गाडीत चढली. गाडी सुटण्याची वेळ झाली. तिची पूर्ण निराशा झाली. तिने आपली सडपातळ देहयष्टी बाकावर झोकून दिली.

गाडी स्टेशनबाहेर पडू लागली. इतक्यात एक तरुण धावत धावत जाऊन गाडी धरण्याचा प्रयत्न करीत होता. नव्या जपानी गाडीने चटकन गती धारण केली. डब्याची दांडी धरून फुटबोर्डवर पाय ठेवण्याचा प्रयत्न करणार इतक्यात त्याचा पाय घसरला आणि तो जोराने खाली फेकला गेला. एक आर्त किंकाळी आली. गाडी थांबली. त्या तरुणाभोवती लोकांचा गराडा पडला. काय झालं.... काय झालं.... करीत लोकांची गर्दी वाढतच होती. त्या तरुणाची स्थिती मात्र फारच शोचनीय झाली होती. त्याच्या उजव्या कुशीला जोरात मार लागलेला होता. दंडातून रक्तस्राव होत होता. कपाळावरही खोक पडलेली होती. तो बेशुद्ध पडलेला होता.....

अस्मतही काय झालं? या उत्सुकतेने खाली उतरली आणि त्या गर्दीतून वाट काढीत ती पुढे आली. त्या तरुणाकडे तिने पहिले मात्र.... ती एकदम किंचाळलीच!

ती त्या तरुणाजवळ गेली. त्याच्या कपाळातून निघणारे रक्त स्वतःच्या पदराने पुशीत ती आक्रोश करू लागली. त्याच्या अस्ताव्यस्त पडलेल्या देहाकडे पाहत ती अगदीच हतबुद्ध आणि मंत्रमुग्ध झाली होती. तिला काहीच सुचेना! आता पर्यंत पोलिसांनी गर्दी बाजूला हटवली होती आणि त्याला हॉस्पिटलमध्ये नेण्यासाठी लोक स्ट्रेचर घेऊन आले होते. पंचनामा वगैरे करून मंगलला स्ट्रेचरवर घालून हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. त्याचबरोबर अस्मतही गेली. तेथे नेल्यावर त्याची प्राथमिक तपासणी करण्यात आली. नाडी वगैरे सर्व काही सुरळीत चालू होते.

''केस काही विशेष सिरीयस नाही.'' मंगलला तपासता तपासता डॉक्टर म्हणाले. अस्मतला ते शब्द ऐकून जो आनंद झाला त्याला खरोखरीच सीमा नव्हती. त्याच्यावर प्राथमिक स्वरूपाचे उपचार केल्यावर तो शुद्धीवर आला. त्याच्या जखमा धुऊन त्याला बँडेज केल्यावर स्पेशल वार्डमध्ये नेऊन ठेवण्यात आले. तेथे नेल्यावरही त्याला विशेष बरे असे कांहीच वाटले नाही. तो फक्त मगाच्यापेक्षा आता शुद्धीवर आला होता एवढेच काय ते ! त्याच्या उजव्या कुशीतून सारख्या कळा निघत होत्या. डोकं भणाणून गेलं होत. पाय तुटून पडलेत

की काय असंच वाटत होतं त्याला. डॉक्टरने दिलेले औषध त्याने कसेतरी घेतले. आणि तो बिछान्यावर पडला. आतापर्यंत तिला स्पेशल वार्ड मध्ये जाण्यास डॉक्टरांनी मज्जाव केला होता. औषध देऊन डॉक्टर बाहेर आल्यावर तिने अधीरतेने विचारले, ‘‘जाऊ का मी आत ?’’

‘‘जा. पण हे पाहा त्यांना कुशीवर वळू देऊ नका आणि उठूही देऊ नका.’’ असे म्हणून डॉक्टर निघून गेले ते हसत हसतच.

डॉक्टरांचे शेवटचे शब्द ऐकायला अस्मत तेथे होतीच कुठे? तिने अस्पष्टपणे जाता जाता ऐकले होते. जा म्हणताच क्षणी ती तेथून हलली होती. एवढी अधीरता पाहूनच डॉक्टरांना हसू आले होते. ती आत आली. कॉटजवळ जाऊन खाली मान घालून ती उभी राहिली आणि तिने हळूवारपणे हाक मारली,

‘‘मंगलऽऽ’’

मंगलने वर पहिले. तिच्याकडे पाहताक्षणीच तो एकदम गोंधळला.

‘‘अस्मत !’’

असे म्हणून तो उठायच्या तयारीत होता, पण अस्मतने डॉक्टरांचे शब्द अस्पष्टसे ऐकले होते; म्हणून तिने त्याला उठू दिले नाही. त्याला तसेच झोपवीत ती त्याच्या उशाशी बसली आणि त्याच्या डोक्यावरून हात फिरवीत ती रडू लागली. तिचा हात हातात घेऊन मंगलही रडू लागला. गरम गरम प्रेमाश्रूंचे थेंब मंगलच्या गालावर पडत होते. त्याची परतफेड म्हणून की काय मंगलचे अश्रू अस्मतच्या हातावर ओघळत होते. अस्मत लवकरच भानावर आली. आपले अश्रू तिने आवरले. मंगल जर रडत राहिला, तर त्याला फार त्रास होईल हे तिच्या लवकरच लक्षात आले.

‘‘त्रास होतो का फार ?’’ तिने विचारले.

‘‘अस्मत !’’ अधिकच हुंदका देत मंगल उच्चारला.

‘‘काय म्हणता ?’’

‘‘काय सांगू ?’’

‘‘मार फार बसलाय का ?’’

‘‘विशेष काही नाही, पण कुशीतच फार ठणकतंय !’’

''चोळू का मग ?''

''नको. तुम्हाला कशाला त्रास ?''

''हं.....त्रास काय त्याच्यात ?'' असे म्हणून ती त्याच्या बरगड्यावरून हात फिरवू लागली, पण कोरडा हात बरगड्यावरून फिरू लागल्यामुळे कातडीची आग होऊ लागली, म्हणून मंगल तिला म्हणाला,

''नका तुम्ही त्रास घेऊ ! वाटेल बरं मला आता !''

अस्मत मंगलकडे नुसती पाहू लागली.

''तुम्ही अजून घरी नाही का गेलात ?''

''नाही''

''मग घरी आई काय म्हणेल ?''

''काय म्हणेल ?''

''इतका वेळ कुठे होता म्हटल्यावर काय सांगाल तुम्ही ?''

''काहीही सांगेन.''

''तुम्ही सांगितलेलं आईला खोटं वाटलं तर ?''

''खरं सांगेन.''

''मग आई तुम्हाला बोलायची नाही ?''

''बोलली तर बोलली. घावाविना देवपण नाही.''

''किती सुंदर बोलता तुम्ही.''

''अॅ..हां....फारच सुंदर.....'' ती वेडावणीच्या सुरात म्हणाली. मंगल हसू लागला. अस्मतला किती सुंदर वाटले ते हसणे ! तिनेही गालातल्या गालात एक स्मितहास्य केले.

''तुम्ही जा आता घरी.'' तो म्हणाला.

''पुन्हा कधी येऊ ?''

''उद्या कॉलेजला जाताना....''

''ठीक आहे.'' असे म्हणून अस्मत निघाली. दारापर्यंत गेल्यावर तिने पुन्हा मागे वळून पाहिले. पट्ट्या बांधल्यामुळे भकास दिसणारा त्याचा चेहरा तिला आता फारच विद्रुप वाटला. तिला पुन्हा भडभडून आले. ती एकदम मागे वळून

कॉटच्या दांडीवर डोके ठेवून रडू लागली. तिला ते मुळीच सहन होईना. मंगलने तिच्या केसावरून हात फिरवीत तिला समजावणीचे दोन शब्द सांगितले. तिची समजूत घातली व घरी बोलणी बसतील म्हणून लवकर घरी जाण्यास सांगितले. आपले डोळे पुसून घट्ट मन करून ती घरी जाण्यास निघाली. कॉटवरून उठून ती पाठमोरी झाली. तोच मंगलला तिच्या मागच्या पदराला लागलेलं रक्त दिसलं. त्याने एकदम तिला हाक मारली.

''अस्मत ! पदराला ते रक्त कसले लागले ?''

आतापर्यंत तिला पदराने रक्त पुसल्यामुळे पदराला रक्त लागलेले आहे याचा विसरच पडला होता. तिने एकदम मागचा पदर पाहिला आणि काहीतरी आठवल्यासारखे करून ती म्हणू लागली,

''स्टेशनवर तुमचं कपाळ पुसलं या पदरानं, तेव्हा लागलं असावं रक्त !''

''तुम्ही रक्त पदरानी पुसलंत ?'' त्याने आश्चर्याने विचारले.

''मग काय झालं ?''

''झालं काही नाही, पण....''

''पण काय ? मी आता घरी कशी जाणार हेच ना ?''

''हो !.....''

''मी अशीच पदर खोचून जाईन.''

''कोणी पाहिलं तर ?''

''पाहिलं तर पाहिलं ! मी काय कुणाला मारलं तर नाही ना ?''

''मारलंत तर !''

''कुणाला ?'' तिने आश्चर्याने विचारले.

''मला.... तुमच्या प्रेमानं.....!''

चकित होऊन धुंद नेत्रांनी तिने एकवार मंगलकडे पाहिलं आणि ती रूमच्या बाहेर पडली. बाहेर जाईपर्यंत मंगल तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत होता. ती बाहेर गेल्यावर तो स्वतःशीच पुटपुटला.

अस्मत ! बिचारी किती जीव ओढते आहे ? पदराने रक्त पुसलं. माझ्यापुढे तिला पदराची काहीच किंमत वाटली नाही. रक्त पुसताना बाजूला असलेल्या

लोकांची लाज वाटली नाही. खऱ्या प्रेमाला मोल नसतं हेच खरं! अस्मत, केव्हा येईल पुन्हा ? आपण तिला सकाळी यायला सांगितलं आहे. त्याच्या आधी यायला सांगितलं असतं तर ? पण ती स्वतंत्र आहे ? घरची माणसं तिला काय म्हणतील ? त्यांना जर कळलं की, ती एका हिंदू तरुणावर प्रेम करते आहे, तर त्यांचं पित्त खवळेल. ते अस्मतला मारण्याचा प्रयत्न करतील ! आणि.... छे.... नकोच ती कल्पना !..... अस्मत, तू माझीच केव्हा होशील ?...आपल्या प्रेमाचे साफल्य केव्हा होईल ? की हे नुसते प्रेमचं राहील ? छे... ते शक्य नाही..... प्रत्येक घटनेला फळ हे असतेच. आपल्या प्रेमालाही कधी काळी मोहोराचा बहर येईल आणि फळे लटकतील! पण.....? पण.... ? विराट वादळानं ती फळं इतस्ततः फेकली गेली तर ?..... दूर उडाली तर !....

त्याचे मन खिन्न झाले. तो बेचैन झाला. त्याच्या मनात निराशेचे वादळ निर्माण झाले. प्रत्येक घटनेला असलेल्या दोन बाजू पाहण्याची त्याची वृत्ती इथेही बळावली. सत्याबरोबर असत्याचा, सफलतेबरोबर निष्फळतेचा, सुंदरतेबरोबर कुरुपतेचा, चांगल्याबरोबर वाईटाचा विचार करण्याची त्याची नेहमीची चंचल वृत्ती आज स्थिर कशी राहील? त्याला प्रेमाच्या सफलते बरोबरच प्रेमभंग झाला तर! हाही विचार भेडसावू लागला. प्रौढ आणि म्हातारी माणसे नादान आणि भेकड रुढीला उराशी बाळगून आपल्या प्रेमाला दगा देतील असे त्याला वाटले. आणि असेच त्याचे कांही विचार चालू असताना एक परिचारिका आणि हेडनर्स तेथे आल्या. त्यांनी त्याची पृच्छा करण्यास सुरुवात केली.

''मि. नार्वेकर कसं वाटतंय आता आपणाला ?''

''बरं आहे साधारण.'' भानावर येत मंगलने चाचरतच उत्तर दिले.

''कुशीत दुखतंय का अजून ?''

''हो कळा निघतात मधून मधून.''

''मग.... चोळायला सांगू का ?''

''सांगा.'' मंगलने न कळतच होकार दिला.

परिचारिकेला कूस चोळण्यास सांगून हेडनर्स निघून गेली. ती परिचारिका स्पिरिट आणि दुसरे कसले तरी औषध हातावर घेऊन कूस चोळू लागली, पण

मंगलला ते बरे वाटेना. ज्या वेळी अस्मतने कोरड्या हातांनी कूस चोळली होती त्या वेळी कातडीची आग होऊ लागली होती, पण आताचे चोळणे त्याला असह्य होऊ लागले. अस्मतचे चोळणे त्याला या चोळण्यापेक्षा कितीतरी बरे वाटले. त्याला आताचे चोळणे नकोसे झाले. दोन हात फिरविल्याबरोबर त्याने तिला पुरे म्हणून सांगून परत पाठवून दिले. आणि पुन्हा तळमळत तो बिछान्यावर पडला.

*****

# २.

अस्मत ग्रांट रोड स्टेशनवर आली तेव्हा गाडी स्टेशनमधून सुटण्याच्या तयारीतच होती. ती गाडी जणू अस्मत करीताच थांबली होती. तिने धावत जाऊन गाडी पकडली. अस्मत गाडीत बसली न् बसली तोच गाडी सुटलीही. तिला सर्व डबा नुसता खायला उठला होता. सबंध डब्यामध्ये ती एकटीच होती. तिला मागच्या प्रसंगाची भीती वाटू लागली. जरा मोकळे वाटावे म्हणून ती दारात उभी राहिली. तिला मंगलची सारखी काळजी वाटू लागली. त्याच्याबद्दल ती विचार करू लागली, पण तिची भीती मोडेना. तिला काही सुचेना. उगीचच तिने एकदा आरशात जाऊन पहिले. एकदा गंभीर चेहरा करीत मध्ये उगीचच एकदा हसली. पुन्हा आपल्या जागेवर जाऊन बसली. पुन्हा एक दोनदा तिने खिडकीतून बाहेर डोकावून पहिले. पुन्हा एकदा दारात जाऊन उभी राहिली. दुरून पाहणाऱ्याला 'तिला वेड तर लागले नाही ना?'....अशी अस्पष्ट शंका आली असती......

लवकरच माटुंगा स्टेशन आले आणि अस्मतचे वेडे चाळे थांबले. तिने आपला पदर पुन्हा एकदा सारखा केला. कपाळावर उतरलेले केस मागे सारले. आणि हातातली पर्स हलवीत ती स्टेशनच्या बाहेर पडली. ती घाईघाईनेच घरच्या मार्गाला लागली. साडेनऊ वाजून गेले होते. घरी गेल्यावर पहिला प्रश्न आपल्याला कोणता

विचारला जाणार याची नक्की खूणगाठ तिने आपल्या मनाशी बांधली. जवळ जवळ धावतच ती घरी आली. तिचा श्वास जोरात चालू होता. तिच्या हृदयाची धडधडही काही कमी जोरात चालू नव्हती. घरात आल्याबरोबर तिच्या आईने तिला ठरलेलाच पहिला प्रश्न विचारला.

''का गं इतका वेळ केलास आज?''

''थोडं काम होतं.''

''कसलं काम ?''

''आज पार्टी होती मैत्रिणीकडे.'' तिने ठरलेल्या संकेताप्रमाणेच उत्तर दिले.

''कशाबद्दल गं ?'' आईने सहज पृच्छा केली.

''आज वाढदिवस होता तिचा !'' अस्मतने आणखी एक थाप पचवली.

''ठीक. जेवणार ना आता?''

''खाईन थोडसं तुझ्याबरोबर!''

आईलाही जरा बरे वाटले. तिने दोन ताटे वाढून घेतली आणि अस्मतला हाक मारली. तिनेही हातपाय धुऊन जेवणाची तयारी केलीच होती. ती ताटावर येऊन बसली. इकडच्या तिकडच्या गप्पा मारून जेवण चालले होते.

''काय होत पार्टीला आज ?'' आईने विचारले.

जिलेबी आणि कॉफी!

''ठीक. मी आपली घरी वाट पाहात बसले. काळजी लागली मला, कारण संध्याकाळी अपघात झाला असं ऐकलं होतं. तुला कांही धक्का बसला असेल का म्हणून माझ्या मनात नसत्या शंकाकुशंका येऊ लागल्या.''

''कधी अपघात झाला ? मला काहीच कसं माहीत नाही ?'' अस्मतने जणू काहीच माहीत नाही अशा अविर्भावात विचारले.

''तुला कसे माहीत असणार ? तू पार्टीमध्ये रंगलेली. एक तरुण म्हणे गाडीतून पाय घसरून पडला ग्रान्ट रोड जवळ !

''अस्सं !'' अस्मत कांहीशी गंभीर होऊन म्हणाली.

त्यानंतर थोडा वेळ कुणीच कांही बोलले नाही. नंतर आईनेच विचारले, ''काय वाढू बाळ ?'' अस्मतने मानेनेच नकार दिला.

‘‘घे ना थोडी रोटी. पार्टी झाली म्हणून काय झालं!’’

‘‘नको. मला आता मुळीच भूक नाही.’’

‘‘अगदी थोडी घे ना !’’

‘‘नको. अगदी थोडीसुद्धा नको... पण आई मी आता पुन्हा मैत्रिणीकडे जाऊ का ? तिच्याकडे आता गायनाचा कार्यक्रम आहे. चांगल्यापैकी गायिका येणार आहे. नाव विसरले मी तिचे.’’

‘‘नको जाऊ अस्मत आता. रात्रीच्या वेळी एकटी कुठे जातेस !’’

‘‘जाते ना आई. मला गाणी फार आवडतात माहीत आहे ना तुला.’’ ती अगदी काकुळतीला येऊन म्हणाली.

‘‘बरं जा, पण पुन्हा केव्हा येणार ? उद्या कॉलेज आहे.’’

‘‘सकाळीच येईन मी.’’

‘‘बरं !’’

अस्मतने भरभर जेवण उरकले आणि हात धुण्याकरिता ती मोरीकडे वळली. तोच तिच्या पदराला लागलेले तांबडे डाग आईला दिसले. तिने लगेच अस्मतला विचारले, ‘‘काय गं हे ? पदरावर डाग कसले पडलेत ?’’

आता मात्र अस्मत चांगलीच घाबरली, पण तिने तसे मात्र मुळीच दाखविले नाही. पदर हातात घेऊन कसले डाग पडले आहेत याचा जणू विचार करीत तिने उत्तर दिले, ‘‘हं बरोबर. मैत्रिणीकडे तिच्या धाकट्या भावाने एका खुर्चीवर तांबडी शाई सांडली होती. त्याचेच हे डाग पडले असावेत.’’

आईचे त्या उत्तराने समाधान झाल्याचे अस्मतला तेव्हाच कळले.

आईने सांगितले, तेच पातळ नेसून नको जाऊस हं ! ती गुलाबी वायल नेसून जा. वाटल्यास नाहीतर दुसरे एखादे.....

अस्मतनेही होकार देऊन एकवार घड्याळावरून नजर फिरविली. साडेदहा वाजून गेले होते. दहा पंचावन्नला शेवटची लोकल होती. तिने सर्व कसे अगदी झटपट आवरले आणि सँडल्स घालतच तिने आईचा निरोप घेतला. ती भराभर स्टेशनच्या आवारात शिरली. पुन्हा एकदा आपल्या मनगटी घड्याळावरून नजर फिरवली. दहा पन्नास झाले होते. अजून पांच मिनिटं अवकाश होता. ती एका

बाकड्यावर बसली. एखादे वेळी गाडी उशिरा येत नाही म्हणून कॉलेजला जाताना म्हणणारी अस्मत आज म्हणत होती, 'अशा घाईच्या वेळी गाडी पांच मिनिटं लवकर आली असती तर....'

अशीच पांच मिनिटं निघून गेली आणि गाडीही आली. आज काहीशा घाईनेच तिने डब्यात प्रवेश केला. त्या डब्यात आणखी एक स्त्री होती. तिलाही जरा सोबत मिळाली म्हणून बरे वाटले. तिने अस्मतला दोन तीन प्रश्न विचारण्याचा प्रयत्न केला पण किरकोळ आणि त्रोटक उत्तराखेरीज त्या स्त्रीला जास्त काहीच मिळाले नाही. अस्मत आपल्याच तंद्रीत होती. त्यामुळे तिला बोलकी करण्याचे काम सामान्य नव्हते. ती स्त्री ही कंटाळून गप्प बसली. असाच अर्धा तास निघून गेला आणि ग्रॅन्ट रोड स्टेशन आलं सुद्धा! अस्मत चटकन खाली उतरली आणि स्टेशनबाहेर पडून हॉस्पिटलचा रस्ता धरला. हॉस्पिटलमध्ये येताच लिफ्टने ती चौथ्या मजल्यावर गेली. बत्तीस नंबरची रूम तिने क्षणातच गाठली. डॉक्टर त्या वेळी राउंडवरच होते. मंगलच्या खोलीतून डॉक्टर आणि हेडनर्स नुकतेच बाहेर येत होते. अस्मतला पहाताच डॉक्टर म्हणाले,

''आलात ?''

''हो. जाऊ ना आत ?''

''जा ना.''

Thank You ! असे म्हणतच ती आत गेली. मंगल जागाच होता. तिला पाहताच त्याने तिला संथ, पण आतुरतेच्या भावनेनी हाक मारली. तिने ताबडतोब मंगलजवळ जाऊन त्याच्या डोक्यावर हात ठेवीत विचारले, ''कस वाटतंय आता?''

''पुष्कळ बरं वाटतंय ! तुम्हाला पाहिलं आणि मी आजारी आहे हेच विसरलो.''

''अस्सं! म्हणजे मी रात्रभर आणि दिवसभर येथेच बसू म्हणता की काय ?''

''तसं मी कुठे म्हटलंय ?''

''तसं स्पष्ट म्हणावं लागत नाही. ता वरून ताकभात ओळखण्याची आम्हा बायकांना फार अक्कल असते. आमच्या जवळ एखादी गोष्ट स्पष्ट सांगावीच लागते असं नाही.

''इतकं आहे, तर तीन चार दिवसांनी मुंबईच्या सी. आय. डी. खात्यातर्फे काही जागा भरायच्या आहेत. तुम्हाला खात्रीनं जागा मिळेल तेथे !''

''इश्श! तुमचं आपलं भलतंच कांहीतरी ! मी कशाला मरायला जाते आहे सी. आय. डी. खात्यात ?''

''कां....रागावलात वाटतं ?'' त्याने हसत हसतच विचारले.

''नाही.'' तिने लाजत लाजतच उत्तर दिले.

''मग एवढं चिडून बोलायला काय झालं ?''

''तुम्हाला सारखा माझा रागच दिसतो.''

''तसं नव्हे..... बायका रागावल्या की, त्या अधिक सुंदर दिसतात आणि तुमचं सौंदर्य पाहून जे रागावल्यावर सुंदर दिसते ते सौंदर्य आहे की मूळचंच आहे याचा विसर पडतो.''

''चला... कांहीतरीच बोलता झालं !'' तीने लाजत आणि मुरकतच उत्तर दिले.

''खरंच.....कांहीतरी बोलत नाही.''

''कांहीतरी नाहीतर काय ? मी काय इतकी सौंदर्यवती लागून गेले की काय ? माझ्यापेक्षा कितीतरी सुंदर मुली दाखवू तुम्हाला ? मला त्यांच्याइतके सुंदर होता येईल का असं मी नेहमी म्हणते पण....''

''पण काय? तुम्हाला सुंदर नाही असं कोण म्हणतं? एवढे मात्र खरे की कुबेराला सुध्दा अधिक श्रीमंत व्हावस वाटत असतंच! तसाच तुमचा काहीसा प्रकार दिसतो.''

''बरं असू द्या जा !''

''कुठे ?''

''मला नका विचारू!''

''मग कशाला म्हणालीस जा म्हणून !'' असे म्हणताच त्याने जीभ चावली. कारण त्याच्या चटकन लक्षात आले की आपण एकेरी शब्दात तिची संबोधना केली.

''म्हणालीस...... असे चाचरता काय? असंच म्हणत जा. मला तेच अधिक आवडेल.''

''अस्मत !'' असे म्हणतच आपल्या डाव्या हाताचा विळखा तिच्या

मानेभोवती घालून तिचे मस्तक त्याने आपल्या छातीवर टेकवले आणि तिच्या गालावरून हात फिरवता फिरवता त्याला केव्हा झोप लागली हे कळले देखील नाही. तिच्या अंगावर मात्र एक प्रकारचे रोमांच उभे राहिले होते. तिचे सर्वांग पुलकित झाले. आज तिला जीवनात एक नावीन्य आढळत होते. तिच्या हृदयाला आज दुसरे एक हृदय मिळाले होते. दोन जीवांचे मिलन होण्यापूर्वी आज त्याची नांदी झाली होती. तिची स्वप्ने आता साकार होणार होती. तिच्या हृदयाचा पुष्पपराग शोधीत आलेला एक भ्रमर तिला आज मिळाला होता. आता मंगल तिचा होता.... अस्मत मंगलची होती..... असे ती आपल्या दिलखुलास मनाला कथन करीत होती. मंगलच्या छातीवर मान असताना तिला त्याच्या हृदयाच्या प्रत्येक ठोक्याठोक्यातून  अस्मत.... अस्मत ! हे शब्द ऐकू येत होते. आज तिच्या आनंदाला पारावार नव्हता. स्वर्गानंद होता तो ! ती आत्ताही या पुढील एक सुंदर स्वप्न रंगवीत होती. तिला ते साकार होताना काही अडथळा येईल याची किंचितसुध्दा कल्पना नव्हती. फक्त स्वप्न रंगविण्याचे आणि ते अनुभव कल्पनेच्या वातावरणात सफल करण्याचे तिचे कार्य चालूच होते. तिच्या विचारशृंखलेचा भंग झाला तो दारावरील वाजलेल्या बेलने. ती चटकन उठली आणि दार उघडले. हेडनर्स आणि परिचारिका आत आल्या. त्यांनी अस्मतजवळ मंगलची चौकशी केली. अंगाला हात लावून ताप आहे का ते पाहिले, पण नव्याण्णव पेक्षा अधिक ताप नसल्याचे त्यांच्या लक्षात तेव्हाच आले. त्यांनी तसे अस्मतलाही सांगितले. औषधाचा ग्लास देत ती हेडनर्स तिला म्हणाली, ‘‘उठले की द्या हे औषध त्यांना ! उगीच आता झोपमोड नको.’’

‘‘बरं !..... पण वाजले किती ?’’

‘‘का ? कुठे जायचं नाही ना आता ?’’

‘‘नाही. पण घड्याळ बंद पडलंय माझं !’’

‘‘एक वाजला. नाव काय आपलं ?’’

‘‘अस्मत शेख !’’ घड्याळाला किल्ली देतादेता तिने उत्तर दिले.

‘‘मि. नार्वेकर आपले कोण ?’’

‘‘भावी पती !’’

आपल्या स्वप्नसृष्टीमध्ये तल्लीन असलेल्या अस्मतने नकळतच उत्तर दिले. त्या हेडनर्स ने एक मिस्कील हास्य केले. तिला अशा प्रकाराचे काही विशेष वाटत होते असे नाही. कारण दररोज असे कित्येक प्रेमिक त्यांना हॉस्पिटलमध्ये पाहायला मिळत, पण अस्मत सारखी स्पष्टवक्ती आणि सरळ स्वभावाची स्त्री त्यांना क्वचितच पाहायला मिळे. तिने आपले सर्वस्व नार्वेकरला..... आपल्या प्रियकराला.... वाहिले आहे, आपल्या प्रियकराशिवाय तिला दुसरे जग नाही हे त्या हेडनर्सने केव्हाच तिच्या बोलण्यावरून ताडले होते, पण हेडनर्सचा अनुभव याहून वेगळा होता. तिचे असे प्रांजळ मत होते की, प्रेम हे जितके आकर्षक, मोहिनी घालणारे आणि मनोहर असते तितकेच ते काही वेळेला जीवनाचा सत्यानाश करणारे ठरते! प्रेम करणं म्हणजे आपल्या स्वत्वावर, स्वदेहावर, तिलांजली ठेऊन आपल्या प्रेमाबरोबर आपले सर्वस्व वाहणे आणि शेवटी ते निष्फळ ठरणे असाच पुष्कळदा अनुभव येतो आणि एखादी चांगली गोष्ट जरी असली, तरी अडथळे हे असणारंच! प्रेम हे जितके उत्कट असेल तितकी संकटेही असतात. ते कितीही उत्कट असो ते संकटाविना सफल होत नाही. गुलाबाला सौंदर्य असले, तरी त्याच्याभोवती काटे असतात. चंद्रासारख्या प्रकाशमान ग्रहालाही आजच्यासारखा प्रकाश उद्या नाही अशी स्थिती भोगावी लागते. रात्र आणि दिवस ज्या प्रमाणे प्रत्येक प्राणिमात्राला आनंद आणि दुःख देतात, तद्वत प्रत्येकाच्या आयुष्यातही नेहमी बदल करण्याचे विधात्याने ठरविलेले असते. हेडनर्सने अशाच प्रकारच्या चाकोरीतून जाऊन एक कटू सत्याचा, एका कटू प्रेमाचा अनुभव घेतला होता. सर्व काही करून करून ती आता भागली होती आणि देवपूजेला नाही पण हॉस्पिटलमध्ये मानवपूजेला पुन्हा लागली होती. तिने असेच एका तरुणावर प्रेम केले होते ! सोज्ज्वळ आणि अमर प्रेमाचा नमुना म्हणून प्रेमिकांनी ते प्रेम आजमावले असेल त्या वेळी. त्या काळी त्या हेडनर्सने याच हॉस्पिटलमध्ये आपल्या प्रियकराला आणले होते. याच रूममध्ये अपघातात सापडलेल्या आपल्या प्रियकराची ती शुश्रूषा करीत होती. त्यांच्या प्रेमाचे असेच पुढे वर्धन होत होते. पण विधात्याने घाला घातला. तिच्या प्रेमात काटा निर्माण झाला. तिला आपल्या प्रियकराबरोबर दुसरी स्त्री आहे हे पाहवेना. तिला आत्महत्त्येचा विचार भेडसावू

लागला, पण तिचा जीवनधागा अजून तुटलेला नव्हता. तो लवकर तुटणार नव्हता. दुसऱ्याचे प्रेम पाहून तिचे मन अद्याप विधात्याला मारायचे होते, म्हणूनच ती जगली होती आणि त्याच हॉस्पिटलमध्ये ती हेडनर्स म्हणून काम करीत होती. आणि प्रेमिकांकडे विशाल नजरेने पाहत होती. उदार अंतःकरणाने मनात म्हणत होती, 'विधात्या! माझ्या जीवनाचे, आमच्या प्रेमाचे तू तुकडे तुकडे केलेस, पण निदान यांचे तरी प्रेम साफल्याप्रत जाऊ दे. या कोमल जीवांना निराशेच्या गराड्यात लोटू नकोस ! किती निरागस, निर्मल, नितांत प्रेम आहे हे! याची धूळधाण उडवताना विधात्या, त्यांची तुला थोडीसुद्धा क्षिती वाटणार नाही ना ?.....'

इतका वेळ शांत चित्ताने हेडनर्सच्या चेहऱ्याचे निरीक्षण करणाऱ्या अस्मतने आता मात्र स्पष्टच विचारले, ''इतके आश्चर्य काय वाटले आपणाला?''

''आश्चर्य वाटले नाही. तुमचे नितांत प्रेम पाहून आनंद वाटला. बरं जाते मी.'' असे म्हणून ती हेडनर्स आणि परिचारिका निघून गेल्या.

अस्मतला आज आनंद झाला होता. 'नितांत प्रेम'... हेच शब्द तिच्या कानात एकसारखे घुमू लागले. मध्येच ती स्वतःशीच लज्जास्पद स्मित करू लागली. तिला आपल्या प्रियकराचा अभिमान वाटला. तिने निद्रादेवीच्या अधीन असलेल्या मंगलच्या शांत चेहऱ्याकडे एकवार नजर फिरवली. तिचे डोळे आनंदाश्रूंनी भरून आले. प्रेमाने भारावलेले तिचे मन बेचैन झाले, पण ती तशीच जाऊन दुसऱ्या कॉटवर पडली. विचार करता करता तिच्या भोवतीही निद्रादेवीने आपले पाय पसरविले आणि ती निद्रादेवीची संपूर्ण कैदी बनली......

''अस्मत...... ए...... अस्मत !''

मंगलच्या हाकेमुळे अस्मत खडबडून जागी झाली. ती कॉटवरच उठून बसली आणि आळस झाडून आपले अंग मोकळे केले. कपाळावर आलेले केस तिने सारखे केले. पदर सावरला, पुन्हा एकदा तोंडावरून हात फिरविला. इतका वेळ मंगल तिच्याकडे टक लावून पाहात होता, पण अस्मतला त्याची कल्पनाही नव्हती. तोंडावरून हात फिरविता फिरविता तिने मंगलकडे पहिले. तेव्हा तिच्या हे लक्षात आले. ती थोडीशी ओशाळली. मंगल किंचित हसला. ती अधिकच लाजली आणि सहज तिच्या तोंडून उद्‌गार निघाले, ''इश्श!''

मंगल अधिकच हसू लागला. अस्मत चिडूनच म्हणाली,

''हसायला काय झालं ?''

तरी मंगलचे हसणे थांबेना. ती जास्तच चिडली. त्यांच्याकडे अगदी रोखून पाहत ती म्हणाली,''काय ? झालंय तरी काय हसायला? वेड तर नाही ना लागले ?''

''हो. वेडच लागलाय !'' मंगल हसूनच म्हणून गेला.

''हे कसलं बाई वेड ?'' अस्मत लटक्या रागातच म्हणाली.

''एका माणसाचं!'' असे म्हणून मंगल तिच्याकडे पुन्हा रोखून पाहू लागला.

''चला काहीतरीच आपलं !'' तिने लाजत आपले उद्‌गार हवेत सोडले.

इतक्यात दारावरील बेलचा आवाज आला. अस्मतने दार उघडल आणि एक परिचारिका तोंड धुवायला पाणी वगैरे घेऊन आली. मंगलकरीता आणलेल्या कॉफीतच फिफ्टी फिफ्टी पार पडले. परिचारिका निघून गेली. अस्मतने घड्याळाला काहीतरी विचारले. घरी जाण्याची जाणीवच तिला त्या घड्याळाने करून दिली. जाऊ का मी आता? तिने विचारले.

''कुठे ?''

''घरी !''

''पण.....''

''मी येते ना नऊ वाजता पुन्हा !''

''बरं आहे.'' मंगलला जरा वाईट वाटूनच तो म्हणाला.

''जाते मी.'' असे म्हणून अस्मत निघून गेली. मंगल हताश नजरेने दरवाज्याकडे पाहत होता........

*****

# ३.

घडल्या गोष्टीला सहा दिवस होऊन गेले. रविवार होता. सकाळीच अस्मतने मंगलला त्याच्या घरी आणले होते. घाईघाईने त्याचा बिछाना वगैरे सारखा करून ती घरी गेली होती. जाताना सांगितल्याप्रमाणे ती आता दुपारी दोनला मंगलच्या घरी आली होती. मंगलने हसतमुखाने तिचे स्वागत केले होते. तिने त्याला चार दोन लाडिक प्रश्न विचारले होते. त्याने त्यांची तशीच लाडिक उत्तरे दिली होती. विचारता विचारता तिने सहज एक प्रश्न विचारला,

"तुम्ही एकटेच इथे राहतां, मग बाकीची माणसे कुठे असतात ?"

तिला काय माहीत की, आपल्या प्रश्नांनी मंगलचे दुःख पराकोटीला जाईल म्हणून. आपल्या प्रश्नांनी तो एकदम गंभीर होईल. त्याचे डोळे पाण्यानी डबडबतील याची त्या बिचारीला काय कल्पना ? मंगल एकदम गंभीर झाला. त्याचे डोळे आसवांनी भरून आले. आवाज खोल गेला. मंगलची स्थिती पाहून अस्मत बुचकळ्यात पडली. तिला काहीच समजेना. आपल्याकडून काय चुकले तेच तिला कळेना. मंगलचा रडवा चेहरा पाहून तिला भडभडून आले. पाच दहा मिनिटे खोलीमध्ये भयाण शांतता पसरली. मंगलनेच त्या शांततेचा भंग केला. त्याने तिच्या प्रश्नाचे उत्तर देण्याच्या इराद्याने बोलण्यास सुरुवात केली.

''....अस्मत ! ती एक विचित्र घटना आहे. त्याच घटनेने माझा सत्यानाश केला. माझे सारे आयुष्य मातीमोल ठरले. माझ्या दुःखाला मोहोर फुटला. सुखाचे कडे कोसळले. माध्यान्हीच्या रखरखीत विघ्नरवीने माझ्या सुखसिंधूचे पाणी हिरावून नेले. खडतर संकटाची, चिरंतन दुःखाची, अविरत विरहाची वाफ बनली गेली. मी पोरका झालो. आकाशाची कुऱ्हाड कोसळली होती. त्या वेळी म्हणजे सुमारे दहा वर्षांपूर्वी आम्ही कराचीत राहात होतो. माझे वडील तेव्हा मुंबईत याच बंगल्यात राहात होते. येथे त्यांचे मोठे दुकान होते. त्याच्यावर त्यांनी आपली इस्टेट वाढवली. कराचीत असलेले दुकान आई चालवीत असे. हाताखाली नोकर माणसे घेऊन कराचीतील धंदा चालू होता. वडील मधून मधून कराचीला येत. व्यापाराची व्यवस्था बघत. कमीजास्त सूचना करीत व पुन्हा मुंबईला येत. मुंबईच्या बंगल्यात त्या वेळी कुबेर वास करीत होता. कराचीतील वाड्यात त्या वेळी पैशाचा धूर निघत होता. त्या मात्यापित्यांची आम्ही दोन अपत्ये होतो. एक मी आणि माझ्यापेक्षा धाकटी बहीण शोभा! बालपणीचे ते दिवस सुखसागरात पोहण्यात गेले. मातेच्या कुशीत आम्ही दोघे वर्धन पावू लागलो. गुरुजींच्या श्रवणाने आमचे मेंदू विशाल स्वरूप धारण करू लागले. जगाचे सुखद अनुभव आम्हाला आल्हादक वाटू लागले. जगात सुखाबरोबर दुःख म्हणून काहीतरी असते असे जर त्या वेळी कोणी आम्हाला सांगितले असते, तर ते आम्हाला स्वप्नातसुद्धा खरे वाटले नसते, पण दररोज जगाला प्रकाश देऊन उजळ करण्याऱ्या सूर्यालाही ग्रहण लागतेच. त्यालाही प्रकाशापासून परावृत्त व्हावे लागते. मग आम्ही कोण? मी त्या वेळी दहा वर्षाचा असेन आणि शोभा सात आठ वर्षांची असेल. कराचीमध्ये हिंदू मुस्लिम दंगलीचा स्फोट झाला. मुसलमान अतिशय चिडले. प्रत्येक हिंदूंच्या घरावर हल्ले करून लुटालूट, जाळपोळ, पळवापळवी, मारहाण असे विविध प्रकार चालू होते. कित्येक लोकांनी मुंबापुरीचा मार्ग सुधारला. निर्वासितांची रीघ लागली. मुसलमानांचा दंगा चालूच होता. लोकांना देशोधडीला लावताना त्यांना एक असुरी आनंद होत होता. ते बेहोष झाले होते. याच प्रकारामध्ये आमचे घर सापडल्याखेरीज कसे राहील? पाच सहा गुंडानी लवकरच आमच्या घरावर डाका घातला. पैसाच जास्त हाती लागल्याने ते लोक पैशाच्या नादी लागले. आणि म्हणूनच त्यांनी प्रथम

आमच्यावर हल्ला केला नाही. आईला बिलगून आम्ही दोघेही राहिलो होतो. आईच्या हातावर अश्रू ढाळीत होतो. तिच्या डाव्या हातावरची ती अश्रूंनी भिजलेली दोन अक्षरे अजूनही डोळ्यापुढे तरळत आहेत, 'उमा'.....

लवकरच दोघातिघांनी आम्हाला मारपीट करून घराबाहेर काढले आणि पळवापळवीस सुरुवात केली. त्या नंतर लवकरच माझी शुद्ध हरपली. पुढे त्या गुंडानी काय केले ते मला माहीत नाही, पण तीन चार तासांनी जेव्हा मी शुद्धीवर आलो तेव्हा मी समुद्रकिनाऱ्यावर वाळूत पडलो होतो असे मला आढळून आले. मी उठलो. आई...! आई...! म्हणून बराच आक्रोश केला, पण तेथे मला आई किंवा शोभा कोणीच भेटले नाहीत. तेथे असलेल्या असंख्य निर्वासितांपैकी एका तरुणाला माझी दया आली. त्याने मला उचलले. मला अधिकच भीती वाटू लागली, कारण हाही मनुष्य आपल्याला मारणार नाही कशावरून ? पण त्याने मला बराच धीर दिला. त्याने माझे तोंड पुसले. मला खायला दिले. लवकरच बोटीत आम्हाला प्रवेश मिळाला आणि आम्हीही मुंबईच्या मार्गाला लागलो. थोड्या वेळाने दुःखाचा बहर कमी झाला. त्या तरुणाने मला खाऊपिऊ घालून, माझ्या पाठीवरून हात फिरवून मला त्याने आपलासा करून घेतले आणि मग त्याने चौकशीस सुरुवात केली. त्याने मला घरची माहिती विचारली. त्याला मी घरची माहिती आणि झालेली दंगल मोडक्यातोडक्या शब्दात अडखळत कशीतरी सांगितली. नंतर त्याने मला विचारले, तुझं मुंबईला कोणी आहे कां?

तेथे माझे वडील आहेत. मी त्याला सांगितले. त्याने वडिलांचा पत्ता विचारला. मी तो अर्धवट नि तुटपुंजाच सांगितला, कारण वयाच्या पाचव्या की सहाव्या वर्षी मी एकदाच वडिलांच्या बरोबर मुंबईला चार दिवस आलो होतो. त्या अर्धवट पत्याच्या आधारावर त्याने काही अटकळी बांधल्या. दुसऱ्या दिवशी सकाळी आमची बोट धक्क्याला लागली आणि त्या तरुणाने मला घेऊन त्या गर्दीतून मार्ग काढला. धक्का ओलांडून रस्त्यावर आलो. एक टॅक्सी करून आम्ही दादरलाही आलो. नंतर शोधत शोधत चौकशी केली आणि येथे आलो. दारात येऊन बघतो तो दाराला कुलूप. शेजारी पाजारी चौकशी केली. नंतर कळून आले की बाबा कराचीला आम्हाला सोडविण्यासाठी गेले. त्यांना दंगलीची हकीकत

कळताच येथून ते निघाले होते. मग माझा जीव जास्तच व्याकूळ झाला. आई आणि शोभा जवळ जवळ मेल्यातच जमा! बाबांनीही प्रत्यक्ष मृत्यूच्या जबड्यात उडी घेतली होती. यातून निष्पन्न काय होणार ? ते मला काहीच कळेना. त्या तरुणाने मला पुन्हा एकदा धीर दिला. त्याने मला त्याच्या घरी नेले. जवळच आहे येथून त्याचे घर ! मी दहाबारा दिवस तेथेच होतो. रोज तो तरुण इकडे येऊन चौकशी करावयाचा आणि बाबा आले की नाहीत ते पाहायचा. माझ्या चिंताव्याकूळ मनाला रोज दिलासा द्यायचा. एक सुदिन उगवला. तो तरुण चौकशी करण्यासाठी म्हणून घरून निघाला. माझा एक 'पापा' घेऊन त्याने मला धीर दिला आणि तो गेला. त्याने इकडे येऊन चौकशी केली. तो नुकतेच बाबा तेथे आल्याचे त्याला कळले. त्याने त्यांना पहिले. ते अगदी भेसूर दिसत होते. त्या वेळी भेदरलेल्या त्यांच्या नजरेला त्या तरुणाने जरा शांत केले. तो त्यांच्याशी थोडा वेळ बोलला. आणि लगेच तो तरुण आणि बाबा टॅक्सितून माझ्याकडे आले. बाबांना पाहताच मी त्यांच्याकडे धावतच गेलो. त्यांनी मला जवळ घेतले. मला कुरवाळले. माझे पटापट मुके घेतले. पितापुत्रांचे मिलन होते ते ! स्वर्गानंद होत होता दोघांनाही ! तो तरुण आमच्याकडे कुतूहलाने पाहत होता. बाबानी त्या तरुणाला इनाम देऊ केले, पण त्या तरुणाने ते साफ नाकारले आणि शेवटी त्यांची बोळवण चहापाण्यावर झाली. बाबा मला घरात घेऊन आले. बाबांनी कराचीत आईचा आणि शोभाचा बराच तपास केला. पण ते सापडले नाहीत. हताश होऊनच ते परत आले होते. तो त्यांना मी तरी सापडलो. त्यांना एका गोष्टीची खंत वाटत होती. चार वर्षांपूर्वी बाबांचे आणि आईचे खडाजंगी भांडण झाले होते. त्यांच्या परिणामांती दोघांनाही एकमेकांचे तोंड पाहण्याचे नाकारले होते. तेव्हापासून कराचीला ते आले नाहीत. त्यांनी इकडे हे घर कायम केले. आता आई मेली होती. त्यांना अखेर तिचे तोंडही पाहायला मिळाले नाही, म्हणून ते हताश झाले होते. शोभालाही त्यांनी गेल्या चार वर्षांत पहिले नव्हते. त्यांचे सुदैव म्हणूनच मी त्यांच्या हाती लागलो होतो. मेलेल्या त्यांच्या मनाला माझा एकाच विसावा होता. माझ्याकरिताच त्यांनी काही काळ जीव ठेवला. या एवढ्या मोठ्या घरात पूर्वी फक्त एकच जीव वावरत होता. आता बाबा आणि मी दोघेजण वावरू लागलो. बाबांनी माझे नाव येथेच मराठी

सहावीत घातले. माझा दैनंदिन कार्यक्रम सुरू झाला. पण बाबा खंगत चालले. त्यांनी व्यापार धंदा सोडून दिला. आईचा आणि शोभाचा त्यांनी धोसराच धरला. मधून मधून ते प्रत्यक्ष आजारी पडू लागले......

अशीच पाच वर्षे निघून गेली. एके दिवशी ते जास्तच आजारी पडले. त्यांच्या भोवताली डॉक्टर घिरट्या घालू लागले. प्रत्येक जण त्यांना बरे करण्याचा प्रयत्न कसोशीने करीत होता, पण 'सतरा सुईणी आणि भोपळा अळणी' तशातलाच काहीसा प्रकार झाला. बाबांचा आजार वाढला. त्यांना जगण्याची आशा वाटेना. त्यांनी कारकुनाला बोलावले आणि मृत्युपत्र लिहून घेतले. त्यावर सही केली. बरोबर त्याच दिवशी माझा एस.एस.सी.चा निकाल होता. इकडे बाबा माझ्या नावे मृत्यूपत्र तयार करीत होते. तिकडे बोर्ड माझी सर्टिफिकेट पत्रिका तयार करीत होते. बाबा जीवनाच्या शेवटच्या टप्प्यावर, देहाच्या अंतावर पाऊल ठेवीत होते. तर मी खऱ्याखुऱ्या मध्यवर्ती जीवनातच पदार्पण करीत होतो.......

पहाटेच रस्त्यावरून वर्तमानपत्र विकणारी मुले रिझल्टविषयक गर्जना करीत चालली होती. मी एक पेपर घेतला आणि पाहिले. एक आश्चर्याचा धक्का बसला मला त्या वेळी. बोर्डाला पहिला नंबर आला होता माझा. मी अत्यानंदाने बेहोष झालो.... नव्हे मला हर्षवायूच झाला. मी पळत पळत बाबांजवळ गेलो. तोच बाबांनीही मला विचारले, ''लागला का रिझल्ट ?''

''हो बाबा. माझा पहिला नंबर आला बोर्डाला !''

मी एकदम त्यांना सांगितले. त्यांनाही आनंद झाला. आनंदाच्या भरात त्यांनी मला जवळ घेतले आणि माझ्या अंगावरून हात फिरविता फिरविता त्यांना केव्हा काळझोप लागली ते कळलेदेखील नाही. आनंदाचा मोहोर ओसरल्यावर मी उठून बाबांकडे बघितले. तो काय?.....

बाबांचा देह निश्चल आणि अचेतन होऊन पडला होता. मी एकदम किंचाळलोच. डॉक्टरांनी मला धीर दिला. तो मागचा तरुणही नेहमीप्रमाणे बाबांना पाहायला आला होता. त्याला आज बाबांचे प्रेतच पाहायला मिळाले होते. तोही दुःखानी व्याप्त झाला होता. बाबांचा अंत्यविधी वगैरे उरकले. नंतर त्याच तरुणांनी वसंतराव काकांनी, मला हाताशी धरले. बाबांच्या मृत्युपत्रान्वये त्यांची

सर्व इस्टेट माझ्या नावावर करून घेतली. कॉलेजच्या पायरीवर पाऊल ठेवण्यास त्यांनी मला भाग पाडले. माझे जेवण स्वतःचे घरी त्यांनी सुरू केले. पहिले एक दोन महिने त्यांनी पैसे घेतले नाहीत, पण नंतर मी अगदी अट्टाहासाने खानावळ म्हणून त्यांचे पैसे त्यांच्या पत्नीजवळ ते नसताना दिले. तेव्हापासून त्यांच्याकडेच मी जेवतो. दरमहा खानावळ देतो, कारण प्रेमाचे मायापाश पैसे तोडू शकतो, हे सत्य मला माहीत आहे. त्याच्यासारख्या देवदूताचे उपकार मी कसे फेडू हेच मला कळत नाही. माझ्या शालेय प्रगतीवर माझे मित्र मला डोक्यावर घेऊन नाचतात, पण माझे मन सुखी करण्याचा प्रयत्न कुणी करत नाही .... आणि ते सहजासहजी सुखी होणेही शक्य नाही. ते मन आता जिवंत नसून तो मनाचा मुडदा आहे. त्याला संजीवनी पाहिजे. जीवनात जगण्यासारखे काहीतरी पाहिजे! सांग अस्मत ! काय जगण्यासारखे आहे माझ्या जीवनात ? कोणासाठी जगू मी जगात ? हाच प्रश्न मला नेहमी भेडसावतो. जीवनाचा सत्यानाश झाला. पुढेही दुःखाचे कडे नसतील कशावरून ? सांग मला मरावेसे वाटते ते काय चुकीचे आहे? पण........

‘‘पण तुम्हाला माझ्याकरिता जगायला पाहिजे.’’

‘‘हं....!’’ नुसता हुंकार देत मंगलने एक विषण्ण हास्य केले. अस्मतही अतिशय भारावून गेली होती. तिलाही एकंदरीत परिस्थितीचा अंदाज, उलगडा होईना. ती शून्य दृष्टीने मंगलकडे पाहत होती. तिची विचारशक्ती गोठून गेली होती. ओठ थिजून गेले होते. हात आखडलेले होते. छाती धडधडत होती. पाय गाळाले होते. तिचा लहान मेंदू तिला तोल सावरण्यास मदत करेना. तिच्या तोंडून शब्दही फुटण्याची शक्यता नव्हती. पण मंगल मात्र दुःखातीत झाला होता. दुःखाची परिसीमा त्याने ओलांडली होती आणि म्हणूनच तो भेसूर आणि विकट हास्य करीत होता. तो पुढे म्हणाला,

‘‘माझ्या गतायुष्याची मला आठवण झाली की, त्या मुसलमानांची मला चीड येते. पण माझे दैव खोटे ! तू ही मला त्यांच्यापैकीच एक भेटलीस ! तू ही मुसलमान ! तुझे रक्त त्यांच्यापैकीच एकाचे ! तोच द्वेष तुझ्यामध्ये नसेल कशावरून ? तू सुद्धा माझं वाटोळं, राहिलेला सत्यानाश करायला आली नसशील कशावरून? मुस्लिमांना पाहिलं की माझी द्वेषभावना, चिडलेलं मन, संतप्त आत्मा, सळसळणारे

रक्त एकदम उफाळते ! पण अस्मत, तुझ्यापुढे माझा नाईलाज होतो. तुझ्यामुळे माझी मनोदेवता भारावून जाते. तुझ्यापुढे माझे काहीच चालत नाही. हल्लीच्या जगात, पुढे गेलेल्या विज्ञानसृष्टीत अणुबॉम्बसारखी एका क्षणात देशच्या देश बेचिराख करणारी शस्त्रे असतील, पण स्त्री हे शस्त्र त्याच्यापेक्षाही उत्कृष्ट आहे, की जे पूर्वापार चालत आले. अणुबॉम्बने माणसे एकदम भस्मसात होतात, पण स्त्रीमुळे मनुष्य प्रथम मनानी जळून जातो. त्याची वीरवृत्ती स्त्रीपुढे नाहीशी होते. त्याच्या हातातील शस्त्र गळून पडते आणि झुरून झुरून हाल होऊन मरतो. अस्मत ! तू नसतीस तर...... तर, मी काय केले असते ते सांगवत नाही. अस्मत ! खरोखर मी तुझ्याकरिता जगतो आहे, पण तू माझ्या हितशत्रूंपैकी एक आहेस.......''

''पण माझे मन तुमच्यापैकी एक आहे. मी मनाने हिंदू आहे. मुसलमानांच्या कट्टर द्वेषाचा आणि माझा काडीमात्र संबंध नाही. मी तुमच्याकरिता जन्माला आले आहे. तुम्हाला जगविण्यासाठीच या अवनीतलावर अवतीर्ण झाले आहे. माझे मन कपटी नाही. मी आपल्याला दगा देईन अशी कुकल्पना आपल्या मनात आली तरी कशी ? मुस्लिम घराण्यात मी जन्माला आले हा काय माझा दोष आहे ? गुलाब काट्यातून फुलत नाही का ? चंद्रावर डाग नाहीत का ? मी जन्माने मुस्लिम असले तरी आचरणाने, तनमनधनाने, कायावाचामने हिंदूच आहे ! मंगल, मी हिंदू आहे. मुस्लिम म्हणून तुम्ही माझ्यावर चिडू नका.

मी मुसलमान असले तरी निसर्गाने बनविलेली स्त्री आहे. स्त्रीचे गुणधर्म माझ्याजवळ आहेत. मी कपटी भावना उराशी बाळगली नाही. तुमच्यासाठी सारा देह झिजविण्याचा निश्चय केला तो तुम्हाला कपटाने संकटात टाकण्यासाठी नव्हे. मृत्यूच्या दाढेतून वाचवायला, तुमचे जीवन सुखी करायला मी तुमचा हात हाती घेण्याचा मानस केला. मंगल, मला दूर लाथाडू नका..... वड्याचे तेल वांग्यावर काढून एका अबलेला विनाकारण बळी देऊ नका.....''

ती धाय मोकलून रडू लागली. तिचा दुःखातीवेग आता वाढत होता. ती आता बेभान झाली होती. तिला फक्त मंगल पाहिजे होता..... मंगलचे प्रेम पाहिजे होते..... तिच्या मनातही नसलेली एक कुत्सित कल्पना मंगलने घेतली होती. याचेच तिला फिरून फिरून वाईट वाटत होते.

काही वेळेला शितावरून भाताची केलेली परीक्षा चुकीची ठरते हे स्वयंपाकी तत्त्व मंगलला कदाचित माहीत नसावे. वर कच्चा दिसणारा भात भांड्याच्या बुडाशी कदाचित करपलेला असेल, तर मध्ये गिचका झाला असेल. वरच्या कच्च्या भातावरून त्या वेळी भात कच्चा आहे हीच परीक्षा केली जाणार ना? गव्हाबरोबर किडे रगडले जातात ना ? द्वेषाच्या वणव्यात मानवता तत्पर एक अबला होरपळते आहे ना ? काळ्या चश्म्यातून दुनिया काळीच दिसते ना ? द्वेषभावनेच्या नजरेने मानवतेची हीच परीक्षा केली जाते ना ? तुळशीच्या भोवती भंग उगवते म्हणून तुळस का अपवित्र ? चंदन वृक्षाभोवती नाग आणि सर्प असतात म्हणून चंदन का वाईट आणि नीच ? मग मुस्लिम घराण्यात केवळ जन्म घेतलेली मी मन शुद्ध असताना वाईट आणि कपटी का ठरावी ? मी काय केलं आहे ?

ती दिग्मुढ होऊन विचार करीत होती. ती स्वतःच्या मनालाच प्रश्न विचारीत होती, पण तिला त्याची उत्तरे देता येत नव्हती आणि म्हणूनच ती हताश आणि खिन्न झाली होती. मंगलचे वाग्बलही कमी झाले होते. त्याचा चेहरा हळूहळू निर्विकार होऊ लागला होता. परंतु, तरीही एका भेदक नजरेने तो आढ्याकडे पाहत होता. त्याचे विचार आता थिजले होते. अस्मतचेही दुःख कमी कमी होऊ लागले होते. पायाजवळ गादीत खुपसलेले डोके तिने वर काढले. एकदा मंगलच्या निर्विकार चेहऱ्याकडे दृष्टिक्षेप टाकला. त्याचा पहिला राग ओसरल्याचे तिला कळून चुकले. हळूहळू त्याच्या उशाकडे सरकत तिने मंगल! असे म्हणत त्याच्या छातीवर आपली मान टाकली. मंगलही आता भानावर आला होता. तिने त्याच्या दांडावरून हात फिरवता फिरवता पुन्हा एकदा नामोच्चार केला,

मंगल!

प्रिये! असे म्हणत तिच्या कपोलपात्रावर मंगलने आपला शिक्कामोर्तब केला....

आणि सायंकाळचे सहा वाजले. अस्मतने एकदा मनगटावरील घड्याळात पाहिले. चार तास कुठे आणि कसे निघून गेले हे त्यांना कळलेही नाही. मंगललाही आश्चर्य वाटले. अस्मतने विचारले, ''चहा करू का?''

''नको. तुला पाहिजे का ?''

''मला नको.''

''मग ?''

''मग तुम्हाला पाहिजे ना ?''

''तू घेणार नाही ना?'' असे मंगलने विचारताच अस्मत नुसती हसली. ती जरा जोरानेच म्हणाली, ''सांगा ना करू का? उगीच काय चेष्टा आरंभली आहे?''

''बरं. रागावू नका बाईसाहेब! करा एकदा!...''

इश्श असे म्हणत अस्मत स्वयंपाक घरात गेली. सहा वाजून गेले होते. तिला आता घरी जायचे होते. उशीर झाला तर आई उगीचच काहीतरी प्रश्न विचारीत बसेल म्हणून तिने पटापट स्टोव्ह पेटविला. आधण ठेवले. चहा साखर वगैरे घातले आणि आपले पातळ सारखे करून ती केस सारखे करण्यासाठी म्हणून पुन्हा दिवाणखान्यात आली. आरशासमोर जाऊन कंगव्याने केस सारखे करताना मंगलने पाहिले. तो म्हणाला,

''काय, जायची तयारी चालली आहे वाटतं ?''

''हो. मग काय करू ?''

''आम्ही कुठे काय कर म्हणलं ? फक्त तेवढा चहा आणून दे म्हणजे झालं!''

''का? प्रथम नको म्हणालात ना ? मग नाहीच करीत मी चहा. चालले मी!''

''जा. मी उतरून घेईन चहा स्टोव्हवरचा! दोन कप प्यायला मिळेल तेवढाच!''

मंगलच्या या अनपेक्षित उत्तराने अस्मत हसली. तिने आत जाऊन तयार झालेल्या चहाचे दोन कप भरून आणले आणि चहापान झाल्यावर कपबशा वगैरे आत विसळून ठेवल्या. नॅपकिनला हात पुसता पुसता तिने विचारले, ''जाऊ का मी आता?''

''पुन्हा कधी येणार ?''

''बघेन आता.''

''कशात ? पंचांगात ?''

''चला काहीतरीच! तुमच्या पंचांगाची भारूडं आम्ही पाहात नसतो.''

''मग सरळ विचारलं, तर म्हणते बघेन म्हणून !''

''बरं. रागावू नका. सकाळी येते...! जाऊ ना आता ?''

असे म्हणून ती निघून गेली.......

*****



तिचे दिवास्वप्न असेच चालू होते........

# ४.

अस्मत घरी आली तेंव्हा साडेसात वाजून गेले होते. ती बाहेर गेल्यावर तिच्या एकदोन मैत्रिणी येऊन गेल्या होत्या. त्या आल्याचे आईने तिला सांगितले. आईने करून ठेवलेला चहा तिने घेतला. कपडे बदलले आणि ती इकडे तिकडे करू लागली. आई स्वयंपाक करीत होती. आईने तिला बोलाविले.

''कोणत्या सिनेमाला गेली होतीस ?''

''ईफाज़त!'' अस्मतने प्रसंगावधान राखून उत्तर दिले, कारण तो सिनेमा तिने पाहिला नसला तरी मुस्लिम धर्माची तत्त्वे त्या मध्ये स्पष्ट केलेली आहेत हे तिने ऐकले होते आणि याच धोरणाने पुढची गोष्ट सांगण्याचे टळावे म्हणून तिने या पिक्चरचे नाव पुढे केले होते.

''कसा आहे ?''

''बरा आहे साधारण.''

''काय आहे त्याच्यामध्ये ?''

''काही नाही. आपल्या धर्माची तत्त्व स्पष्ट केलेली आहेत फक्त!''

''आपल्या धर्माची..... म्हणजे मुस्लिम धर्माची !''

''हो. दुसरे काय?

''अस्सं!'' असे म्हणून ती जरा गंभीरपणेच हसली.

''किती वेळ आहे जेवायला आता ?''

''झालंच आता. पाच मिनिटे थांब.''

आईचे उत्तर ऐकून ती उठली. बाहेर येऊन

अभ्यासाची पुस्तके चाळू लागली. तिने जेवायला जाण्यापूर्वी अभ्यासाला लागणारी पुस्तके काढून ठेवली. आई हाक मारेपर्यंत वेळ काढण्यासाठी ती सहज दारात उभी राहिली. इतक्यात तिला समोरून कुंदा येताना दिसली. ती तिला सामोरी गेली आणि तिला घेऊन माडीवर आली.

''मगाशी येऊन गेलीस का तू ?'' अस्मतने विचारले.

''हो. पण तू भेटायला हवीस ना घरात ?''

''का ?''

''का काय म्हणतेस? पूर्वी तू केव्हाही घरी आलं तरी भेटत होतीस आणि आताशी कितीही खेपा घातल्या तरी भेटतच नाहीस. कुठे रमली आहेस कोण जाणे ?''

''कुठे जाते मी ?''

''मला काय माहीत ?'' आजसुद्धा दोन खेपा घातल्या.

''आज जरा सिनेमाला गेले होते.''

''हं. एकटीच !''

''मग काय करू ? तुम्हाला आवडणारा चित्रपट नव्हता तो.''

''कोणता ?''

''ईफाज़त''

''मग काय झालं ? तुमच्या धर्माची तत्त्व तरी कळली असती आम्हाला. मी जरूर आले असते.''

''बरं पुन्हा जाऊ. त्यात काय ?''

''ते झालच गं ! पण गेलेली वेळ पुन्हा पुन्हा येत नाही, आहे ना लक्षात?'' ती जरा चिडवणीच्या सुरात म्हणाली. तिने काहीतरी आठवल्यासारखे करून पुन्हा विचारले, ''पण हो! तुला मी पुष्कळ वेळा विचारीन विचारीन म्हणते.''

''काय ग ?''

''तू त्या दिवशी हॉस्पिटलमध्ये बत्तीस नंबरच्या रूममध्ये कशाला गेली होतीस ? तिथे तो रेल्वे ॲक्सीडेन्टमध्ये सापडलेला तरुण होता....''

तिने प्रश्नार्थक मुद्रेनेच कुंदन कडे पाहिले आणि मग काहीतरी थाप मारण्याच्या दृष्टीने ती म्हणाली, ''हं हं..... ते काही विशेष नाही, पण तो तरुण एका

मैत्रिणीच्या ओळखीचा होता. तिच्याबरोबर गेले होते सहज आपली !'' तिला केवढी मोठी थाप पचविल्याचा आनंद झाला.

''अस्सं! मला वाटलं......''

''काय वाटलं तुला ?'' तिने एकदम विचारले.

''काही पाणी मुरतंय का ?'' तिने हसत हसत आपले मत स्पष्टच बोलून दाखविले.

''छे छे....तसं काही नाही. तुला असं वाटलं तरी कसं?''

''अशा शंका चटकन मनात उभ्या राहतात?'' ती चेष्टेने हसतच पुन्हा म्हणाली.

''बरं. मला तुझी मराठीची वही दे.''

''मराठीच्या नोट्स माझ्या अर्धवट राहिल्यात गं. दाखवू का ?''

''दाखवू नको. विश्वास आहे, पण आज तुझ्या नोट्स अर्धवट कशा राहिल्या? यापूर्वी कधी चुकून नोट्स अर्धवट राहात नव्हत्या.''

''नाही गं जरा काम होतं !''

''बरं. ते असो. मला मराठीचे पुस्तक तरी दे.''

अस्मतने तिला पुस्तक दिले आणि कुंदा निघून गेली. जेवणखाण झाल्यावर अस्मतने अभ्यासात मन घालण्याचा प्रयत्न केला, पण तिचे मन काही अभ्यासात लागेना. ती तशीच उठली आणि बिछान्यावर पडली. तिला मंगलच्या सहवासाच्या कल्पना रंगवणंच फार सुखद वाटू लागलं......

*****

# ५.

असेच दिवसामागून दिवस जात होते. प्रेमचंद्रांच्या कला वाढत होत्या. नेहमी प्रमाणेच आज संध्याकाळी ते फिरायला बाहेर पडले होते. सायंकाळच्या संधीप्रकाशात त्यांनी कितीतरी वेळ व्यतीत केला होता. ते घरातून बाहेर पडताना हवा तशी मोकळी होती. चांदण्याचे दिवस असल्यामुळे दूरवर फिरत जाण्याचा दोघांचाही विचार होता. मंगलला विरहाची कल्पना विचाराचा विळखा घालीत होती. त्याला एक अंधुक कल्पना होतीच की आता लवकरच आपणाला मुंबई सोडावी लागणार आहे, पण त्याने अस्मतला मात्र त्याची मुळीच कल्पना दिली नव्हती. विरह हे एक गोड दुःख आहे. विरहाने देह दूर झाले तरी मने एकमेकांकडे अधिक आकर्षिली जातात. मंगल आणि अस्मत निवांतपणे शिवाजीपार्कवर बोलत बसली होते. कापराची वडी ज्या प्रमाणे तत्काळ जळून जाते, तद्वत तीन महिने कसे वाऱ्यासारखे उडून गेले होते. अस्मत आणि मंगल आपल्या तीन महिन्यातील गोड आठवणीत रंगून गेले होते. अस्मत बोलत होती.... मंगल ऐकत होता. ती बोलू लागली की, त्याला नेहमी ऐकत बसावेसे वाटे. तिचे बोल तो हृदयात साठवून ठेवण्याचा प्रयत्न करीत होता. अस्मतचे मंगलवर निस्सीम प्रेम होते. ते व्यक्त करताना अस्मतच्या सुंदर चेहऱ्यात निरनिराळे भाव स्पष्ट दिसत. बोलता बोलता अस्मत थांबे. मंगल काहीशा गूढ विचाराने भारावल्यासारखा होई. काहीतरी विचारण्यासाठी तो उत्सुक होता, पण ते विचार फार काळ टिकत नसत. ओठात आलेले शब्द ओठाबाहेर कधीच पडत


नसत. अन् पूर्वीसारखा तो नुसता ऐकतच राही.

रजनीच्या अवगुंठनात विश्वाला शिरावे लागले. पौर्णिमेचा पूर्णेन्दू शामलवर्णी मेघांच्या आच्छादनाने झाकला गेला. मेघांची प्रिया सौदामिनी त्याच्यावर रुसून उगीच अंबरात आकांडतांडव करू लागली. मुसळधार पाऊस सुरू झाला. अस्मत आणि मंगल घराचा मार्ग आक्रमू लागले. जवळपास चिटपाखरू नव्हते. वीज कडाडले की, मार्ग स्पष्ट दिसू लागे. मेघगर्जनेने अस्मत अगदी घाबरून गेली होती. कसेबसे ते रस्त्यापाशी आले. वाहनांची तुरळक ये जा चालूच होती. अस्मत दूरवर चालण्याचा प्रयत्न करीत होती, पण नकळत ती पुन्हा मंगलजवळ येत होती. इतक्यात समोरून प्रकाशाचा मोठा झोत टाकीत एक टॅक्सी भरधाव निघून गेली. अस्मत जरा दूरवर सरकली, पण लगेच मंगलला येऊन बिलगली. रस्त्यावरच्या चिकचिकाटाने आणि वरच्या पावसानं अस्मत आणि मंगल न्हाऊन निघाले होते. मंगलच्या बाहुपाशात अस्मतचा ओलाचिंब देह सामावला होता. त्याच्या भरदार छातीवर तिची मान स्थिरावली होती. अस्मत नखशिखांत ओलीचिंब झाली होती. थंडीने कापणाऱ्या देहाला उष्ण श्वासाने जरासा उबदारपणा आला. अस्मतच्या लालबुंद ओठांची मंगलने पटापट चुंबने घेतली. तिच्या काळ्याभोर डोळ्यात मादकता नाचत होती आणि ओल्याचिंब देहातून वसंत ऋतू बहरत होता. दोघांचे मुके डोळे एकच भाषा बोलत होते.... आम्हा दोघात एकच ताल आहे. एकच लय आहे आणि एकच संगीत आहे....

‘‘अस्मत, तू माझीच होणार ना?’’ मंगलने विचारले.

चंचल सौदामिनीलाही ही युती पाहण्याचा मोह अनावर झाला. अन ती मेघांच्या काळ्या बुरख्यातून चोरट्या नजरेनं पाहू लागली. लख्ख प्रकाश पडला. अस्मत लाजेने चूर झाली. तिचे डोळे आणि ओठ दोघेही हसली. अस्मत मंगल विलग झाले आणि घराकडे परतले. दादरला आल्यावर त्यांनी एक टॅक्सी केली. आणि मंगलने तिला माटुंग्याला पोहचविले. अस्मतने तेथून निरोप घेतला. सीतेला अशोकवनात जाताना विरह वाटला नसेल, इतका विरह त्या वेळी अस्मतला जाणवला. भरल्या डोळ्यांनी धुंद होऊनच तिने घराचा मार्ग सुधारला. मंगलनेही त्याच टॅक्सीने पुनरागमन केले आणि तो घरी आला.

*****



. तिला वेड तर लागले नाही नां !

# ६.

आता आठ दिवसांनी अस्मतची परीक्षा सुरु होणार होती. मंगलच्याही परीक्षेला आता काय ते तीनच आठवडे शिल्लक राहिले होते. दोघांनीही आता शक्य तो प्रेमाचा संयम राखण्याचे ठरविले होते. ते आता लागेल तेवढे चित्त अभ्यासाकडे लावण्याचा प्रयत्न करणार होते. चार महिन्यापूर्वी झालेल्या अभ्यासावर अगदीच काही पाणी पडले नव्हते, पण उन्हाळ्यात शुष्कता धारण करणाऱ्या सरितेसारखी त्याची स्थिती झाली होती. मात्र त्यामुळे ते जरा स्मृत झाल्याशिवाय लक्षात येणे शक्य नव्हते. कॉलेज सुटल्यावर मंगल नि अस्मत रोज निरनिराळ्या ठिकाणी फिरायला जात. आईला या पूर्वीच कोचिंग क्लास जॉईन केल्याचे सांगितल्यामुळे ती उशीर झाला तरी काही विचारीत नसे आणि यांचे कोचिंग क्लासच्या नावाखाली मनसोक्त आणि मनमुराद फिरणं चाले.

जरी आईच्या बाहेर न पडण्यामुळे ही गोष्ट आईला कळत नसली, तरी अशा गोष्टी फार दिवस गुप्त रहात नाहीत. लवकरच त्याचा गवगवा होतो. मंगल अस्मतचे प्रेमप्रकरण त्याला काही अपवाद नव्हते, पण मंगलच्या आणि अस्मतच्या फटकळ बोलण्यामुळे त्यांना आजवर स्पष्ट विचारायला कुणी धजत नव्हते एवढेच काय ते! सायंकाळी कॉलेज सुटले की शेख नार्वेकर प्रकरण सर्वांच्या डोळ्यापुढे तरळू लागे. काही टवाळ कंपन्या तर त्यांच्या

पाळतीवर राहू लागल्या. त्याचे काही मित्र आपली तहान तेवढ्यावरच भागवायला तयार नव्हते. त्यांनी काहीतरी कट रचला. आजपर्यंत पाळतीवर राहून त्यांनी एक निश्चित अंदाज काढला होता. शेख दर रविवारी सायंकाळी पाच वाजता नार्वेकरच्या घरी येते. तेथून ते सिनेमाला जात असतात. ह्या गोष्टी त्यांनी तीन चार वेळा पहिल्या असल्यानं आजही त्याचीच पुनरावृत्ती होणार असेच त्यांनी ताडले होते. त्या प्रमाणे ते दोघे मंगलच्या घराभोवती नजर ठेवून राहिले. आज त्या दोघांची मजा करायची असे त्यांनी ठरवले होते. त्या प्रमाणे ते घराबाहेर पडले की, त्यांच्याच मागोमाग ते पाठलाग करणार होते. त्यांच्या पुढेच तिकिटे काढणार होते. त्या प्रमाणे ऑपेरा हाऊसजवळ आल्यावर जरा पुढे होऊन त्या दोघांनी बाल्कनीचे तिकीट काढले. या वेळी मंगलने बॉक्सचे तिकीट काढले. त्यामुळे त्या दोघांचा विरस झाला. त्यांनी थोडा वेळ उतावीळपणाच केला होता. तरीपण न डगमगता त्या वीरभद्रानी पुन्हा काहीतरी ठरविले आणि ते आत जाऊन बसले.

पिक्चर सुटण्यापूर्वीच ते थोडा वेळ बाहेर पडले आणि त्या जोडप्याची वाट पाहू लागले. येणाऱ्या जाणाऱ्यांवर ते टेहळणी करू लागले. बाहेर पडणाऱ्या गर्दीतून नजरा फिरू लागल्या, पण आज त्यांचे दैवाचे दान उलटे पडले होते. त्यांना त्या सर्व गर्दीत ते जोडपे कुठेच आढळले नाही. त्यांनी कधी, कसा, आणि का पळ काढला ते त्यांना समजेना. त्यांनी ताबडतोब दादरला येण्यासाठी लोकल पकडली.

बॉम्बे सेन्ट्रलला ते दोघे सहज स्टेशनवर उतरले. नाहीतरी हल्लीच्या नवयुवकांना प्रत्येक स्टेशनवर खाली उतरून गाडी सुरू झाली की, चालत्या गाडीत चढण्याने एक वेगळाच आनंद प्राप्त होत असे. बॉम्बे सेन्ट्रल वर गाडी उभी राहिली तेव्हाही त्या दोन तरुणांच्या मनात तीच कल्पना आली असावी, म्हणूनच ते सहज खाली उतरून प्लॅटफॉर्मवर हिंडू लागले, पण गाडी लगेच हलली. वेग एकदम वाढल्यामुळे त्यांना मागे येऊन पहिला डबा पकडता आला नाही. समोरच्याच डब्यात त्यांनी चढण्याचा प्रयत्न केला आणि ते त्या फर्स्ट क्लास च्या डब्यात चढलेही. फुटबोर्डवर उभे असताना त्यांनी आत एक नेत्रकटाक्ष टाकला खरा, परंतु त्यांना आश्चर्याचा धक्का बसल्या खेरीज राहिला नाही. डब्यामध्ये एका कोचावर निर्विकार चेहरा करून शेख बसलेली त्यांना दिसली. वाऱ्याने तिचे केस उडून थोडेसे डोळ्यावरही

आले होते. डोक्यावरही थोडेसे केस उडत होते. गुलाबी गालावर खिन्नतेची छटा असल्यामुळे तिचे सौंदर्य जरा लोपले होते. डोळ्यातील काजळ जरा आजूबाजूलाही लागले होते. अशा अस्ताव्यस्त आणि एकट्या अस्मतला तेथे पाहून त्यांना आश्चर्याचा धक्का बसला यात शंका नाही. परंतु, तिच्या जीवनात झालेली क्रांती विल्सन कॉलेजला माहीत होती. त्या दोघांनी आपसात काहीतरी नेत्रपल्लवी करून तिच्याशी हटकून बोलण्याचे ठरविले. कोणत्याही संकटाला भीक घालायची नाही असेच त्यांनी निश्चित केले होते. आज महत्त्वाकांक्षेच्या आहारी गेलेली व्यक्ती संकटाची तमा बाळगत नाही हे सत्य ते आज नकळत हाताळीत होते. एकाने पुढे होऊन पण दारातच उभे राहून बोलण्यास आरंभ केला.

''इतक्या उशिरा आणि एकट्याच घरी चाललात?''

इतका वेळ मुकाट्याने त्या दोघांच्या हालचालीवर नजर ठेवून पुढे काय घडणार याचा बरोबर अंदाज तिने घेतला होता. आल्या प्रसंगाला तोंड दिल्याखेरीज गत्यंतर नाही हे जाणूनच तिने त्यांच्याशी सामना द्यायला आपले मन खंबीर केले होते. तिने फणकाऱ्यातच उत्तर दिले,

''मग ? तुम्हाला का त्या चौकशा?''

''नव्हे. तसं नव्हे, एक वर्गभगिनी या नात्याने आम्ही आपणाला सहज विचारले.''

''हं.....'' तिने नाक मुरडीतच नुसता हुंकार दिला.

''राग आला तुम्हाला आमच्या विचारण्याचा ?''

''मग! परस्त्रीला डब्यामध्ये एकटी गाठून एकट्याच चाललात का हे विचारताना तुम्हाला काहीच वाटत नाही ?''

त्या दोघांनी पुष्कळच जोडे खाण्याची तयारी केली होती. ही नुसती सुरुवात आहे हे त्यांनी ताडले. तिच्या उत्तराने ते नामोहरम तर झाले नाहीतच पण जास्तच चेवाने मात्र ते आपल्या महत्वाकांक्षेस बळी पडले. पहिल्याला मागे सारून दुसऱ्याने त्याला विसावा देण्याच्या इराद्याने बोलण्यास सुरुवात केली.

''नाही! आम्ही आपल्या बहिणीप्रमाणे विचारण्यास सुरुवात केली. तो तुम्ही स्वत:ला परस्त्री समजू लागलात तर ?''

''आता गप्प बसायला काय घ्याल?'' तिने चिडूनच विचारले.

''पण शेख, या वेळेला आपल्या वर्गाचा नंबर राखणार की नाही?'' तिच्या उत्तराकडे दुर्लक्ष करीतच त्याने पुन्हा विचारले.

''का? तुम्ही काय बांगड्या भरल्या आहेत काय हातात?'' तिने खवीसपणे विचारले.

''आम्हाला जमत नाही हो ते. सध्या मक्ता तुमच्याकडे दिला आहे तो.'' अगदी निर्लज्जपणे त्यांनी उत्तर दिले.

अस्मत थोडा वेळ गोंधळली. ती काहीच बोलली नाही. परंतु, त्यांनी आज पुढे जाण्याचे ठरविले होते. फास्ट लोकल होती. दादरशिवाय ती उभी राहणार नव्हती. त्यांची विचारशृंखला ही भराभर विणली जाऊ लागली. अस्मतने रागाने आणि तिरस्काराने दिलेले शब्दज्ञान ते तसेच मागे टाकीत होते. अस्मतला ही त्याची थोडीफार कल्पना होती. त्याने पुन्हा विचारले,

''किती विषयात बक्षीस मिळविणार ?''

''तुम्हाला काय करायच्या त्या पंचायती ?''

''पण लक्षात ठेवा पूर्वी इतके कॉलेजचे विषय आता सोपे वाटणार नाहीत म्हटलं. फार कठीण आहे ते आता.''

''का?'' तिने नकळत आश्चर्याने विचारले.

''कारण ते विषय प्रेमशास्त्रापेक्षा अवघड आहेत.''

''पुरे पुरे समजलं आता ! जबान बंद करा पहिली.''

''का? वर्मावर घाव बसला वाटतं?''

''कसले वर्म ?''

''मंगलच्या प्रेमप्रकरणांचे?''

सरळ सरळ आणि उघड जबाब तिला मिळू लागले. त्यामुळे तिचा राग अनावर होत चालला. तरी पण ते दोघे गप्प बसले नाहीत. त्यांनी पुन्हा पृच्छा केली, ''नार्वेकर रागावलेत काय सध्या ?''

तिने यावर काहीच उत्तर दिले नाही. फक्त राग वाढत चालल्याची काही सूचक चिन्ह मात्र तिच्या चेहऱ्यावर दिसू लागली. दुसऱ्याने उत्तराची अपेक्षा न करताच विचारले, ''कसा काय होता झनक झनक?''

आता मात्र अस्मतच्या रागाची सीमा झाली. तिने मनापासून आपली चप्पल बाहेर काढून ठेवली होती. या प्रश्नाला तिचे पित्त एकदम खवळले. तिने चप्पल घेऊन काडकन त्याच्या तोंडात वाजवली. हा प्रकार पाहून तयारीत असतानाही ते दोघे चपापले. परंतु, आपल्या मित्राच्या श्रीमुखात एका स्त्रीने चप्पल मारावी हे त्याला फारसे रुचले नाही.

।। तुझिया चप्पलची माधुरी, किती मी वर्णू ग अंतरी ।।

असे म्हणून स्त्रीला आपल्या जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न त्यांनी आजच केला नव्हता. असे कित्येक प्रसंग आले होते. आले तसे गेलेही, पण आजचा प्रसंग ते जाऊ देणार नव्हते. ते बेभान झाले होते. आपल्या मित्राच्या तोंडात बसलेली चप्पल त्याला पाहवली नाही. त्याच्या डोळ्यात आसुरी वृत्ती थैमान घालू लागली. त्यांनी तिचे मनगट पकडले. तिने ते त्याच्या हातून सोडविण्याचा बराच प्रयत्न केला. परंतु, तिने वेळोवेळी झिडकारून दिल्यामुळे त्याला ते साधले नाही. इतक्यात गाल चोळीत असलेला दुसरा मित्र भानावर आला. त्याने एकवार त्या दोघांच्या झटापटीकडे पाहिले. त्याला सूड म्हणजे काय करायचे हे अचानक कळून आले. तो आपले स्वत्व विसरला आणि तिच्यावर झडप घातली. तिची मानगुट पकडली. अस्मत जोराने किंचाळू लागली. आपल्या दोस्ताने तिची मानगुटी धरली आहे हे पाहून दुसऱ्याने तिचे मनगट सोडले आणि तिच्या मानेभोवती डाव्या हाताचा विळखा घातला आणि तिला तो जवळ ओढणार इतक्यात त्याचे दुर्दैव आडवे आले म्हणा किंवा तिचे कौमार्य बलवत्तर होते म्हणा दारामधून एकदम जोराने गर्जना केली गेली.

"Stop this all."

लोअर परळला स्टेशन सिग्नल न मिळाल्याने गाडी बराच वेळ उभी होती. तितक्यात ती व्यक्ती डबा बदलून या डब्यात आली होती. आतापर्यंत आपल्या महत्त्वाकांक्षेच्या आहारी गेलेल्या त्या दोघांनी काहीच विचार केला नव्हता. ते त्या आवाजाने एकदम दचकले. त्यांनी मागे वळून पहिले. तो त्यांना टी. सी. दिसला. पण गाडीही चालू झाली होती. खवळलेली हरीण आपल्या शक्तीचा विचार न करता वन राजावर झडप घेऊ शकते. त्यांचाही काहीसा तसाच प्रकार

झाला. टी. सी. ने एकदम ओरडून एकाचा हात धरला आणि त्याला बाजूला ओढण्याचा प्रयत्न केला. इतक्यात दुसऱ्याने खवळून खिशातला चाकू काढून त्यांच्यावर रोखला. त्याने तो मारण्याचा प्रयत्न करण्यापूर्वीच टी. सी. सावध होते. त्याने पहिल्याचा हात सोडून त्याचा चाकू रोखण्याचा प्रयत्न केला. एवढ्या अवधीमध्ये अस्मतच्या मानेभोवती पडलेला विळखा सैल झाला. तिने हिसडा देऊन आपली मान सोडविली. आणि धोक्याच्या साखळीकडे आपला हात नेला, पण हे दुसऱ्याच्या लक्षात आल्याखेरीज राहिले नाही. त्याने तिचा हात धरण्याचा प्रयत्न केला. तरी पण अस्मत सावध होती. तिने उजवा हात तो ओढणार इतक्यात झुकांडी देऊन डावा हात साखळीला घातला, परंतु त्यानेही तिला बाजूला ओढण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे तो तिला ओढीत असता आपोआपच साखळी खेचली गेली आणि गाडी उभी राहिली. इतक्या वेळात टी. सी.च्या कपाळाला ओझरती जखम झाली होती. आणि अजूनही ही झटपट चालूच होती. दुसऱ्याला साखळी ओढली गेली आहे याची कल्पना नव्हती. अस्मत मात्र बेशुद्ध पडली होती.

सर्व डब्यांकडे पाहत गार्ड तेथे आला. त्यांनी प्रथम टी. सी.ला सोडविले. आणि लवकरच त्या दोन गुंडाना अटक केली. टी. सी. व अस्मतला प्रथमोपचारासाठी दादरला नेण्यात आले.

ही बातमी हां हां म्हणता सर्व दादरमध्ये पसरली. तेव्हा ती मंगलला समजल्याशिवाय कशी राहील. त्याच्या मनात अनेक शंका येऊ लागल्या. अस्मत आपणाला सोडून मैत्रिणीकडे गेली. पिक्चर फार वेळा पाहिला असल्यामुळे आवडला नाही ही सबब सांगून ती निसटली होती. मैत्रिणीकडून ती याच गाडीने येणार होती. ती तर नसेल ना गुंडांच्या तावडीत सापडली?

त्याने विचारला खीळ घातली. कपडे चढविले आणि दादर स्टेशनचा रस्ता पकडला. फर्स्टएडच्या रूम जवळ येऊन चौकशी केली. इतक्यात त्याच रूम मधून कपाळाला पट्टी बांधून टी.सी. बाहेर आले. मंगलला पाहताच ते म्हणाले,

"अहो मि. नार्वेकर."

"कुठे गेला होता आज आपल्या बाईसाहेबांना सोडून ?"

मंगलला समजायचे ते समजले. तो तसाच खोलीकडे धावत सुटला. टी.सी. ने द्वारपालाला खूण केल्यामुळे त्याला कुणी अडविले नाही. तो थेट आत आला. पाहतो तो अस्मत अगदी बेशुद्ध अवस्थेत पडली होती. दोन डॉक्टर शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न करीत होते. मंगल चिंताक्रांत मुद्रेने तिच्याकडे पाहत होता. फार वेळ तिच्याकडे पाहण्याचे धाडस त्याला होईना. तेव्हा कॉटच्या दांडीवर डोके टेकून त्याने जवळ जवळ अश्रुपातास सुरुवातच केली. एका इसमाने त्याला धीर दिला. मंगल निराशेने अस्मतकडे पाहत होता. त्याचे डोळे डबडबले होते. दुसऱ्या एका इसमानेही त्याला धीर दिला. अस्मत निपचित पडली होती, परंतु आता डॉक्टरच्या तोंडावर जरा हास्य फुलत होते.

अर्ध्या तासाच्या तपश्चर्येनंतर अस्मत शुद्धीवर आली होती. डॉक्टरच्या कष्टाला यश आलं होत. नाहीतर अशी केस चटकन हार्टफेलवर जायची. 'आईऽऽ आईऽऽ' असे म्हणून तिने एकदोन सुस्कारे सोडले. डोळ्यावरची झापड मात्र अजून उडाली नव्हती. अजून थोडी शुद्धीवर आल्यावर तिने आपली मान हलविली. मंगल दिग्मुढ होऊन तिच्याकडे पाहताच होता. तिची जरा जास्त हालचाल पाहून तिच्याजवळ जाऊन तिचे डोके धरून बसला. ती पूर्ण शुद्धीवर यायला अजून दहा पंधरा मिनिटे अवकाश पाहिजे होता. डॉक्टर आता मधूनमधून हुंगारे देतच होते. तिच्या तोंडात थोडे ग्लुकोजचे पाणी ही घालण्यात आले होते. अस्मत आता डाव्या कुशीवर निपचित पडून कण्हत होती. मंगल तिच्या शेजारीच उशाशी बसलाच होता, पण तो तिच्या डोक्यावरून हात फिरवण्यापलीकडे काहीच करू शकत नव्हता.

थोड्याच वेळात अस्मत पूर्ण शुद्धीवर येऊन तिने पाणी पिण्यास मागितले. परंतु डॉक्टरने तिला कॉफी आणवून दिली. आता ती उठून बसली होती. मंगलकडे ती एका गुन्हेगार नजरेने पाहात होती. दिलेली कॉफी कशीतरी घेऊन तिने कपबशी वेटरच्या हातात दिली. कॉफी घेताना मंगलच्या अपघाताचे वेळी हॉस्पिटलमधील कॉफीचे फिफ्टी फिफ्टी तिला आठवल्याखेरीज राहिले नाही.

थोडा वेळ गेल्यानंतर घरी जाण्याविषयी तिने मंगलला सुचविले. तेव्हा डॉक्टरने विचारले, ''कुठे आहे तुमचे घर ?''

''माटुंग्याला!'' मंगलनेच उत्तर दिले.

''मग पाठवू कोणाला बरोबर ?''

''नको.'' अस्मतने चाचरतच सांगितले. तिची शक्ती अगदी क्षीण झाली होती.

''मी नेतो घरी आता सुरक्षितपणे. Don't worry ! ''

डॉक्टरने मंगलचा पत्ता लिहून घेतला. त्यांची दोघांचीही सही घेतली. औषधाची एक बाटली त्यांच्या जवळ देत त्यांनी त्यांना निरोप दिला. अस्मत मंगलच्या आणि एका शिपायाच्या आधाराने टॅक्सीपर्यंत चालत गेली आणि टॅक्सीत बसली.

मंगलच्या घराजवळ टॅक्सी उभी राहिली. अस्मतला धरून त्याने जिना चढविला आणि तिला कॉटवर आणून निजविले. थोड्या वेळाने त्याने विचारले,

''अस्मत ! भूक लागली आहे का ?''

''अहं !'' तिने हुंकारावरच काम भागविले.

''मग ? कॉफी करू का एकदा ?''

''नको'' तिने क्षीण स्वरात उत्तर दिले.

''घे ना थोडी कॉफी. बरं वाटेल!''

मंगलने अस्मतच्या उत्तराची वाट पहिली नाही. तो तडक स्वयंपाकघरात गेला. त्याने स्टोव्ह पेटवून कॉफीची तयारी केली. कॉफीचे आधण ठेवू न त्यात साखर घातली. इतक्यात बाहेर कसलातरी आवाज आला. म्हणून तो उठला. बाहेरून कोणाचे तरी जोरजोराने बोलणे ऐकू येत होते. तो एकदम दिवाणखान्यात आला. तेथे एक गोषातली स्त्री अस्मतच्या अंगावर ओरडत होती. अस्मत रडत होती. बाजूला तो मगाचाच स्टेशनवरचा शिपाई होता. तो नुसता पाहत होता. ती स्त्री ओरडत होती.

''हे कोणाचे घर ? आणि येथे परक्याच्या घरी तू इतक्या रात्री कशी आलीस ? कॉलेजच्या नावावर हेच धंदे चालत होते वाटतं ?''

अस्मत नुसती रडतच होती. ती स्त्री जोरजोराने तणतणत होती.

''तरीच घरात फार वेळ टिकत नव्हतीस ! मैत्रिणी सुचत नव्हत्या. इतका वेळ इकडे जात होता तर आपला हल्ली ! इथेच सिनेमा, पार्ट्या चालत होत्या तर !''

त्या स्त्रीने प्रश्नाची सरबत्ती अस्मतवर चालविली होती, पण अस्मत रडण्याशिवाय दुसरे काहीच करू शकत नव्हती. मंगलने त्या स्त्रीचे तोंड आवरण्याचा प्रयत्न केला, कारण ती अस्मतची आई असावी हे त्याच्या साधारण लक्षात आले. ती तिच्या अंगावर खेकसत असतानाच तो पुढे होऊन म्हणाला,

''अहो थांबा थांबा !! झालंय तरी काय ?''

पण तिने त्याच्या बोलण्याकडे लक्ष न देता अस्मतच्या हाताला एकदम हिसडा दिला. त्या वेळी त्याचे हृदय नुसते तुटू लागले. एक नाजूक पोर आणि त्यात आजारी असताना हे हाल.... त्याला हे पाहवेना.....

''अहो, तिला बरं नाही.''

''त्याची काळजी तुम्हाला नको.''

त्या स्त्रीने तिच्या काखोटीला धरूनच तिला जिन्याकडे वळविले. तिने मंगलकडे पाहाण्याचे कटाक्षाने टाळले.

मंगल काहीच बोलला नाही. तो तोंड फिरवून स्वयंपाकघराकडे वळला. स्टोव्ह विझविला. दार लावले अन तो कॉटवर येऊन पडला. उशीत डोके खुपसून तो लहान मुलासारखा रडू लागला. त्याला आत्ताचा हा प्रसंग अगदी नवखा होता. आणि त्याच्या मनाला तो सहन होण्यासारखाही नव्हता. त्याचे मन दुखावले गेले होते. अस्मतच्या हाताला बसलेला हिसडा त्याच्या स्वतःच्या हाताला बसल्यासारखा वाटू लागला. त्याच्या मनात अनेक विचारांनी थैमान घातले. त्याला रात्रभर झोप लागली नाही. अस्मतला आता आई खूप मारेल. ती सारखी किंचाळेल. आपल्याकरिताच तिला हे सारे सहन करावे लागत आहे. तो अस्वस्थ झाला. त्याने कॉटवरून उतरून उगीचच घरात दोन चकरा मारल्या. पुन्हा कॉटवर येऊन बसला. थोड्या वेळाने त्याने तसेच अंग टाकले. तरी त्याला झोप येईना. तो सारखा या कुशीवरून त्या कुशीवर वळत होता. त्याच्या डोळ्यापुढे रडवे तोंड करून व्याकूळ झालेली अस्मत उभी राहिली. त्याला तिच्या विचारांनी रात्रभर झोप लागली नाही. सकाळी उठून त्याने कसेतरी प्रातर्विधी आटोपले आणि पुन्हा माजघरात येऊन तो आरामखूर्चीत अस्वस्थ होऊन पडला. कॉलेजची वेळ झाली, तरी त्याने त्याची पर्वा केली नाही. तो अगदी रडकुंडीला आला होता. इतक्यात उघड्या दरवाज्यातून

येऊन आपल्यामागे कुणीतरी उभे आहे याची त्याला कल्पनाच नव्हती. समोर पाहत तो अश्रू ढाळीत होता. मागे उभ्या असलेल्या अस्मतला हे पाहवले नाही. ती चटकन पुढे आली. आरामखूर्चीच्या डाव्या बाजूला जाऊन ती गुडघ्यावर बसली आणि आपले मस्तक त्याच्या गुडघ्यावर टेकून तीही रडू लागली. मंगलला ते सारे स्वप्नच वाटू लागले.

''अ..स्म..त..!'' असे कापऱ्या आवाजात उच्चारित त्याने तिचे मस्तक उचलले आणि तिच्या तोंडाकडे अश्रूपूर्ण नजरेने तो पाहात राहिला. तिचे डोळे लाल झाले होते. ते पुष्कळच सुजले होते. त्याला तिचे पूर्वीचे भावनाप्रधान नि नाजूक डोळे आठवले. त्याला ते सुजलेले डोळे पाहावेनात. तिचे मस्तक हातात धरूनच त्याने आपली मान मागे टाकली. निराशेने तो आढ्याकडे पाहात होता. अस्मत त्याच्याकडे पाहात होती. तिलाही तो प्रसंग भयाण वाटला. ती काहीतरी बोलणार होती पण तिचे शब्द ओठातच विरत होते. तिला ते शब्द उच्चारण्याचे धाडस होत नव्हते. ती शक्य तो धीर करीत होती आणि शेवटी तिने सांगून टाकण्याचा निश्चय केला.

''मंगल ! तुम्ही सध्या माझा विचार सोडा. आपल्या अभ्यासाच्या मागे लागा. परीक्षा झाल्यावर पाहू!''

असे म्हणून ती तडक उठली. मंगलच्या उत्तराची तिने अपेक्षा केली नव्हती. तिला त्याचा भकास चेहरा पाहण्याचे फिरून धैर्य झाले नाही. ती तशीच जाऊ लागली. मंगलने तिला हाक मारली. तरीही अस्मत थांबली नाही. ती तशीच झरझर निघून गेली.

मंगल खिन्न नजरेने दरवाज्याकडे पाहात राहिला......

*****

# ७.

कोर्टमार्शल सुरू झाले. आरोपीच्या सापळ्यात दोन तरुण उभे होते. फिर्यादीच्या सापळ्यात दाते टी. सी. उभे होते. न्यायाधीश फायली चाळीत होते. दोन बाजूला दोन वकील विचारमग्न दिसत होते. दोन तीन पट्टेवाले इकडे तिकडे फिरकत होते. फिर्यादीच्या वकिलाने विचारणा करण्यास सुरुवात केली.

''मि. दातेंवर आपण चाकू घेऊन धावलात की नाही?''

''अंगावर धावलो नाही फक्त चाकू दाखवला.''

''कारण काय ?''

''दाते आम्हा दोघांना चालत्या गाडीतून ढकलून देण्याचा प्रयत्न करीत होते.''

''पण तुम्ही जेव्हा पकडला गेलात तेव्हा दरवाज्याजवळ दाते होते. तुम्ही नव्हता!''

''नंतर मारामारीमध्ये तसे झाले असेल.''

आणखी असेच मामुली प्रश्न विचारून झाल्यावर आरोपीच्या वकिलाने सुरुवात केली,

''मिस शेख कुठे आहेत ? पट्टेवाल्यानं अस्मतला बोलावून घेतले. वकिलाने विचारले, ''आपण केशव काळे यांना चप्पल मारलीत ना ?''

''होय !''

''कारण ?''

''त्यांनी माझी अमर्याद चेष्टा केली.''

''पण तुम्ही त्यांना डिवचून बोलत होता ना ?''

''हो. एकट्या स्त्रीला चालत्या गाडीच्या डब्यात गाठून वाटेल तसं यांचे बोलणे कसे सहन करून घ्यावे ?''

''बरं. दाते डब्यात आल्यावर तुम्ही काय केले ?''

दाते आणि कमलाकर गोरे यांची मारामारी चालली असता मी साखळी ओढण्याचा प्रयत्न केला.''

''मग ?''

''काळेंनी माझ्या हाताला हिसका दिला.''

''बरं पुढे?''

''माझी मूठ साखळीला घट्ट बसली असल्यामुळे त्या हिसक्याने साखळी आपोआपच खेचली गेली.''

''गाडी थांबली तेव्हा आपण काय करीत होता ?''

''ते मला काही माहीत नाही, कारण तत्पूर्वीच मला भोवळ आली होती.''

वकिलाच्या तोंडावर काही विशेष तेज दिसत नव्हते. त्याला आरोपीचा गुन्हा उलटवायला योग्य पुरावा मिळत नव्हता. त्याने अजूनही काही प्रश्न विचारून पाहिले, पण केव्हाही सत्यालाच किंमत असते......

आरोपीच्या सापळ्यातून अस्मतवर एक करडी नजर फेकली जात होती. ती नजर बहुतेक बजावून सांगत होती.......

''देखा जायेगा.......''

........काही दिवसांनी ते दोन तरुण जामिनावर सुटल्याची कुणकुण काही ठिकाणी चालली होती.

अस्मत घरी आली. स्वयंपाकघरात अन्न झाकून ठेवले होते. अस्मतने हातपाय धुऊन ते स्वतःच वाढून घेतले, पण ताटात वाढून घेतलेले तेवढेही अन्न तिला जाण्याची शक्यता वाटेना; म्हणून तिने ते पुन्हा कमी केले. ताटात फारच

थोडे अन्न राहिले. ते तेवढेच कसेतरी तिने घशाखाली उतरविले आणि ती कॉटवर जाऊन पडली. ती अगदी बेचैन झाली होती. आईने तिला आता घराबाहेर पडण्यास प्रतिबंध केला होता. तिचे कॉलेजही बंद झालं होतं. आठ दिवसांकरिता तिला परीक्षाही देता येत नव्हती. आई सारखी टोचून बोलत होती. एकसारखे जोडे मारीत होती. घरात ती तिला प्रेमाने मुळीच वागवेना! तिला मोलकरणी सारखे ती राबवू लागली. पूर्वी अस्मतला ती जेवलेले ताटही उचलू देत नव्हती, पण आता सारा भांड्यांचा ढीग तिला एकटीला घासावा नि धुवावा लागे. सर्व कपडे तिला एकटीला धुवावे लागत! घरातली मोलकरीण आईने बंद केली होती. केरवारा, पाणी भरण्यापासून ते स्वयंपाकापर्यंत सारे सारे तिला करावे लागे. आई कोणत्याही कामाला हात लावीत नसे. पण जर काही एखादी गोष्ट चुकली तर तिच्यावर ती भरपूर तोंडसुख घेई. चार चार तास मग तिचे तोंड बंद होत नसे. पूर्वी ज्या स्त्रीचा शब्द घराबाहेर येत नव्हता तीच स्त्री आता सारे माटुंगा हलवून सोडत होती. ती नुसते बोलूनच थांबे असे नाही, तर क्वचित तिला मारही देई. तिला त्याचे आता काहीच वाटत नसे. अस्मतवर ती फारच खवळली होती. कधी कधी ती म्हणे, 'काय तुझा नि माझा संबंध ? माझ्याशी प्रामाणिकपणे वागायला काय थोडीच माझ्या रक्ताची आहेस ? मोकाट वाऱ्यावर सुटलेला तुझा जीव थोडाच माझ्याकडे वळून पाहण्यासारखा आहे.....'

अस्मतला हे शब्द ऐकवत नसत ! तिला आई असं का बोलते याची कल्पना येत नव्हती. तिचा आपला रक्तसंबंध नाही तर आपण कोण ? ती आपली कोण ? हे प्रश्न तिला भेडसावीत होते, पण आईकडून त्याचे स्पष्ट उत्तर असे केव्हाच मिळाले नाही. तिची स्थिती मात्र शोचनीय झाली होती. एकतर आईने कॉलेज बंद केले होते आणि दुसरे असे की मंगलची आणि तिची भेट होणे आता फारच मुश्किलीचे झाले होते, कारण आता आई योग्य कारणाशिवाय तिला बाहेरच पडू देत नव्हती. बाजारहाटसुद्धा ती जातीने करू लागली. ...आणि अस्मत ! ती बिचारी घरातील सर्व कामे रडव्या चेहऱ्याने आईचे टोमणे खात करीत होती. तिला आता या जगात जिवंत राहायला देखील नकोसे वाटू लागले होते. ती आत्महत्येचा विचार करीत होती. क्षणभर ते विचार टिकत. पुन्हा तिला वाटे, हे ही दिवस

जातील. शेणातले किडे काही शेणातच राहात नाहीत. एक दिवस आपले भवितव्य उज्ज्वल होईल ! आपल्याला मंगल भेटेल आणि........

निराशेतून ही उगवलेली आशादायी कल्पना तिला फार सुखद वाटे. मग तिच्या तोंडावर जरा हास्य विलसे. नंतर जर तिच्याकडे कोणी पहिले, तर त्याला नुकतेच चंद्रग्रहण संपल्याचा भास झाल्याखेरीज राहणार नाही. तिची ती आशावादी कल्पना म्हणजे डबक्यातील कमळ होते. एखाद्या तलावाच्या पाण्यावर पुष्कळ दिवस वापर नसल्याने शेवाळाचा थरच्या थर चढला आहे, पायऱ्या पायऱ्यावरून कचऱ्याचे ढीग पडले आहेत, मधूनमधून लाकडाचे तुकडे आणि कोळसे यांचेही दर्शन होत आहे. त्याच्या वरच्या बाजूवर बाळगोपाळांनी आपले प्रातर्विधी मनमुराद आटोपलेले आहेत. अशा अनेक दुर्गंधी आणि घाणेरड्या डबक्यात एखादे कमलपुष्प विकसित व्हावे तशीच होती तिची ती कल्पना !

वाऱ्याच्या वारूवर स्वैर होऊन ती खुशाल कल्पनेच्या अंतराळात भ्रमण करू लागे. त्याच वारूवर बसून ती स्वर्गात जाण्याचा प्रयत्न करी. तेथील अमृताचा कलश पळवून आणून मंगल नि आपण ते अमृत प्राशन करावे असेही कित्येकदा तिला वाटे, पण लवकरच आईच्या कर्कश हाकेने ती भानावर येई. तिचे स्वप्न भंग होई. मग तिचे मन त्या ठरावीक कमळाऐवजी संबंध डबक्याभोवती वावरू लागे. कमळातील ज्या बिजतंतूंकरिता हंसराज आणि कोमल कुसुमतील मधुबिंदूकरिता भ्रमर स्वैरजीवन जगतात...... अगदी बरोबर जर तेच त्यांना मिळाले नाही तर ते जगले काय आणि मेले काय सारखेच! अशा जीवनात जगण्यापेक्षा खळखळाटाने वाहणारे मरण बरे ! डबक्यातील दलदलीपेक्षा एका कोपऱ्यात उमलणारे कमळ सरस आनंददायी नाही असे कोण म्हणेल ? कमळाच्या कल्पनेने क्षणभर का होईना, पण बाजूच्या दलदलीचा विचार दूर जाऊ शकेल. अस्मतच्या कल्पना बरोबर याच होत्या. दुःखी आणि दुर्दैवी दिवसाचा नि जीवनाचा अंधार तिच्या आयुष्यात काय वर्णावा ? प्रत्यक्ष दिवा घेऊन शोधू लागलं तरी सूर्याचा पत्ता नसायचा, हे उमर खय्यामचे म्हणणे अगदी सार्थ वाटत होते. तरीपण ती फक्त एकाच गोष्टीकरीता जगत होती, ते म्हणजे मंगलचे प्रेम आणि सध्या तेच तिला दुर्मीळ होते......

सद्यस्थितीला जगात वसंत ऋतू असतो असे जर कोणी सांगितले असते, तर तिला ते खरेसुद्धा वाटले नसते. ती म्हणाली असती, सर्व जगाचा नाश करणारा शिशिरच बाराही महिने पृथ्वीवर अवतीर्ण होत असतो. लता, वेली, वृक्ष यांची सारी पाने गळून त्यांचे जीवन उघडे बोडके आणि भकास करण्यात त्याला एक प्रकारचा आसुरी आनंद प्राप्त होत असतो. वसंतासारख्यांना तो आपल्या राक्षसी उन्मादाने केव्हाच नाहीसा करतो आणि शरदासारख्या कोरडा पांचजन्य करणाऱ्या आपल्या दोस्ताला आपला पाठीराखा म्हणून नेमतो आणि त्याच्या मदतीने तो या जीवन पृथ्वीवर मनमुराद तांडवनृत्य करतो. या पृथ्वीची पाळेमुळे खणून काढतो.... किती सत्य साठलेले आहे तिच्या कल्पनेने यात ? आपल्याच बांधवाला ठार मारून त्या मेलेल्या प्रेतावर आसुरी थैमान घालणारे नीच मानव जगात आहेत तो पर्यंत मानवता दर्शन होणे शक्य नाही आणि एखादे वेळी चुकून झालेच तरी केशव, कमलाकर आणि आईसारखे प्रमत्त सैतान त्यावर चाल केल्याशिवाय राहणार नाहीत...

अस्मत !... ती एक अबला होती. तिच्या हातात बांगड्याच भरलेल्या होत्या. आपल्या प्रियकरासाठी आईच्या प्रेमावर तिलांजली ठेवण्यास तिचे धाडस होत नव्हते. तिचे मन इतके प्रबळ आणि खंबीर नव्हते, म्हणूनच तिला घोर निराशा प्राप्त झाली होती. आता ती मंगलची फक्त मानसपूजा करीत होती......

*****

# ८.

तासामागून तास जात होते. दिवसामागून दिवस गेले. तसे दोन महिनेही उलटून गेले. उद्या जुनियर आणि सिनिअर बी.ए.चा रिझल्ट होता. कालच कुंदाने तिला हे सांगितले होते. तिला एक गोड स्वप्न पडत होते. उद्या सिनिअर बी.ए. चा निकाल आहे. वर्तमानपत्राच्या पानावर पहिले नाव कोणाचे असेल ? तिचे एक मन विचारीत होते. दुसरे मन हसऱ्या आनंदानी लाजत होते. त्या व्यक्तीचे नाव उच्चरताना तिला एक लज्जायुक्त आनंद होत होता. मंगलचा पहिला नंबर आल्यावर मंगल काय काय मजा करतील ते चित्र ती मनःचक्षूपुढे रंगवू लागली. तिला ते स्वप्न साकार होईल यात तिळमात्र शंका नव्हती, पण आपण तो आनंद कसा लुटणार ? या प्रश्नचिन्हाने तिचे मन पुन्हा साशंक झाले. पुष्कळ विचारांती तिला सुचले की, सकाळी कुंदाने उद्याचे आमंत्रण दिले आहे. ती पास होणार याचीच नव्हे तर तिच्या साऱ्या जुनिअरला पहिला नंबर येणार याची तिला खात्री असल्याने उद्याचे ते आमंत्रण स्वीकारावे लागणारच आहे. कुंदाकडे जायची परवानगी तिने तिलाच आईकडून काढायला लावली आणि याच संधीचा फायदा घेऊन तिने मंगलकडे जायचे ठरविले.

संध्याकाळ होऊन गेली. सूर्य दमून गेला होता. त्यानं रजनीला आकाशाच्या सिंहासनावर आरूढ करून दिले होते आणि तो आपल्या शयनगृहात सुखाने निद्रानंद

उपभोगीत होता.

अस्मतने सर्व कामं आटोपली. रजनीचा अंमल आता पूर्णपणे चालू झाला होता. ती बिछान्यावर पडली. तिला झोप येईना. केव्हा एकदाची रात्र संपते असे तिला झाले. पण ज्या वेळी एखाद्या गोष्टीकडे आपण सतत प्रतीक्षा करू लागलो तर ती गोष्ट लवकर घडून येत नाही असे वाटते. नेहमी फिरणारे घड्याळाचे काटे तिला आज दमल्यासारखे वाटत होते. रविराजाने रविवारची सुट्टी तर घेतली नाही ना? असेच तिला भासू लागले.....

असाच विचार करता करता तिला झोप लागली, पण ती पुन्हा एकदम दचकून जागी झाली होती. तिने घड्याळाकडे पाहिले. चार वाजले होते. ती तशीच उठली, कारण तिच्या मनाने असा एक विचार घेतला की, सर्व जर आटोपलेले असेल, तर जरी आपणाला यायला थोडा उशीर झाला तरी आई काही विशेष बोलणार नाही; म्हणून तिने सहाच्या आत सर्व काम आटोपून शेगडीवर कुकर ठेवला. इतक्यात कुंदा तिला बोलवायला आलीच. तिची जवळजवळ सर्व तयारी झाली होती. तोंडाला पावडर वगैरे लावून ती आईला उठवायला गेली. आईने अंगाला आळोखेपिळोखे देतच विचारले,

''चहा झाला का?''

''सर्व काही झालं आहे. मी जाऊ का आता? कुंदा आली आहे!''

''थांब जरा !''

हे ऐकून अस्मत अस्वस्थ झाली. तिला त्या वेळी आईचा अतिशय संताप आला पण ती काय करणार होती? आई उठली. ती थेट स्वयंपाकघरात आली. तिच्यामागोमाग अस्मत गेली. अस्मतने केलेली सर्व आवराआवरी तिने पाहिली. सर्व व्यवस्थित होते. काहीतरी खुसपट काढायचे म्हणून ती म्हणाली,

''हा कुकर लावून ठेवलास. तो काढायचा कोणी तू गेल्यावर ?''

मी आल्यावर काढेन ?'' अस्मतने एक दीर्घ सुस्कारा सोडीत उत्तर दिले. कारण तिची कल्पना होती की आज कदाचित कुकर काढेल आई ! पण ती फोल ठरली होती. आई तिच्याकरिता एवढेसुद्धा करायला तयार नव्हती आता !

''तू केव्हा येणार परत ?'' आईने विचारले.

''अकरा साडेअकरा वाजतील !''

''इतका वेळ ?''

सगळ्या मैत्रिणी येणार आहेत तिथे. उशीर लागणारच! अस्मतने कारुण्यपूर्ण उद्‌गार काढले.

''की त्याच्याकडे जायचं आहे?'' अगदी टोचून बोलल्यासारखे हातवारे करीत आईने विचारले. अस्मत  एकदम दचकली. तिने घाबरत घाबरतच उत्तर दिले, ''नाही नाही ! तिकडे नाही जाणार मी !''

इतक्यात कुंदा तिथे आली म्हणून तो विषय तेवढ्यावरच थांबला आणि आई म्हणाली, ''मी तोंड धुवून येते तोपर्यंत तेवढा चहा गरम करून ठेव आणि जा. पण हे बघ, लवकर परत ये! ''

''चहा गरम कर....'' हे शब्द ऐकून अस्मतला आणखी अस्वस्थ झाल्यासारखे वाटले. कुंदाकडे तिने एकदा अपराध्यासारखे पाहिले. चटकन चहा गरम करून ती आणि कुंदा घराबाहेर पडल्या. कुंदाला अलीकडे होत असलेले अस्मतचे हाल माहीत होते. त्यामुळे तिला आजच्या प्रसंगाचे विशेष काही वाटले नाही. निकाल सातला आउट होणार होता आणि मुद्दामच कुंदाने तिची घरची स्थिती जाणून सहाचा टाइम दिला होता आणि सहाला तिच्या घरीही आली होती ती !

घराच्या पुढच्या रस्त्यावर आल्यावर कुंदाने एक टॅक्सी केली आणि टॅक्सी विल्सन कॉलेजचा रस्ता आक्रमू लागली. आज दोन महिन्यांनी अस्मत अशी मोकळी घराबाहेर पडली होती. आज तिला टॅक्सीचे नवे स्वारस्य वाटत होते.

कॉलेजमध्ये प्रवेश करताच त्यांना त्यांच्या सर्व मैत्रिणींनी गराडा घातला. आणि आपल्या परोपरीने त्यांना सांगायला सुरुवात केली.

''अय्या ! कुंदा कित्ती उशीर केलास ? तूच पटकावलास की नंबर या वेळेला !'' सगळ्यांचं म्हणणं ऐकून तिने हसत हसतच विचारले, ''मग काय झालं ?'' कुंदाला त्याचे काहीच वाटले नाही, म्हणून तिने असेच उत्तर दिले होते. नंबरच्या बाबतीत आपली जिवलग मैत्रीण शत्रू असली तरी ती परीक्षेला बसली नव्हती. तिचा आज रिझल्ट नव्हता. तिच्या तोंडावर आज हास्य नव्हते. ती कुंदाबरोबर का आली होती हेही तिला माहीत नव्हते असे नाही, पण ते ती बोलून दाखवणार

नव्हती. करून दाखवणार होती. तिला पुरेपूर आनंद मिळवून देण्याचे श्रेय ती आज नक्की मिळवणार होती, म्हणूनच ती वर्गाबाहेर पडली आणि गर्ल्सरूममध्ये गेली. तिने तेथील चालू वर्तमानपत्र उचलले आणि रिझल्टचे पान वाचण्यास सुरुवात केली. अस्मत तिच्याकडे पाहाताच होती. तिच्या या सर्व कृतीचा तिला उलगडा होईना. पेपरमध्ये बी.ए. चा रिझल्ट ती कोणाचा पाहात होती हेही तिला माहीत नव्हते. तिलाही मंगलचा रिझल्ट पाहायचा होता. पण कुंदाच्या देखत हे धाडस ती करू शकत नव्हती. ती कुंदाला घाबरत होती आणि दिग्मुढ होऊन तिच्या बाजूलाच पण दुसरीकडेच पाहात उभी होती. कुंदाला पेपर फार वेळ वाचावा लागला नाही. कारण रिझल्टचे पान बाहेर काढताच वर मोठ्या टाईपमध्ये असलेली अक्षरे तिच्या नजरेतून सुटली नाहीत. तिने तसेच ते पान अस्मतपुढे धरले. अस्मतने ते वाचले. मुंबई युनिव्हर्सिटीच्या बी.ए.च्या परीक्षेत विल्सनचे एम. एस. नार्वेकर पहिले! अस्मतचा चेहरा खुलला. इतका वेळ तिच्या दुःखसागरात असलेली भरती ओसरली. कुंदाने हे ओळखले. तिने विचारले,

''तुला जायचं असेल ना नार्वेकरकडे?''

अस्मत कुंदाकडे आश्चर्याने पाहात होती. कुंदा हे काय करते आहे हेच तिला कळेना. ''जा. लवकर जा. नार्वेकर रिझल्टकरिता कॉलेजवर येणार नाहीत की घराबाहेरही पडणार नाहीत.'' असे म्हणून तिने पटकन खाली येऊन एक टॅक्सी बोलावली. अस्मतला टॅक्सीत बसविले आणि तिच्या हातात काही पैसे देत ती म्हणाली, ''पुन्हा लवकर ये माझ्या घरी. मी वाट पाहाते बघ!''

अस्मतने नुसती मान हलविली मात्र. ती त्या साऱ्या प्रकाराने गोंधळून गेली होती. नार्वेकर रिझल्ट करीता येणार नाहीत हे हिला कसे कळले ? तेही तिला समजेना. गोंधळलेल्या मनःस्थितीतच तिने मंगलच्या घराकडे गाडी नेण्याच्या खुणा ड्रायव्हरला सांगितल्या.

.....आणि गाडी मंगलच्या घराजवळ उभी राहिली. बिल चुकते करून ती जिना चढून उघड्या दरवाज्यातून आत गेली. मंगल आढ्याकडे नजर लावून कॉटवर पडला होता. आठ वाजले तरी मंगल उठला नाही याचे तिला आश्चर्य वाटले आणि त्यातच आज रिझल्ट होता. अशा वेळी त्याला ही काय अवदसा

आठवली आहे याचा विचार करीतच तिने कॉटवर झेप घेतली आणि मंगलच्या छातीवर मान टाकून ढसढसा रडू लागली. तेव्हा कुठे मंगल भानावर आला. दचकल्यासारखे होऊन एकदम त्याने तिची मान उचलली. कॉटच्या दांडीवरचा नॅपकिन घेऊन त्याने तिचे डोळे पुसले.

''रडायला काय झालं?'' त्याने विचारले.

ती काहीच बोलली नाही. पण नॅपकिन बाजूला सारून स्वःताच्या पदराने तिने डोळे पुसले. नि म्हणाली, ''माझ्यामुळे तुम्हाला त्रास झाला. तुम्हाला आनंदी करण्याचा मी प्रयत्न केला. पण मला अपयश येऊन उलट तुमच्या दुःखाला मी कारणीभूत झाले!''

''अस्मत! काय बोलतेस हे? कोण म्हणतं तू मला दुःखी केलंस म्हणून?''

''कोण म्हणायला कशाला पाहिजे? मन म्हणत असते हे!''

''अस्मत, हे मुळीच समजू नकोस. या अशा बोलण्यानी मात्र मी अधिक दुःखी होत आहे!''

थोडा वेळ कुणी काहीच बोलले नाही. दोघेही आता काय बोलावं याच विचारात होते. काही वेळाने अस्मतनेच शांततेचा भंग केला. तिच्या तोंडावर हास्य फुलले. मगाचा रडका चेहरा पार मावळून गेला होता. मंगलकडे पाहात ती म्हणाली, ''मंगल, आज रिझल्ट आहे ना तुमचा?''

''मग असेल !''

''पाहिला का तुम्ही रिझल्ट ?''

''नाही !''

''तुम्ही फर्स्ट क्लास फर्स्ट आहात !''

''मग ?''

''पेढे ?''

''पेढे !'' त्याने एक विकट हास्य केले.

इतकी आनंदाची बातमी असूनही मंगल इतका अस्वस्थ आहे हे पाहून अस्मतलाही वाईट वाटले. तिने विचारले,

''तुम्हाला काहीच वाटत नाही त्याच ?''

''काय वाटायचं ? प्रयत्नाला फळ हे येणारच! इच्छा असेल तेथे मार्ग सापडायचाच ! काय चुकून पहिला नंबर आला नाही ना ? दर वेळी येतो. या वेळीही आला. त्यात नवल ते काय ?''

अस्मत मात्र थक्क झाली. तिला काय बोलावे ते सुचेना. त्याचेच बेफिकिरीचे शब्द परत फिरविण्याचा तिने बेत केला.

''इच्छा असेल तेथे मार्ग सापडतो असे आपण म्हणता! मग आपल्या प्रेमात हे अडथळे का?''

''प्रबळ इच्छेचा अभाव !'' त्याने निर्विकार चेहऱ्याने उत्तर दिले.

''काय?'' असे म्हणून जवळ जवळ ती किंचाळलीच.

''घाबरू नकोस अस्मत ! मी तुझ्या मनातले विचार ओळखतो. तुला काय हवे तेही मला ठाऊक आहे. तुझ्या घरची परिस्थिती मला कळली आहे. माझ्यामुळे तुला तो त्रास सहन करावा लागतो आहे हेही मला कळते आहे, पण माझा नाईलाज आहे.''

अस्मत नुसतीच मंगलकडे पाहात होती. मध्येच तिने विचारले,

''कसे कळले हे सारे तुम्हाला?''

''तुझी मैत्रीण काल दुपारी येथे आली होती.''

''कोण?''

''कुंदा केतकर म्हणून नाव होते तिचे!''

''मग?''

''तिने सांगितले मला सारे!''

''मग?''

''तुझ्या इच्छा मला सध्यातरी पुऱ्या करता येत नाहीत !''

''म्हणजे मला नाही समजला याचा अर्थ !''

''तुला अजून काही दिवस माझा विरहच सहन करावा लागेल.''

''कारण ?''

''मी आता दिल्लीला जात आहे.''

''कशाला ?''

''तेथे मी एक दुकान उघडणार आहे.''

''का ?''

''का म्हणजे काय ? आता माझ्या पायावर मला उभे राहायला नको? बापानं ठेवलेल्या इस्टेटीवर फार तर ४-५ वर्षे निघतील. असाच बसून राहिलो, तर पुढे काय करणार मी? आतापासूनच मार्ग आखला पाहिजे. हीच इस्टेट मला सध्या भांडवल म्हणून उपयोगी पडेल. त्यावर मला पैसे कमावता येईल.''

''आता तुम्हाला पैसा आठवला वाटतं !''

''अर्थात! फार विचारांती तो निर्णय मी घेतला आहे.''

''तो कसा काय ?''

''समज! आपण आता लग्न केलं. अर्थात तुझ्या आईची त्याला संमती नाही. आपणाला दूर जाऊन राहिलं पाहिजे. सध्याच्या काळात नोकरी मिळणं कठीण ! आणि मिळालीच तरी ती गुलामगिरी मी पत्करणार नाही. आहे तो पैसे ४-५ वर्षात उडवून टाकला तर पुढं काय करणार? जीवन जगणार कशावर? पैशाशिवाय जीवन जगणं अशक्य आहे. कारण wealth is the god of this world. पुढे आपले प्रेम असून नसून सारखे. नुसत्या प्रेमावर पुढे काय करणार? प्रेम काय दुपारचा तुकडा भागवणार आहे ? प्रेम काय आपली आर्थिक चैन भागविणार आहे ? प्रेम काय तुला ब्लाउज साड्या आणून देणार आहे ? प्रेम काय मला सूट शर्ट्स पुरवणार ? हे घर विकून दुसरीकडे राहिल्यावर घर भाड्याला कारकून आल्यावर त्याला काय आपले प्रेम द्यायचे काय ? दूधवाला दारी उभा राहिला की, त्याच्या पदरी काय आपल्या प्रेमाचे माप घालायचे का? बोल, प्रेमाने आपले काय भागणार आहे पुढे? पैशाविना प्रेम लंगडे आहे अस्मत ! प्रेम मानवी मनाचं समाधान करू शकेल. मानवी शरीराचं नाही. मानवी शरीराच्या समाधानासाठी नि स्वास्थ्यासाठी पैसाच पाहिजे. एवढेच काय ? पैशाविना प्रेम नाही हेही लक्षात ठेव. उद्या ४-५ वर्षांनी माझ्याजवळचा पैसा संपला की, तू सुद्धा पुन्हा आईचे पाय धरशील. आईच्या घराचा आश्रय घेशील ! हे घडणार नाही कशावरून ? अस्मत, त्या वेळी मला मात्र समुद्राची भूक भागवावी लागेल. अस्मत, हे शब्द आज तुला कटू वाटत असतील. मी स्पष्ट बोलणारा तुला शत्रू वाटत असेन, पण लक्षात ठेव

हे भावी सत्य आहे. प्रेम आणि पैसे ही एकाच गाडीची दोन चाक आहेत. पैशाविना प्रेमाने आणि प्रेमाविना पैशाने ती गाडी नीट चालणे शक्य नाही. पैशाने कदाचित प्रेम विकत घेता येईल, पण प्रेमाने हल्लीच्या जगात पैसे विकत मिळणार नाही अस्मत ! आज आपण घरावर तिलांजली ठेवून आपल्या प्रेमाच्या साफल्यतेच्या आहारी गेलो, तर पुढील भवितव्य डोळ्यांनी पाहिल्यावर हीच तुझी आई तोंडात शेण घालेल. हेच जग आपल्याकडे पाहून दात विचकेल. त्यांची तोंड बंद करायला त्या वेळी पैसाच पाहिजे. सांग ! काय करणार तेव्हा तू? आता मरण बरे वाटते! असे चारुदत्तासारखे पांचजन्यकरीत हिंडायचे काय ? तहान लागल्यावर आड खणायला जाणार काय ? भीक मागायची म्हटलं तरी लक्षात ठेव अस्मत, आजचा जमाना द्रव्यहीनाला पिळायचा आहे, पोसायचा नाही. तेथेही आपला मार्ग रोखलेला आहे. हल्लीची जनता दगडाची पूजा करते. मानवतेची नाही! दगडाला शेकडो रुपये खर्चून महापूजा घालतील, पण क्षुधातृषेने व्याकूळ झालेल्या मानवाला दोन पैशाचे फुटाणे देताना त्यांचा जीव जाईल. मानवात मानवता राहिली नाही.... सर्वे गुणाः कांचनमाश्रयंती! हे तुला माहिती नाही असे नाही. पैशाने रावांचा रंक होतो आणि रंकाचा राव होतो. प्रेमामुळे काय होईल नि काय होतं ते सांग ! पैशाविना प्रेम आंधळं आहे. प्रेमाच्या पणतीत पैशाची ज्योत असल्याशिवाय जीवनाचा प्रकाश पडणार नाही. अस्मत एवढेच काय ? निसर्ग सुद्धा पाहाना ! रजनीच्या प्रेमाचे डोस पिताना निशानाथाला रत्नांची गरज भासते. ज्या दिवशी रत्नांचा अभाव असेल त्या दिवशी रजनीला सोडून तो आपले तोंड काळे करतो. अस्मत, तुझे प्रेम मला दिसते आहे. माझे प्रेम तुला दिसत असेल, पण दोघांचे प्रेम, दोघांची मनं एकाच वेळी एकमेकांना दिसायला, एकाच वेळी प्रतिबिंबित व्हायला संपत्तीचा जलाशय पाहिजे. त्यातच आपल्या प्रेमाचे एकदम प्रतिबिंब दिसू शकेल. जीवनाच्या टेकडीवर फिरायला जायला संपत्तीचे चांदणे पाहिजे. जीवनाच्या ऐन भरामध्ये दोन प्रेमी जीवांचे मिलन होण्यापूर्वी त्यामध्ये संपत्तीचा अंतरपाट पाहिजे. प्रेमाची आगगाडी चालवायला संपत्तीचा रूळ पाहिजे. जीवनाच्या कागदावर प्रेमाची अक्षरे लिहायला, संपत्तीची लेखणी पाहिजे. प्रेमाची जीवन नौका चालवायला संपत्तीचीच वल्ही पाहिजेत. आयुष्याच्या सिंहासनावर आरूढ

झालेल्या प्रेमाच्या सम्राटाला आपले सिंहासन संपत्तीच्या शस्त्रानेच टिकवावे लागते. ......सगळीकडे पैसा ! पैसा !! पैसा !!! मग बोल, मी पैशामागे लागू नको तर काय करू ?''

''खरं आहे तुमचं म्हणणं ! पटतं मला पण......''

''...पण कळतंय मला ते सारं! प्रेमदेवता आंधळी असते. तिला विरह सहन होत नाही, पण वारा वाहील तशी पाठ देणं हे मानवी शरीराचं कर्तव्य आहे. विरह तुला एकटीलाच सहन करावा लागणार नाही. मलाही त्याची झळ लागणार आहे. मी या प्रसंगाची पूर्वीपासून तयारी करीत आलो. त्यामुळे मला फारसा त्रास होणार नाही एवढेच! पण अस्मत, मृगजळासारख्या असत्याच्या आशेवर मरणोन्मुख झालेला मनुष्यसुद्धा लांबवर रपेट करू शकतो. मग आपल्या प्रेमासारख्या सत्याच्या आशेवर तुला जगायला काय हरकत आहे ? जा. हीच आपली सध्या शेवटची भेट. अस्मत, उद्या मी इथून जाणार आहे. बरं झालं. आज आलीस. हा घे तिथला पत्ता. वेळोवेळी पत्र पाठवीत जा. तुला मी पत्र पाठवले तर तुझ्या आईला कदाचित ते आवडणार नाही. तुझे त्या बद्दलचे मत तुझ्या पहिल्या पत्रात कळव. तू सांगितलेस तर मीही पत्र पाठवीन. संकोच करू नकोस. वर्ष दीड वर्ष थांब. तुझे स्वप्न मी साकार करेन. तू आशा सोडू नकोस. माझ्यावर विश्वास ठेव. प्रेमाची कसोटी आहे अस्मत ! वाईट वाटून घेऊ नकोस. सागराला भेटण्यापूर्वी सरितेला कड्यावरून आणि खडका खडकावरून आदळून स्वतःच्या चिंध्या चिंध्या करून घ्याव्या लागतात. सुखाच्या मार्गावर नेहमी दुःखाच्या काटेरी पायघड्या अंथरलेल्या असतात. ध्येयप्राप्तीचे सुख हे सुखासुखी मिळत नसते. जा. मन घट्ट कर आणि जा. वर्ष दीड वर्ष थांब. तुझ्या प्रेमवृक्षाचे फळ मी चाखून तुझी इच्छापूर्ती करेन. आयुष्याचा जीवनपथ चालण्यासाठी मी तुझा हात हातात घेईन, पण आता जा. मला आता जास्त बोलवत नाही. जा लवकर. घरी आईही वाट बघत असेल. वेळ घालवू नकोस......''

अस्मत काही बोलली नाही. तिने मान वर करून एकदा मंगलकडे पाहिले. तिचे डोळे भरून आले. दीड वर्षाचा काळ तिला अठ्ठावीस युगापेक्षा फार वाटला. मंगलही तिच्याकडे नुसता पाहात होता. तिने दोन अश्रूबिंदू ढाळले. तिला मंगलच्या

निश्चयी चेहऱ्याकडे पाहण्याचे धाडस होईना. ती तडक दिवाणखान्यातून बाहेर पडली. उघड्या दरवाज्यातून ती निघूनही गेली. मंगल दाराकडे..... तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहात होता.....

अस्मत टॅक्सीनेच कुंदाकडे आली. कुंदा गॅलरीतच तिची वाट पाहात उभी होती. अस्मतला पाहताच ती खाली आली. ती येण्यापूर्वीच तिचे दुःख ती जाणून होती. कारण त्या प्रश्नाचा उहापोह काल मंगलकडे जाऊन तिने केला होता आणि केवळ अखेरची भेट म्हणूनच कुंदाने अस्मतला मंगलकडे जाण्याची एक शेवटची आणि मोलाची संधी मिळवून दिली होती. रिझल्टचे निमित्त अस्मतच्या आईच्या तोंडावर फेकून तिने इच्छित कार्य साधले होते. अस्मतचा दुःखी चेहरा पाहून तिला धीर देतच वर आणले नि पलंगावर बसविले.

''वाईट वाटून घेऊ नकोस अस्मत ! दीड वर्ष फार नाही.'' कुंदाने समजावणीच्या सुरात सांगितले. पण अस्मत अधिकच दचकली.

''मी काल दुपारी नार्वेकरकडे गेले होते. तुझ्याबद्दल जे काही बोलायचे ते बोलले, पण त्यांचेच विचार मला पटले. तुला दीड वर्ष थांबणेच भाग आहे.''

''तू कशाला गेली होतीस त्यांच्याकडे ?''

''तुमची शेवटची भेट घडवून आणण्यासाठी !''

''तुला आमचे प्रकरण कसे कळले ?''

''अस्मत, तो प्रश्न वेगळा आहे. तू अशा गोष्टी लपविण्याचा कितीही प्रयत्न केलास तरी तुला ते शक्य नाही. लवकरच त्याचा मी सुगावा काढला. माझ्या मामांकडून मला ही बातमी कळली. तुझी निराशा कशाबाबत आहे हे मी जाणले. आणि तुला सुख मिळवून द्यायचे ठरविले, पण याचा परिणाम उलट झाला. तुला अधिकच विरह सहन करावा लागतो आहे. वाईट वाटून घेऊ नकोस.....''

अशा प्रकारे सांत्वन करून कुंदा खाली गेली आणि तिने फराळाची एक बशी भरून आणली. एक पाण्याचा तांब्याही भरून आणला. अस्मतपुढे ती बशी ठेवली, पण तिने ते खाण्याचे टाळले. कुंदाने बराच आग्रह केला. समजूत घालून तिला ते खाण्यास भाग पाडले आणि तिला टॅक्सीने घरी पोहोचविण्यास ती गेली.

साडेदहा वाजून गेले होते. आई तिची वाटच पाहात होती. तिच्या मनात

अनेक शंकाकुशंका येत होत्या. ती मैत्रिणींना चुकांडी देऊन त्या तरुणाकडे जाईल का? पण कुंदा बरोबर असली तर अगदी मुळीच काळजी नाही.... मात्र तिचा चेहरा रागीट दिसत होता. कुंदाने ओळखलेच होते ते! अस्मतला घेऊनच कुंदा आईजवळ गेली.

''घ्या चाची तुमची मुलगी ! अगदी फुलासारखी जपून आणली आहे.'' तिने हसत हसत सांगितले. आईलाही जरा बरे वाटले. कुंदा निघून गेली. अस्मत कुंदाबरोबरच परत आली म्हणजे ती तिच्याबरोबर आणि तिच्याकडेच होती. याबद्दल तिला तिळमात्र शंका उरली नाही. तिला म्हणूनच बरे वाटले होते जरासे. त्या तरुणाचा नाद तिने सोडला आहे याची तिला खात्री पटली. तिचा आजपर्यंतचा राग मावळला. क्षणातच तिने आपले वर्तन बदलले. अस्मतशी अगदी पूर्वीसारखे प्रेमाने वागण्याचे तिने ठरविले आणि ती अस्मतच्या मागोमागच स्वयंपाकघरात गेली. अस्मतने हातपाय धुतले. अस्मतची घाबरी नजर आईच्या आनंदी चेहऱ्यावर रोखली गेली. तिला तिच्या चेहऱ्यावरील भाव ओळखता येईनात! पण तिला तो चेहरा पाहून जरा बरे वाटले. दारावरील नॅपकिनला हात पुसतच ती माडीवर गेली आणि कपडे बदलू लागली.

आईचे जवळ जवळ आता परिवर्तनच झाले होते. तिला अस्मतबद्दल आता पुन्हा आपुलकी वाटू लागली. आपल्या ऐकण्यातच अस्मत आहे हे तिने जाणले. तिने शेगडीवरील कुकर काढला. स्टोव्ह पेटवला आणि आमटी भाजीला फोडणी द्यायच्या ती तयारीतच होती. इतक्यात अस्मत तेथे आली.

''मी करते ना आई. तू कशाला बसलीस येथे उगीच?'' तिने आश्चर्याने विचारले.

''राहू दे. मी करते आता. तू दमून आली असशील.'' तिने हसत हसतच उत्तर दिले.

आज आईच्या नवीन वर्तनाचा तिला अचंबा वाटला. नेहमीचे दात ओठ खाऊन दिलेले उत्तर आणि रागात विचारलेले जाब तिला आठवू लागले. आज आईला कोणत्या भुताने तर पछाडले नाही ना? अशी तिच्या मनाला एक अस्पष्ट शंका चाटून गेली. ती तशीच उठली आणि माडीवर गेली. आरामखूर्चीत पडून या

प्रकाराचा ती विचार करू लागली, पण तिला हे कोडे सुटले नाही. इतक्यात खालून आईने हाक मारली. अस्मत घाईघाईने खाली आली.

“चल बाळ जेवायला!”

आईचे हे शब्द तिच्या कानाला झोम्बू लागले. तिने साधा हुंकारसुद्धा न देता स्वयंपाक घराचा दरवाजा ओलांडला. तिच्या मागेच आई होती. आईने वाढून घेण्यास सुरुवात केली. अस्मत ते सारे पाहातच उभी होती. मध्येच काहीतरी आठवल्यासारखे करून ती म्हणाली,

“अस्मत, तांबे घेतेस का तेवढे भरून ?”

हो असे म्हणून ती पिंपाकडे वळली. पण घेतेस का भरून? हे प्रश्नचिन्ह तिला उलगडेना ! तिच्या मनात क्षणभर एक विचार डोकावून गेला.
कैदेत असताना चाबकाचे फटके अमानुषपणे मारणारे लोक त्याला फाशीपूर्वी इच्छाभोजन देतच असतात! त्यातला तर हा प्रकार नसेल ना?.....

पण क्षणातच तोही विचार थिजून गेला. आईने हलकेच विचारले,

“कसला विचार करते आहेस अस्मत? आटप ना लवकर !”

पाटावर बसता बसता अस्मत बोलण्याची तयारी करू लागली. मन तयार केले पण तिला बोलवेना. ती तशीच खालच्या मानेने जेवू लागली. आई तिच्याकडे पाहून मिस्किलपणे हसत होती. ती म्हणाली,

“अस्मत आज मला फार आनंद झाला !”

“कसला?” तिने चमकून विचारले.

“आज तू माझ्या ऐकण्यात आहेस याची मला खात्री पटली.”

“मी नाही समजले याचा अर्थ ! ” तिने प्रश्नार्थक मुद्रेने तिच्याकडे पाहिले.

“आज तू त्या तरुणाकडे गेली नाहीस ना ? सकाळचे माझे म्हणणे ऐकलेस! शेवटपर्यंत कुंदाच्या बरोबरच होतीस !”

अस्मत गोंधळली. तिला काय बोलावे हेच सुचेना. कुंदाचे तिने मनातल्या मनात आभार मानले. आणि तिने आपला गोंधळलेला चेहरा आवरण्याचा प्रयत्न केला. तिला मुख्य मुद्दा कळून चुकला होता. आता वेळ येईल तसे नाटक रंगविले

पाहिजे, हे तिने जाणले.

''ज्या आईने लहानाचे मोठे केले तिची इच्छा मी कशी मोडेन? प्रथम मला वाटले होते की तू विरोध करणार नाहीस...''

''जाऊ दे ते आता! झाले गेले. आता काय त्याचे ?''

अस्मतला आज फार बरे वाटत होते. तिने भराभर जेवण आटोपले आणि ती माडीवर जाऊन कॉटवर लवंडली. कुंदाला किती धन्यवाद द्यावे हेच तिला कळेना. तिने आज केवढे मोठे कार्य पार पाडले होते. आज तिला सारख्या हास्याच्या उकळल्यावर उकळ्या फुटत होत्या.....

*****



बसल्या बसल्या मंगलच्या सहवासाच्या कल्पना
रंगवणे तिला अधिक सुखद वाटू लागले.

# १.

सायंकाळी पाच वाजून गेले. मंगल अगदी निराश झाला होता. त्याला काही एक सुचत नव्हते. निराशेच्या भरात तो उठला. कपडे चढविले. आणि दादर स्टेशनवर आला. सुटायच्या बेतात असलेल्या लोकलमध्ये तो चढला. ज्या फर्स्टक्लासच्या डब्यात तो चढला त्यात कोणीच नव्हते. तो ऐसपैस पाय पसरून रेलून बसला. लोअर परेल स्टेशनवरून गाडी सुटताच एक इसम आत आल्याची मंगलला चाहूल लागली. त्याने मागे वळून पाहिले. नेहमीच्या परिचयातला इसम होता तो. नेहमीच्या परिचयातल्या युनिफॉर्ममध्ये लपेटलेला होता तो ! मंगल त्यांच्याकडे पहात फक्त एवढेच उद्गार काढले.

''नमस्ते मि. दाते !''

''नमस्ते! पण आज स्वारी अगदी निराश दिसते आहे.'' त्या गृहस्थाने चेष्टेच्या सुरात विचारले.

''विशेष काही नाही !'' त्याने निर्विकार चेहऱ्याने उत्तर दिले.

''मिस. शेख कुठे आहेत ?''

''काही कल्पना नाही त्याची !''

''का ? भांडलात वाटत ?'' त्याने हसत हसत विचारले.

''छे ! ती दुपारपासून घरीच आली नाही.''

''मग तुम्ही तिच्याकडे जायचे !''

''ते शक्य नाही !''

''का? ते खिजविण्यासाठी म्हणाले.''

''सांगवत नाही !''

''बरं! आता सुट्टीला कुठे ट्रिप निघणार आहे की नाही आपली ?''

''ट्रिप नाही, पण कायमचीच मुंबई सोडायचा विचार आहे.''

''कारण ?''

''उद्या दिल्लीला जाणार आहे मी !''

''कशाला ?''

''धंदा सुरू करणार आहे मी तिकडे.''

''ठीक ! उद्या निघणार तर तुम्ही ?''

''हो.''

''आणि शेख ?'' त्याने पुन्हा एकदा डाव टाकला.

''ती येथेच राहणार आहे काही दिवस !''

''ठीक. तुम्ही आता घरी येता का जरा आमच्या ?''

''घरी ?''

''का ? आश्चर्य वाटले ?''

''नाही. तसं नाही !''

''मग you must come !''

''पण तुम्ही on duty आहांत ना?

''ते पहातो मी !''

ते दोघे बॉम्बे सेंट्रल वर उतरले. तेथे दाते दुसऱ्या एका टी.सी.ला भेटले. त्यांना जरा दोन तास काम करण्यास सांगून ते डाऊन लोकलने माघारी फिरले. माटुंग्याला उतरून ते दातेंच्या घरी आले. दातेंची पत्नी आणि कुंदा गप्पा मारीत बसल्या होत्या. दारात चाहूल लागताच दातेंच्या पत्नीने दाराकडे नजर फेकली. तोच दारात आपले पतीराज असल्याचे तिला दिसले. ती एकदम चकीत झाली. ती तशीच सामोरी जाऊन म्हणाली,

''का आज मध्येच येणं झालं ?''

‘‘पाहुण्यांना आणलंय घरी !’’

इतका वेळ मागे न पाहिल्याने मागे असलेल्या मंगलला पाहून ती लाजली आणि पदर सारखा करून ती स्वयंपाकघरात गेली.

कुंदा मात्र तो प्रकार पाहून स्तंभितच झाली, कारण ही युती इतकी जमेल याची तिला कल्पनाच नव्हती. तिने एकदम विचारले,

‘‘काय नार्वेकर, इकडे कुठे आज पायधूळ झाडलीत ?’’

मंगल ही आश्चर्यचकित झाला. कुंदा येथे अचानक भेटेल याची त्याला कल्पनाच नव्हती आणि कुंदा दातेंची कोण ? हाही प्रश्न त्याला लागून राहिला. मंगल काही उत्तर देत नाही हे जाणूनच दातेंनी उत्तर दिले.

‘‘मीच आणलं त्यांना घरी ! आज तू फर्स्ट क्लास फर्स्ट आलीस ना ?’’

कुंदा जराशी लाजली. तोंडावर जरा पदराची चाळवाचाळव केली. दाते बूट काढून स्वयंपाकघरात गेले. कुंदाने नार्वेकरना खुर्चीवर बसण्यास सांगितले आणि समोरच्याच खुर्चीत स्वतः बसून तिने पहिल्याच प्रश्नाने मंगलचे हृदय बधीर केले.

‘‘कशी काय झाली अस्मतची मुलाखत ?’’

मंगलचा चेहरा एकदम उतरला.

हा प्रश्न उगीचच विचारला असे तिला नंतर वाटले.

‘‘ठीक !’’ त्याने गंभीरपणे उत्तर दिले आणि तो दुसरीकडेच निराशेने पाहू लागला.

‘‘उद्या केंव्हा जाणार तुम्ही? विषय बदलण्याच्या मिषाने तिने विचारले.’’

‘‘सकाळी सातच्या विमानाने.’’

‘‘तुम्हाला एक सांगू ?....’’

‘‘काय ?’’

‘‘अस्मतचा पत्रव्यवहार माझ्या नावावर करा. तुम्हाला काहीही लिहिणे असले तरी मला त्याच्याशी कर्तव्य नाही. येथे आलेला बंद लखोटा मी तसाच अस्मतकडे पोहचता करीन. नाहीतर तुमचा चाललेला पत्रव्यवहार तिच्या आईच्या लक्षात आला तर घोटाळा होईल. तुम्ही माझ्या नावावर पत्र पाठविण्यास मुळीच शंका धरू नका.....’’

''ठीक आहे.'' त्याने चिंताक्रांत मुद्रेनेच उत्तर दिले.

इतक्यात दातेही तेथे आले. थोड्या इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यानंतर मिसेस दातेंनी आणलेल्या फराळाच्या बशावर त्या तिघांनीही यथेच्छ ताव मारला. कॉफी वगैरे घेऊन ते निघण्याच्या तयारीत होते. इतक्यात दातेंनी बोलता बोलता विषय काढला.

''मि. नार्वेकर, एक म्हणणे ऐकाल कां माझे तुम्ही ?''

''काय ?'' त्याने आश्चर्याने विचारले.

''अस्मत शेखचा पत्रव्यवहार तुम्ही माझ्या अगर आमच्या कुंदाच्या नावावर करा. नाहीतर तिच्या स्वतःच्या नावावर जर पत्रव्यवहार केलात तर तिच्या आईला कळून ती चिडण्याचा संभव आहे.''

ती एकाच प्रश्नांची दुसरी आणि सुधारलेली आवृत्ती असल्याने मंगलने ठरलेलेच उत्तर दिले.

''ठीक आहे.''

कुंदाने एक मिस्कील हास्य केले.

नंतर लवकरच निरोप समारंभ होऊन मंगल आणि कुंदाचे मामा निघून गेले. कुंदाला तिच्या मामीने विचारले,

''काय ग कुंदा, कोण आहे हे ?''

कुंदा जराशी हसली आणि तिने सारी हकीकत आपल्या मामीला सांगितली.....

मंगलने इकडे घरी आल्यावर सर्व सामान बांधण्यास सुरुवात केली. लवकरच सर्व बांधाबांधी त्याने आटोपली. घरदार अगदी साफ केले आणि तो जेवायला निघून गेला. वसंतराव आज घरीच होते. कारण आज रविवार होता.

''जाणार ना उद्या आपली स्वारी ?'' वसंतरावांनी विचारले.

''होय.''

''पत्ता ठेवलाय ना जपून ?''

‘‘हो.’’

.....आणि इतर गप्पा गोष्टी करता करता ते दोघेजण जेवायला बसले. जेवता जेवता वसंतराव सांगत होते.

‘‘तेथे गेल्यावर आपला सदा असेल त्याच्याकडून काय लागेल ते घे. सदाला तेथली सर्व माहिती आहे, म्हणूनच त्याला तुझ्यासाठी ठेवले आहे. जागाही फार हवेशीर आणि विस्तृत आहे. बाजूला बाग बगीचा आहे. मी खरेदीपत्र लिहून सदाजवळ दिले आहे. त्यावर तू सही कर आणि मालकाकडे ते पोहोचते करण्यास त्याला सांग. तेथे गेल्यावर आजूबाजूची परिस्थिती जरा पाहा. शहरात चार दिवस हिंड. धंद्याचे अदमास काढ. तुला त्यातली माहिती आहेच थोडीफार. गुढीपाडवा जवळ आला आहे. त्याच मुहूर्तावर दुकान स्थापन करू. मी आदल्या दिवशी येईन तेथे. तुला त्या वेळी कमीजास्त माहिती मी करून देईनच. मी मधून मधून येत राहीन. तेथे गेल्यावर लवकरच घरकामाला आणि स्वयंपाकपाण्याकरीता एक बाई लावून टाक. खानावळीची बिलं भरीत बसू नकोस. दुकान सुरू झाल्यावर जाहिराती देऊन त्याची प्रसिद्धी आपण वाढवू या ! तुला स्वतंत्र धंदा करायला आता हिंमत आली पाहिजे. घाबरू नकोस. तुला ज्या वेळी अडचण भासेल त्या वेळी मला कळवीत जा. मी तुला मदत करायला त्वरित धावून येईन. तू त्याची मुळीच काळजी करू नकोस. आजपर्यंत तुला ज्याप्रमाणे जपलं, त्याच प्रमाणे पुढेही वागवणार आहोत. एवढंच की अप्रत्यक्षपणे ! तू जेथे जाशील तेथे आम्ही तुझे पाठीराखे आहोत. तुझ्या हाकेला मी धावून आल्याखेरीज कसा राहीन ? नवीन स्थान म्हणून बिचकू नकोस. पाण्यात पडल्याशिवाय पोहता येत नाही. तुला हे सांगण्याची काही जरुरी नाही. तुला तितके ज्ञान आता नक्की प्राप्त झाले आहे. आज जवळ जवळ दहा अकरा वर्षांनी तुझा विरह आम्हाला सहन करावा लागतो आहे. वहिनी आज सकाळ पासून रडते आहे. उषा तर सारखी सांगते की, दादाला पाठवू नका म्हणून, पण ती लहान बच्ची ! मोठ्या माणसांना जेथे प्रेमाचे पाश आवरता येत नाहीत तेथे त्या लहान आणि अज्ञान बालकांची काय कथा ? त्यांना काय सहन होणार विरह ? तिला तू जाणार हे अजून नक्की कळविलेच नाही. असो. पण तुला एकच सांगणे आहे ते म्हणजे आपल्या धंद्यात नेहमी सावधगिरीने राहा. नुकसानीची

बाजू शक्य तो डोक्याने टाळायची. त्याकरिता नेहमी दूरदर्शी धोरण ठेवावं लागत.....''

असेच उपदेशाचे डोस पाजता पाजता आणि पिता पिता दोघांचे जेवण झाले. सकाळी यायला वेळ मिळणार नाही म्हणून निरोप समारंभ आताच आटोपायचा होता. वहिनी – वसंतरावांच्या पत्नी – रडू लागल्या होत्या. नाहीतरी बायकांचा तो एक गुणधर्मच असतो की कुणी कुठेही जायला लागलं की, रुदनास्त्र सोडायचं! उषा झोपली होती. मंगलने बडीशेप तोंडात टाकली. वसंतराव जे काही उरलेसुरले तुटपुंजे सांगत होते ते ऐकत तो बडीशेप चघळीत होता. जवळ जवळ साडेदहा वाजले होते. आपल्या घड्याळाच्या आज्ञेने त्याने तेथून लवकर निघायचे ठरविले. तो वसंतरावांच्या पाया पडला. त्यांचे घराणे जुन्या पद्धतीचे होते. सोवळे, ओवळे, देवधर्म, रीतिरिवाज सर्व काही तेथे व्यवस्थित पार पडत असे. त्यामुळे मंगल जे काही करीत होता, ते त्याच्या मनाला पटण्यासारखे नसले तरी ते करावे लागत होते. नंतर तो वहिनींच्या पाया पडला. वहिनीने त्याला उठविले. डोळ्यातील पाणी कायम ठेवून करुण स्वरात त्यांनी त्याला तुटक दोन शब्द सांगितले.

''मंगल, विजयी हो बाळ ! अडचण भासली तर तसे कळवीत जा! परक्या गावात जातो आहेस. जपून रहा. वारंवार पत्र पाठवीत जा. जा ! जा आता फार काय सांगू तुला ? जा. यशस्वी हो राजा......''

अशा प्रकारे दोघांचा निरोपसमारंभ झाल्यावर मंगल झोपलेल्या उषाकडे गेला. त्याच्या डोळ्यात अश्रू चमकू लागले. रोज बिस्किटासाठी हट्ट धरणारी उषा! पुन्हा त्याला हट्ट धरायला कोण मिळणार होतं ? त्याने उषाच्या सात्विक चेहऱ्याकडे एकदा पाहिले. उद्या सकाळी जेवणाचे वेळी तिला माझी बरोबर आठवण येईल. त्या वेळी ती आकांडतांडव करील. मला सांगून का नाही गेला दादा ? असे म्हणेल. काय सांगणार तिला हे ? कशी घालणार तिची समजूत ? त्याला फार वेळ तिच्याकडे पाहवेना. त्या गुलाबी चिमुकल्या गोंडस गालाचा एक गोड पापा घेऊन तो बाजूला झाला. रुमालाने डोळे पुसले आणि कोट चढवता चढवता खिशातील बिस्किटाचा पुडा त्याने वसंतरावांच्या हाती दिला.

''उषाकरिता !'' एवढेच शब्द तो उच्चारू शकला, आणि त्याने त्याचा निरोप घेतला........

# १०.

दुपारचे सुमारे दोन वाजले असतील. रत्ना जेवणखाण करून एक स्वेटर विणीत बसली होती. ती बरीच विचारमग्न दिसत होती. तिच्या चेहऱ्यावर काळजीची छाया पसरली होती. सकाळपासूनच ती फार चिंतातुर दिसत होती. सकाळी दहा वाजता एका बटन्स मिलमध्ये तिला इंटरव्ह्यूला बोलाविले होते, पण त्यामध्ये ती अयशस्वी झाली होती. असेच जर विनानोकरीचे दिवस गेले तर काही दिवसांनी रत्नाला 'ओम भवती' करीता हातात झोळी घ्यायची पाळी येईल.... आणि बरोबर हाच विचार तिला भेडसावीत होता. असा विचार एखादे वेळी तिच्या मनात आला की पुढच्याच क्षणी आत्महत्येचा विचार तिच्या मनात दत्त म्हणून उभा राही. पण फार मुश्किलीने तो विचार रत्ना टाळीत असे. निसर्गाशी झगडण्याकरिता मानवाचा जन्म आहे असे तिचे ठाम मत होते. आत्महत्या करणं म्हणजे भेकडपणा ! जीवनात मरणाची कल्पना म्हणजे दुधात मीठ ! जीवनात जगण्यासारखे काहीतरी असेपर्यंत मरणाची कल्पनाही मनात आणू नये. हे तिला माहित होते, पण तिच्या जीवनात तसे काय होते ? ना मायेचे माणूस ! ना पैसा ! ना प्रेम !! कशाकरिता तिला जगायचे होते ? पण मानवी मनाची घडणच अशी आहे की, कितीही कठीण परिस्थितीतून मनुष्य मार्ग काढण्यास तयार होईल, पण मरणाची कल्पना त्याला सहसा सहन होणार नाही. रत्ना त्याला थोडीच

अपवाद होती ! खडतर परिस्थितीतूनही मार्ग काढीन असे रत्ना आपल्या दुसऱ्या मनाला नेहमी बजावून सांगत असे. पुष्कळ वेळ विचार केल्यावर तिला कसलीतरी आठवण झाली. ती तशीच उठली. शेजारच्या दीक्षितांकडे गेली. आणि टाइम्स घेऊन आली. पहिले पान उलटून तिने 'wanted' चा कॉलम वाचण्यास सुरुवात केली. आठदहा जाहिराती नजरेखाली घालून एका जाहिरातीवर तिची नजर दृढ झाली.

**Wanted**

A lady assistant for the domestic work, immideately.
Meet 4 to 6 p.m. at Vijay Watch Co.
904, Chandani Chowk, New Delhi.

तिच्या विचारला ही चालना मिळाली. ही कंपनी नवीन असावी हे तिला साधारण कळून चुकले. तिच्या मलूल चेहऱ्यावर क्षणभर हास्य चमकले. तिला आशेचे किरण दिसू लागले. तिने प्रयत्न करण्याचे ठरविले. सरकारी नोकरी मिळणं जरा कठीणच जात हे ती जाणून होती. म्हणून तिने सध्या तरी हा मार्ग पत्करायचे ठरविले. तिने पेपर परत नेऊन दिला. तेंव्हा दीक्षितांच्या वहिनीने विचारले,

''आहे का एखादी जाहिरात आज ?''

''आहे ना !'' तिने आशायुक्त नजरेने उत्तर दिले आणि घाईघाईने ती आपल्या खोलीत आली. वेणी घालून, तोंड वगैरे धुवून, कपडे बदलून ती जायला निघाली. दाराला कुलूप लावून हातातल्या पर्सशी चाळे करीत ती जिना उतरून रस्त्यावर आली.

ती जरा घुटमळली.

चांदणी चौक म्हणजे दीड मैल अंतर तोडावे लागेल जवळ जवळ ! व्हिक्टोरिया ने जावे का ? पण नको... पैशाचा असा अपव्यय सध्या तरी नको. अशा प्रकारे तिच्या दोन मनांचे काहीतरी खलबत होऊन शेवटी तिने पायीच जायचे ठरविले...

सुमारे पाचच्या सुमारास ती चांदणी चौकात आली. तेथे विजय वॉच कंपनी कुठे आहे त्याची चौकशी केली. लवकरच तिला ते दुकान सापडले आणि तळमजल्यावरचे भव्य दुकान पाहून तिला तेथे आशा वाटू लागली. तिने दुकानात असलेल्या इसमाजवळ मालक कुठे आहेत म्हणून चौकशी केली. त्या इसमाने

माडीवर येऊन तिला ती खोली दाखविली आणि तो पुन्हा खाली गेला. तिने दारावरचे बटण दाबले. कोण आहे? आतून आवाज आला. आवाजामागोमागच एक तरुणही आला.

''कोण आपण ?'' त्याने विचारले.

''रत्नकांता दिवेकर ! जाहिरात दिली होती ना तुम्ही आज ?''

''ओ हो ! त्याकरिता आलात काय तुम्ही ?'' त्याने हसत विचारले.

''चला ना आत चला...'' असे म्हणत तो तरुण आत जाऊ लागला. रत्नाही त्याच्यामागोमाग आत गेली. तो तरुण आत जाऊन एका खुर्चीवर बसला. आणि समोरच्या खुर्चीकडे बोट दाखवून तो म्हणाला,

''बसा ना त्या खुर्चीवर !''

रत्ना अवघडल्यासारखी खुर्चीच्या एका टोकावर बसली. कारण एका थोर आणि धनिक व्यक्तीसमोर खुर्चीवर बसणे तिला प्रशस्त वाटेना.

''शिक्षण किती झालय तुमचं ?''

''एस.एस.सी. पास झाले आहे.''

''किती मार्क्स आहेत ?''

''६७ टक्के.''

''मग इतके मार्क्स असून अजून कुठेच नोकरी लागली नाही? बरं, घरी कोण आहे ?''

''कोणी नाही ! मी एकटीच !'' एक दीर्घ सुस्कारा सोडून तिने उत्तर दिले.

''एकट्याच ?'' त्याने आश्चर्याने विचारले.

''कुठे रहाता तुम्ही?''

''ईस्ट पटेल नगरला !''

''इतक्या लांब ?''

''हो.''

''बरं ते असू द्या ! तुम्हाला जमेल ना येथील काम ? घरातील सर्व काम करावं लागेल. सकाळी सहा वाजल्यापासून सायंकाळी आठ वाजेपर्यंत येथे राहावे लागेल. काम काय फक्त दोन माणसांचे.''

''हो. न जमायला काय झालं ?''

पण पगाराची काय अपेक्षा आहे तुमची ?''

''तुम्हीच ठरवा.'' ती चाचरत म्हणाली.

''पण तुम्ही सांगा ना काही !''

''तुम्हीच सांगा.''

''जेवून खाऊन ६० रुपये महिना.''

जरासा विचारी चेहरा केल्यानंतर तिच्या मुखावर हास्य चमकले. तिला तो पगार पुष्कळ वाटला. तिने लगेच होकार दिला. रत्नाला जवळ जवळ स्वर्गानंद झाला होता. तिला आज कित्येक प्रयत्नानंतर यश मिळालं होत! तिची काळजी दूर झाली होती. तिला एक प्रकारचे विजयी अवसान प्राप्त झाले होते. आनंदाच्या भरातच तिने त्यांचा निरोप घेतला. रस्त्यावर आल्यावर तिला जरा घसा शेकावा असं वाटलं. समोरच एक हॉटेल होते. ती तशीच हॉटेलमध्ये गेली. फॅमिली रूममध्ये जाऊन तिने एक गरम सामोसा मागवला. चहा घेतला नि बिल चुकते करून ती बाहेर आली. तिचे पाय पायी घरी जायला आता तयार नव्हते. तिने बारा आण्याला एक व्हिक्टोरिया बोलाविली आणि ती घरी आली. दीक्षितांच्या वहिनी दारातच उभ्या होत्या. रत्नाचा आनंदी चेहरा पाहताच त्यांनी विचारले,

''मिळाली वाटत नोकरी ?''

''हो.''

''कधीपासून ?''

''उद्यापासून.''

''बरं झालं बाई! इतके दिवस जीव खाल्ला तुझा त्या नोकरींनी !''

''हं. आता काय त्याचे ?'' असे म्हणतच तिने  कुलूप उघडले आणि ती घरात गेली. उल्हसित मनाने ती गाणेही गुणगुणू लागली. अत्यानंदामुळे ती आज सर्व काम संगीतमयच करीत होती. तिने कपडे बदलले. हातपाय धुवून ती स्वयंपाकाला लागली. लवकरच स्वयंपाक करून, जेवून सर्व कामे आवरून ती बाहेरच्या खोलीत आली. तरीही तिचे संगीत चालूच होते. हातपाय पुसून ती बिछान्यावर पडली. लवकरच तिला झोप लागली. आज तिला शांत झोप लागणे साहजिकच होते....

*****

# ११.

मंगलने दिल्लीत आल्यापासून एक नवीन उपक्रम सुरू केला होता. पहाटे चार वाजता तो उठत असे. सदा त्यापूर्वीच उठून हिटरच्या साहाय्याने पाणी तापवून ठेवत असे आणि पाणी तापवल्यावरच तो मालकांना उठवायला जात असे. मंगल उठला की सर्व प्रातर्विधी आटोपेपर्यंत सदा चहा तयार करीत असे. आणि मंगलचे सर्व काही आटोपले की भल्या पहाटे साडेचारला तो चहा चेष्टामस्करी करीत ते घेत. सदा त्या घरात नोकर म्हणून होता. पण मंगलने त्याला नोकर या नात्याने कधीही वागवले नाही. कामाव्यतिरिक्त सदा आपला पार्टनर आहे अशा अविर्भावाने मंगल त्याला वागवत असे. सदाही मंगलच्या घरात आनंदाने राहात होता. अशा खेळीमेळीच्या वातावरणात पहाटेचा तो चहा झाला की मंगल फिरायला निघे. गॅरेजच्या बाहेर स्वतःच गाडी काढून तो स्वतःच ड्रायव्हींग करीत असे. आणि दूरवर कुठेतरी जाई. आजही शहराबाहेर टेकडीवजा ठिकाणी तो फिरायला गेला होता. टेकडीच्या पायथ्याशी हिरवी हिरवळ इतस्ततः पसरली होती. त्याच्यावर दवबिंदूचे थेंब चमकत होते. पूर्व दिशेकडे अंबरपथावरून कोणीतरी गुलाल उधळीत येत असल्याची सूचक चिन्हे दिसत होती. आजूबाजूला पडलेल्या अस्पष्ट धुक्यातून तो देखावा अतिशय नयनमनोहर दिसत होता. गार आणि मंद वारा अंगाला सुगंधी स्पर्श करून जात होता. आकाशात

पिंजारलेल्या ढगांच्या तो सुंदर वाती वळत होता. क्षितीजाच्या कडेला दिसणारे निळे निळे डोंगर निसर्गाची कलाकुसर  नि रंगसंगती स्पष्ट करून दाखवीत होते. दूरपर्यंत स्पष्ट दिसणारी कॉंक्रीटची सडक सुंदर आणि शांत भासत होती. दुरून दिसणारे दिल्ली शहर नुसत्या मोठमोठ्या इमारतींनी सुशोभित असल्याची ग्वाही देत होते. इमारतीची कौलारू छपरे, सिमेंट कॉंक्रीटच्या गच्च्या आणि त्यातूनही मधून मधून झाडाची गर्दी, लाल किल्ल्यावरील तिरंगी निशाण.... सारे सारे तेथून दिसत होते. त्याला ते सारे दृश्य अतिशय नयनमनोहर आणि आल्हादक वाटले. दिल्लीच्या याच आजूबाजूच्या क्षेत्रात कित्येक क्रांत्या घडल्या. कौरव पांडवांचे अठरा दिवसाचे प्रचंड आणि घनघोर युद्ध याच भूमीवर झाले. भारतात प्रवेश करताना पहिला मुसलमान राज्यकर्ता बाबर याने याच भूमीवर आपली समशेर गाजवली. याच भूमीवर पराभूत होऊन मराठे देशोधडीला लागले. याच भूमीवर इंग्रजांनी काय करायचं ठेवलं होत?......इतिहासाची पाने मंगलच्या डोळ्यापुढून भराभर पुढे सरकू लागली. त्याचा उर दाटून आला. ज्या भूमीवरून रक्ताचे पाट वाहिले, ज्या भूमीने अनेक राज्यक्रांत्या पहिल्या, ती भूमी आज इतकी शांत नि रम्य भासते आहे.....जमदग्नीचा राग मावळल्याचा भास होतो जणू!  सागराने आपली गंभीरता, आकाशने आपली विशालता सोडून द्यावी तशातलाच तर हा प्रकार नाही ना? हा प्रश्न मनात उभा रहातो. ज्या ठिकाणी शरपंजरीच्या शय्येवर भीष्माचार्यानी आपले कायमचे निद्रासुख घेतले....त्याच कुरुक्षेत्राच्या या विशाल भूमीवर हिरव्यागार मऊ गवताची शय्या निर्माण व्हावी? त्याला ही घटना काहीशी विचित्र वाटली. ज्या ठिकाणी वीरांचे शौर्य पाहून वारा वाहायचा थांबे... ज्या ठिकाणी तलवारीचे खणखणाट ऐकण्यासाठी ढग निस्तब्ध उभे रहात... हुतात्म्यांच्या शब्दासाठी सूर्यनेसुद्धा ज्या ठिकाणी लवकर मावळावे.... जी भूमी नेहमी रक्ताने न्हालेली असे.... जी भूमी नेहमी क्रांत्यासाठी हपापलेली असे... तीच भूमी आपल्या पृष्ठभागावर हिरव्या गवताला आश्रय देते... दवबिंदूंनी न्हाते.... वाऱ्याचेच गुणगुणणे ऐकते... तेच तेच सूर्यदर्शन रोज घेते.... जणू आजपर्यंत केलेल्या, घडवून आणलेल्या रक्तपाताचा नि पापाचा या कुरुभूमीला पश्चात्ताप होऊन दवाश्रूंनी डबडबलेल्या नेत्रांनी ती सूर्यनारायणाला वंदन करून केलेल्या पापाचे क्षालन करण्याविषयी विनवीत असावी!

मंगलला तीच शांतता आता भयाण वाटू लागली. त्याच्या सर्वांगावर भीतीने रोमांच उभे राहिले. 'आज आहे तर उद्या नाही' हे सत्य त्याला पटले. 'आजचा सम्राट उद्याचा भिकारी असू शकेल' हे अर्धसत्य त्याला आज पूर्ण सत्य वाटू लागले. ती शांतताच त्याला भीतीप्रद वाटू लागली. दुरून त्याला एक नवयुवक आणि नवयुवती येताना दिसले. अगदी हसत खिदळत प्रेमसागरात डुंबत ते येत होते. मंगलने त्यांच्याकडे एक नेत्रकटाक्ष टाकला. ज्या भूमीवर दोन पक्षांमध्ये घनचक्कर होऊन वायूअस्त्र, जलअस्त्र, अग्निअस्त्र सुटली त्याच भूमीवर दोन भिन्न जीवांमध्ये मिलनासाठी प्रेमास्त्र सुटू लागली. इतिहासाचा अपमान वाटला त्याला हा ! त्याला ते दृश्य पाहवेना ! तो तसाच उठला. आणि त्याने आपली गाडी वळवली. त्याचे विचारचक्र मात्र जोराने फिरू लागले. त्या नवयौवनाने मुसमुसलेल्या आणि सौंदर्याने बहरलेल्या नवयुवतींकडे पाहून त्याला अस्मतची आठवण झाली. तिला तो जवळजवळ लाथाडून इथे आला होता. ती तिकडे रडत कुथत दिवस कंठीत असेल हेही त्याला माहित होते. त्याला मागचा प्रसंग आठवला. कॉटवर पडलेल्या आजारी नि व्याकूळ अस्मतला तिच्या आईने जवळ जवळ ओढीतच कसे घरी नेले ? ते चित्र मूर्तिमंत त्यांच्या मनःचक्षूपुढे उभे राहिले. त्याच्या डोळ्यातून नकळत दोन अश्रूबिंदू ठिपकले. अस्मतकडे त्याचे मन जोराने ओढ घेऊ लागले. अस्मतच्या विचाराने तो बेचैन झाला. त्याच्या मनात एक विचार चटकन चमकून गेला. आपण अस्मतलाच इथे आपली कम्पॅनियन म्हणून घेऊन यावे. आयते घरातले कामही कमी होईल आणि मानसिक विरहसुद्धा कमी होईल. पण दुसऱ्याच क्षणी गोषातली स्त्री त्यांच्या अंतःचक्षूपुढे उभी राहिली. त्याबरोबर त्यांनी एक दीर्घसुस्कार सोडला. त्याला ते अशक्य वाटले. त्याने तो विचार चटकन सोडून दिला. आपण मुंबईला जाऊन तिला एकदा भेटून यावे असे त्याला वाटले, पण तोही विचार त्यांनी सोडून दिला; कारण आता मुंबईला जाणे म्हणजे शुद्ध थिल्लरपणा दिसतो. वसंतराव आपल्याला काय म्हणतील ? हाच प्रश्न त्याला भेडसावू लागला आणि एकदा मुंबईला जायची चटक लागली, तर पुन्हा पुन्हा जावेसे वाटेल आणि दुकानाचे काम चालणार नाही. वसंतरावांकडून आपला रहावा तितका मान राहणार नाही. एका हिंदू तरुणाने मुसलमान तरुणीवर प्रेम करावे हे सनातनी वसंतरावांना पटणार

नाही. मग काय करावे ? अस्मत! तुझ्याकरिता मी काय करू आता?.....

असा विचार करीतच मंगल घरी आला. गाडी गॅरेजला लावून तो दुकानात शिरला. त्याने एकदा आपल्या रिस्टवॉचवरून नजर फिरविली. सात वाजले होते. आज बराच उशीर झाला होता त्याला परत यायला! त्याने दुकानात बसलेल्या सदाला विचारले,

''आली का रे ती ?''

''होय मालक, सहा वाजताच आली.''

''मग ?''

''मग काय ? मी तिला सर्वसाधारण स्वयंपाकघरातील माहिती देऊन खाली आलो.''

''ठीक आहे.'' असे म्हणून मंगल वरती गेला.

रत्नाने डाळ शिजत टाकून भाजी चिरायला घेतली होती.

''चहा करून घेतलात का ?'' पाठमोऱ्या रत्नाला मंगलने विचारले.

''नाही.'' तिने चमकून उत्तर दिले.

''घ्या ना करून मग !''

''कशाला ? मी घरून घेऊन आले आहे.''

''घरी घेऊन आला असाल! पण इथे घ्यायचा नाही असे काही आहे काय? आणि आम्हालाही आता चहा घ्यायचा आहे.''

जास्त काही न बोलता तिने स्टोव्ह पेटवला आणि चहाचे आधण ठेवू लागली.

''तीन कप ठेवा हं !''

''बरं!'' असे म्हणून तिने तीन कपाचे आधण ठेवले.

मंगल बाहेरच्या खोलीत आला. जरा इकडे तिकडे करू लागला. उगीचच कपाट उघडून दोनतीनदा आरशात पाहिले. उगीचच एकदोनदा त्याने नॅपकिनला तोंड पुसले. मध्येच एकदा गालातल्या गालात हसला. नंतर तो एकदा गॅलरीत येऊन उभा राहिला. एवढ्यात आतून आवाज आला....

''झाला हं चहा !''

मंगल भानावर आला आणि आत गेला. तिने एक कप भरून त्यांच्यापुढे ठेवला. दुसरा कप भरून ती त्यांच्या कपाच्या बाजूलाच ठेवीत म्हणाली,

''दुसरा ?''

मीच काही दोन कप नाही पिणार !'' दोन कप पुढ्यात पाहून तो म्हणाला,

मी कुठे तसे म्हटले ?'' तिने लाजून मान खाली घातली.

''सदा येईल आता. तुम्ही घ्या ना !''

''तुम्ही घ्या. मी घेते मग.''

''मग कशाला ? आत्ताच घ्या ना.''

मंगलच्या या आग्रहाने रत्नाच्या चेहऱ्यावर असे काही भाव उतरले की बहुधा तिला तो आग्रह पसंत नसावा असे त्याला वाटले, पण मंगलने तसे सांगताच तिसऱ्या कपात चहा ओतला आणि न बोलता दोघांनीही चहा घेतला. मंगल चहा घेऊन खाली दुकानात आला आणि सदाला म्हणाला,

''जा. चहा घेऊन ये !''

सदाला रोजच्यापेक्षा हे शब्द वेगळे असे कानाला भासले. कारण रोज यावेळेला सांगितले जात होते, 'जा सदोबा, हायक्लासपैकी चहा तयार करा आता !' आज तयार केलेला चहा मालक पिऊन यायला सांगत होते. त्याने विचारले,

''तुम्ही घेतलात का ?''

''मी आलो घेऊन ! मी कसा राहीन ?''

सदाने स्मितहास्य करीत मंगलकडे एक दृष्टिक्षेप टाकला. त्याच्या चेहऱ्यावर झालेले बदल कळून न येण्याइतका सदा दूधखुळा नव्हता. ते बदललेले भाव पाहून सदाची चेष्टेखोर वृत्ती जागी झाली आणि त्याने जाता जाता एक टोला सहज ठेवून दिला.

''आज चहा मात्र रोजच्यापेक्षा मस्त झाला असेल.''

मंगलने त्याच्याकडे चमकून पाहिले. पण तेथे सदा होता कुठे? त्याची अस्पष्ट पाठमोरी आकृती जिना चढताना दिसत होती फक्त! मंगल हसून हसून स्वतःशीच पुटपुटला...

आजचा बदल यालाही जाणवला वाटत !....

सदा वरती आला आणि दारात उभा राहिला. स्टोव्हजवळ एक कपबशी भरलेली होती. रत्ना पाठमोरी भाजीच चिरत होती. सदा म्हणाला,

''हाच का माझा चहा ?''

''हो'' ती वळून पहात म्हणाली,

''तू घेतलास का ?''

''घेतला ना !''

सदाने तो कप उचलला आणि तोंडाला लावला. रत्ना त्यांच्याकडे पाहू लागली आणि तिच्या मनात कसली तरी वावटळ सुरू झाली. तिचे अंतःकरण दाटून आल्याचे प्रतिबिंब तिच्या डोळ्यात दिसत होते. डोळे डबडबलेले होते तिचे! तिने मान फिरविली आणि पदराने आपले डोळे पुसले. खालच्या मानेने ती पुढचे काम करू लागली. सदाने चहा घेतला आणि जाता जाता तो म्हणाला,

''दहा वाजता लागतं हं मालकांना जेवायला !''

''हं '' तिने नुसता हुंकार दिला.

सदा निघून गेला. रत्नाच्या दुःखाचाही बहर कमी झाला. तिने भराभर स्वयंपाक आटोपला. दहा वाजायला आले असतील हे तिने अंदाजानेच ताडले. आणि तिने पाटपाणी केले. इतक्यात सदा आला. पाटपाणी घेतलेले पाहताच त्याला फार बरं वाटलं. न सांगता अगदी वेळेवर काम ! त्याला त्या स्त्रीचे फार कौतुक वाटले. तो पुन्हा मालकांना बोलवायला जाण्यापूर्वी म्हणाला,

''अगदी बरोबर वेळेवर आटोपलं हं !''

रत्नाला ते शब्द ऐकून आणि तेही सदाकडून, फार बरं वाटलं!....

नंतर जेवणखाण आटोपून मंगल, सदा दुकानात निघून गेले. रत्नाने बाकीची कामे आटोपली. सदानी सांगितल्याप्रमाणे आता जवळ जवळ तीन तास रत्नाला काहीच काम नव्हतं. आता तीन तासांनी चहा करावा लागणार होता तेवढाच. तांदूळही निवडलेले होते. त्यामुळे निवडायलाही काही नव्हते. ती नुसतीच बसून राहिली. तिला आज अशी कल्पनाच आली नाही की आपणाला काही रिकामा

वेळ मिळेल. पण तिला आता तीन तास काय करावे याचे कोडे पडले. तिला जर असे कळले असते तर घरी पडलेले स्वेटर, टेबलक्लाथचे अर्धवट काम तिने घेऊन येण्याचा विचार केला असता! पण तिला याची पूर्वी कल्पनाच नव्हती. तिने उद्यापासून विणायला आणायचे ठरविले आणि दाराला कडी लावून तेथेच जरा ती लवंडली. मध्येच ती दचकून उठली. तिला एकदम कोणीतरी आल्यासारखे वाटले. म्हणून तिने दार उघडले, पण दरवाजात कोणीच नव्हते. ती स्वतःशीच हरवल्यासारखी झाली आणि तोंड धुवून ती पुन्हा गॅलरीत येऊन उभी राहिली. इतक्यात सदा आला आणि चार कप चहा करायला सांगून तो निघून गेला. तिनेही पुन्हा कामाला कंबर कसली......

असेच दिवसामागून दिवस जात होते. रत्नाही आनंदात होती. तिला कसलीच ददात नव्हती. सकाळी सहाला ती मंगलच्या घरी यायची आणि सायंकाळी साडेसात आठला निघून जायची. दुपारी रिकाम्या वेळात स्वेटर, टेबलक्लाथ, गंजीफ्रॉक वगैरे विणीत असे. तिचा दिनक्रम हल्ली आनंदात चालला होता. कामाचाही तिला त्रास वाटत नव्हता. कारण स्वतःसह तीन माणसांचे ते किती काम असणार? शिवाय पगार भरपूर होता आणि रोख मिळत असलेले साठ रुपये शिलकेतच पडत होते, कारण इतर असा विशेष काय खर्च होता? ती या घरात आल्यावर जी दुःखी होती ती एकाच कारणामुळे... आणि ते म्हणजे सदा. सदाला पाहिल्यावर तिच्या पूर्वस्मृती दाटून येत ! तिला आपल्या पित्याची आठवण येई. असेच तिचे वडील होते. आणि त्या आठवणींमुळे घरच्या सर्व आठवणी एकदम संकलित होत! मग तिला भडभडून येत असे. दोन अश्रूबिंदू डोळ्यातून ठिबकत. पदराने ती डोळे पुसू लागे. ही गोष्ट अजूनही विशेष कोणाच्या लक्षात आलेली नव्हती आणि कोणाच्या लक्षात यावी असे तिलाही मुळीच वाटत नसे. पण मनासारखे तिच्या नशिबात कधी घडले आहे असा अनुभव तिला क्वचितच होता.

एक दिवस दुपारी रत्ना तांदूळ निवडीत बसली होती. दुकानात कोणीतरी पाहुणे आले होते, म्हणून मंगलने सदाला चहा करायला सांगण्यासाठी वर पाठविले.

सर्व काम आटोपून रत्ना नुकतीच तांदूळ निवडीत बसली होती हे सदाला माहीत होते, म्हणून तो स्वतःच चहा करायला लागला. हे पाहून तिने विचारले,

''काय करता सदाकाका ?''

''चहा करतो आहे. पाहुणे आलेत खाली.''

''मग मी करते ना. मला का नाही सांगितलंत ?''

''तू आत्ताच दमून भागून बसली आहेस बाळ. बस. मी करतो. काय मोठं नाही त्यात !''

रत्नाला काय बोलावं हेच सुचेना. तिने पुन्हा एकदा सदाकडे पाहिले. ते प्रेमळ शब्द ऐकून आपला पिताच तर नव्हे ना हा? अशी प्रेमळ भावना तिच्या मनाला चाटून गेली. तेच मायेचे शब्द तिच्या कानात घुमू लागले. तिचे डोळे भरून आले. आज तिला नुसत्या मुखदर्शनाने पित्याची आठवण झाली नव्हती. तर वडिलांच्या स्वभावातले प्रेमाचे अंतःकरण खुले झाले होते. तिला आपले अश्रू आवरता येईनात. ती तशीच उठली आणि बाहेरच्या खोलीत आली. आपले डोळे पुसू लागली, पण ही तिची सारी हालचाल सदाच्या डोळ्यातून सुटली नाही. रत्नाला कसलेतरी दुःख झाले हे त्याने जाणले आणि तोही तसाच बाहेर आला. त्याने तिला विचारले,

''काय झालं रत्ना ?''

''काही नाही.'' डोळे पुशीतच तिने उत्तर दिले.

''चहा मी केला म्हणून वाईट वाटायला काय झाले ?''

''चहाबद्दल नाही.'' तिला अधिकच मोठा हुंदका आला.

''मग काय झाले ?'' सदाही जास्त घोटाळ्यात पडला. त्याला मग काय झाले असावे हेच कळेना आणि रत्नाही काही बोलेना. तेंव्हा तो तिच्याजवळ जाऊन तिच्या डोक्यावरून हात फिरवीत म्हणाला,

''रत्ना, बाळ, काय झाले सांग ना ! या म्हाताऱ्याच्या हातून काही तुझा अपमान झाला का ?'' तिला अधिकच भडभडून आले. शेवटचे सदाचे शब्द तर तिच्या जिव्हारी लागले. तिने 'काका' म्हणून सदाला मिठी मारली आणि हुंदके देत तिने काहीसे अस्पष्ट शब्द उच्चारले.

''काका, तुम्हाला पाहिलं की वडिलांची आठवण येते मला!....''

फारसे बोलण्याची तिला जरुरी भासली नाही. सदाला जे समजायचे ते त्या एकाच वाक्यात समजले. पित्याच्या आठवणीने आणि तेही माझ्याकडे पाहून ती रडत होती. ते त्याला तत्क्षणीच कळून चुकले आणि तिचे सांत्वन करीतच त्याने चहाही तयार केला. तो चहा घेऊन खाली गेला. रत्नाला मधून मधून हुंदके येतच होते. संध्याकाळपर्यंत सारा वेळ असाच दुःखात गेला.... रडत गेला.....

संध्याकाळी जेवताना मंगलने सहज तिच्याकडे पाहिले. तिचे डोळे सुजलेले होते. ती यापूर्वी खूप रडली असावी हे त्याने ताडले. पण का रडली हे कळणार कसे ? अचानकपणे तिला रडायला काय झाले ते त्याला समजेना. स्पष्ट विचारलेच आणि तिच्या भावना त्यामुळे दुखावल्या गेल्या तर ! म्हणून त्याने स्पष्ट विचारण्याची कल्पना सोडून दिली. त्याने काहीतरी ठरविले. कसाबसा जेवून तो खाली निघून गेला.......

*****

# १२.

आठ वाजता दुकान बंद करून सदा आणि मंगल वर आले. रात्र चांदणी होती. मंगल गॅलरीत उभा होता. त्याला पिठासारखे स्वच्छ पडलेले चांदणे पाहून फिरायला जायची इच्छा झाली. त्याने आपला विचार सदालाही बोलून दाखविला. अर्थात सदाला आपल्या मालकाचा हा लहरी स्वभाव नेहमीचा माहीत असल्याने त्याला आजच्या या फिरायला जाण्याच्या विचाराचे फारसे नवल वाटले नाही, पण त्याची मनःस्थिती फिरायला जायची नसताना अचानक याच वेळी फिरायला जायचा विचार काढला हे मात्र चमत्कारिक वाटल्याखेरीज राहिले नाही. तरीपण आपले विचार मालकांना कळू न देण्यासाठी तो ताबडतोब हो म्हणाला होता. आणि बिछाने वगैरे टाकल्यावर सदाने घराला कुलूप लावले आणि ते दोघे पायीच फिरायला निघाले. रस्त्याने जाताना कुणीच काही बोलत नव्हते. पुढच्या चौकात आल्यावर ते एका हॉटेलमध्ये जाऊन चहा प्याले. पुन्हा तसेच ते मुक्या तोंडाने चालू लागले. फिरत फिरत ते एका पार्कमध्ये गेले. एका बाकावर जाऊन मंगल बसला. तेंव्हा सदाही त्या बाकावर जाऊन मंगल शेजारीच बसला. सदा स्वतःच्या विचाराच्या तंद्रीत होता. मंगलही स्वतः विचार करीत होता की सदाला आपण काय विचारावे ? शेवटी थोड्या वेळाने त्याने काहीतरी विचारावे म्हणून विचारले,

''सदा, आज बोलत का नाहीस ? कसला विचार करतो आहेस ?''

सदा तंद्रीतून एकदम भानावर आला. आपल्या विचारी चेहऱ्यावरून मालकांना काहीतरी शंका आल्याचे त्याला स्पष्ट कळून चुकले. आणि त्यात काही खोटे नव्हते. सदाच्या चेहऱ्यावरून मंगलची शंका दुणावली होती. सदाने सावधान राखून उत्तर देण्याचा प्रयत्न केला.

''काय बोलू? आपणच बोलत नाहीत.''

मंगलला त्याच्या या अनपेक्षित उत्तराचे आश्चर्य वाटले. त्याने एवढे मात्र जाणले की, असे किरकोळ प्रश्न विचारून आपले इच्छित काही साध्य होणार नाही. तेंव्हा प्रत्यक्ष मुद्याला हात घालावा असे त्याने ठरविले आणि स्पष्टच विचारले,

''काय रे सदा, संध्याकाळी रत्ना का रडत होती ?''

सदा मात्र एकदम चमकला, कारण ही भानगड मालकांना कशी माहीत झाली ? हाच पहिला प्रश्न त्याच्या मनात दत्त म्हणून उभा राहिला. मगापासून मालक काही बोलत नव्हते याचे कारण हेच असावे आणि आता मात्र सदाला खरेखुरे उत्तर देणेच भाग होते. त्याचे दुसरे एक मन सांगत होते की, मालकांना ते सांगितले म्हणून काय बिघडते? पण त्याला आडकाठी त्याच्या एकाच कल्पनेमुळे येत होती. गरिबांच्या संवेदना श्रीमंतांकडे नेऊ नयेत अशी त्याची समजूत होती. आणि म्हणूनच त्यांनी त्यांना न कळू देण्याविषयी दक्षता घेतली होती पण आता त्याचा नाईलाज होता.

''मला पाहून तिला तिच्या वडिलांची आठवण झाली.''

सदा अगदी गंभीरपणे म्हणाला. पण एवढा वेळ सुन्न डोक्यानी आणि गंभीरपणे विचार करणाऱ्या मंगलला हसू आल्याखेरीज राहिले नाही. कारण हाच विचार किती दिवस त्याच्याही डोक्यात घोळत होता. सदाला पाहिल्यावर मंगललाही आपल्या वडिलांची आठवण येई आणि याच कारणास्तव मंगल सदाला नोकर या नात्याने न वागवता जोडीदाराप्रमाणे शक्य तो वागवीत असे. पण ह्याच नात्याचा विचार रत्नाकडून आणि त्यातल्यात्यात अगदी इतक्या गंभीरपणे अपेक्षिला जावा याचे त्याला हसू आल्याखेरीज कसे राहील? त्याचे हसणे पाहून गंभीरपणे बसलेला

सदा एकदम रागावला.

''तुम्हाला याचे गांभीर्य काहीच कसे जाणवत नाही?'' तो उसळून म्हणाला.

''सदा, हसू येण्यासारखीच ही घटना आहे. मलासुद्धा कित्येक वेळा तुझाकडे पाहिले की, वडिलांची आठवण येते, पण हे इतके दिवस मी बोललोही नव्हतो. आजची घटना ऐकून मात्र मला नवल वाटले.'' मंगलने हसत हसत उत्तर दिले.

पण या उत्तरानेही सदाची गंभीर मूर्ती भंग पावली नाही. तो तसाच म्हणाला,

''ती गरीब बिचारी पोर ! तिला माझ्याकडे पाहिलं की, फारच कळवळून येतं. तिच्या मनातील पितृस्मृती अजून फारच तीव्र आहे. तिचे दुःख कमी होण्यासाठी काहीतरी केलं पाहिजे.''

मंगलचा चेहराही थोडासा गंभीर होऊ लागला. त्याला रेल्वेच्या डब्यातील अस्मत बरोबरच पहिला प्रसंग आठवला. पितृस्मृती ताजी असताना आणि जीवनात दुसरे स्वारस्य नसताना ती किती जाणवते, याची त्याला त्या प्रसंगाने आठवण झाली. अस्मत आपली मनधरणी करीत होती. तरी आपले दुःख तीव्र असल्यामुळे तिला आपण त्या वेळी झिडकारून दिले, पण तिच्याच प्रेमामुळे आपण पितृप्रेमास विसरलो. आता मला पित्याची आठवण फार क्वचित येऊ लागली आहे, पण हिचे दुःख नष्ट करायला आपण काय करावे? हा एक गूढ प्रश्नच होता. त्याच्या मनात एक गोड कल्पना उभी राहिली, पण ती कल्पना आली तशी केंव्हाच विरली आणि पुन्हा विचारी मुद्रेनेच तो सदाला म्हणाला,

''काय करायचे ?''

पुष्कळ विचार करून जरा औत्सुक्याने सदा म्हणाला,

''तिच्या मनावरील पितृप्रेमाचे आवरण नाहीसे करण्यासाठी दुसरे कसले तरी दडपण तिच्या मनावर घातले पाहिजे की, ज्यामुळे ती सुखी होईल. हे शक्य व्हायला एक उपाय सुचतो.....''

''तो कोणता ?'' मंगलने अगदी उत्सुकतेने विचारले.

''आपण सध्या अविवाहितच आहात आणि ती......''

''बस्स ! समजलं मला तुझं म्हणणं ! मला ते शक्य होणार नाही....''

सदा गंभीर झाला. त्याला आपण उगीचच बोललो असे झाले. मंगल ही

बेचैन झाला. सदा म्हणतो ते आपल्याला कसे शक्य आहे असा विचार करीतच तो उठला आणि घरचा मार्ग सुधारला. ज्या मौनधारणेने ते गेले त्याच मौनधारणेने ते परत घरी आले.

दोघेही आपापल्या बिछान्यावर पडले. तरी दोघांनाही झोप येत नव्हती. सदाला जो पूर्वी कन्याविरह सहन करावा लागला होता त्यामुळे त्याचा रत्नाकडे जास्त ओढा होता. त्याची मुलगी मेल्यापासून तो फार दुःखी होता. या नवीन आलेल्या मुलीला पाहून क्षणभर तो आपले दुःख विसरत असे. हीच रत्ना आपली मुलगी आहे असे तो मानीत असे आणि अशा परिस्थितीत त्याही मुलीने, पितृसुखाला आचवलेल्या एका पोरक्या पोरीने आपल्याला पाहून वडिलांची आठवण काढावी आणि रडत बसावे ही घटना फारच केविलवाणी वाटली त्याला. आणि म्हणूनच तो अतिशय गंभीर झाला होता. मंगलच्या घरात रत्नाही नोकरीला होती तरी तिला पुष्कळ सुख सदा देत होता. पुष्कळ कामे तो तिच्या नकळत करीत असे. आज तिला तो सुख द्यायला गेला, त्याचा परिणाम मात्र अवचित झाला. त्याला ती घटना अगदी दुःखप्रद भासून तो अधिकच गंभीर झाला. आणि बिछान्यावर तळमळत पडला......

मंगलच्याही डोक्यात विचाराचे वादळ सुरू होते. सदाने आपल्याला एक उपाय सांगितला; पण त्याला काय माहीत की, मी अविवाहित असलो तरी अस्मतवर माझे प्रेम आहे. तिला मी वचन दिले आहे. मग एकीच्या प्रेमरज्जुनी जखडला गेलो असता दुसरीच्या प्रेमपाशात मी कसा सापडू? एकीला सुख द्यायचे कबूल केले असता दुसरीला सुख द्यायचा प्रयत्न कसा करू?.......

अशा प्रकारे अस्मत की रत्ना हे द्वंद्व मनात चालू असताना त्याला झोप लागली. लवकरच त्याला एक गोड स्वप्न पडले.

मंगल आणि रत्ना मोटारीतून दूर दूर फिरायला गेले आहेत. रत्ना सुंदर गाणे म्हणत होती. ती संगीताच्या प्रत्येक सुरासुरांनी मंगलचे हृदय खेचीत होती. संगीताची गोडी चांदणे वाढवीत होती. मंद आणि शीतल वारा अंगाला स्पर्श करून सुखवीत होता. ते एका मोठ्या बागेत गेले. तेथे ते खूप हिंडले. ती गाणे म्हणतच होती. या हृदयाचा बगीचा भ्रमरा, पाहिलास का सारा? तिचे ते ध्रुवपदाचे शब्द कानातून

हृदयापर्यंत पोहचत होते. मेंदूला एक प्रकारची सुखसंवेदना होत होती. शेवटी ते एका गुलाबाच्या ताटव्याशेजारी असलेल्या बाकावर जाऊन बसले.

''हे असेच किती वेळ बसायचे ?'' तिने लाडीकपणे विचारले.

''जीवनाच्या अंतापर्यंत !'' तो म्हणाला.

ती खदखदून हसली आणि त्याच्या छातीवर तिने आपली मान टाकली. तिच्या केसावरून डावा हात फिरवीत शेजारच्या एका गुलाबाच्या ताटव्यातील एक सुंदरपैकी उमललेले फूल काढले आणि तिच्या नाकाजवळ धरले. तिने आपल्या मानेला हिसडा देऊन त्याच्या हातातील फूल घेण्याचा प्रयत्न केला. ती त्याचा उजवा हात धरणार इतक्यात त्याने ते फूल डाव्या हातात घेतले. तिच्या हातात त्याचा नुसताच हात आला आणि त्याने ते फूल चटकन तिच्या वेणीत घातले. नंतर तिने त्याच्या दंडावर आपली मान टाकली आणि त्याचा हात हातात घेऊन तिने विचारले,

''हा हात असाच कायमचा माझ्या हातात राहील का ?.....''

मंगल खडबडून जागा झाला. स्वप्नातील दृश्य त्याच्या डोळ्यापुढे अजूनही तरळत होते. त्याने आपले डोळे चोळले. तरी त्याच्या कानात ते शब्द घुमतच होते..... 'हा हात असाच कायमचा माझ्या हातात राहील का?'

छे! ते मुळीच शक्य नाही! मग अस्मत काय करेल ? तिला काय सांगायचे आपण ? तिला दिलेले वचन मोडायचे काय ? त्याला नाना शंका भेडसावू लागल्या आणि पुन्हा अस्मत की रत्ना हे द्वंद्व त्याच्या मनात धुमसू लागले. तो बेचैन झाला. तळमळत बिछान्यावर पडला.

त्याला आता मात्र झोप लागत नव्हती. तो उठला. लाईट लावली. किती वाजले ते पहिले. तीन वाजले होते. सदाकडे त्याने एकवार पाहिले. तोही झोपला होता. दार उघडून तो गॅलरीत उभा राहिला. त्याने सभोवार नजर फिरविली. अजूनही अस्पष्ट चांदणे होतेच. आजूबाजूची घरे अगदी शांत दिसत होती. कुठे आवाज नव्हता. कुठे धडधड नव्हती. कुठे आरडणे नव्हते. कुठे ओरडणे नव्हते. तो तिथेच कितीतरी वेळ उभा राहिला. रस्त्यावर क्वचित एखाद्या माणसाची अस्पष्ट आकृती दिसत होती. तेथे उभे राहून राहून त्याला कंटाळा आल्यावर तो स्वयंपाक

घरात आला. साडेतीन वाजून गेलेच होते. सदाला झोप लागली होती. त्याने स्टोव्ह पेटविला. थोडेसे गरम पाणी प्रथम करून घेतले आणि मग चहाचे आधण ठेवले नि सदाला उठवायला गेला. सदाने उठून जेव्हा तो सर्व प्रकार पाहिला तेंव्हा मात्र तो आश्चर्याने थक्क झाला. तो लाजेने चूर होऊन गेला. कारण त्याला तोंड धुवायला गरम पाणी आणि चहा मालकांनी तयार केला होता. त्याला क्षणभर वाटले, आज servent day तर नाही ना? पण त्याचा फारसा विचार न करता शरमल्यागत होऊन त्याने आपले तोंड धुतले. दोघांनीही चहा घ्यायला सुरुवात केली. चहा घेता घेता सदा म्हणाला,

''आत्ताशी तर चार वाजले आहेत मालक !''

''मग ?''

''इतक्या लवकर उठून आपणच सर्व आटोपले आणि मी......''

''अरे, मग काय झाले त्यात ? झोप येईना म्हणून उठलो आणि करमेना म्हणून लागलो कामाला झालं !''

''मग मला उठवायचं की नाही ?''

''कशाला विनाकारण? मी एक दिवस हे काम केलं म्हणून काय झालं?''

सदाला यावर काहीच बोलायला सुचेना. त्याने मुकाट्याने चहा घेतला. कपबश्या आवरल्या आणि बाहेरच बिछाना काढण्यास निघून गेला. जाण्यापूर्वी हिटर सुरू करण्यास मात्र तो विसरला नाही. त्याने पटापट सर्व कामे आवरली. तोपर्यंत मंगलने आपली स्नानादी कर्मे आटोपून घेतली आणि तो ही बाहेर आला. जवळ जवळ पाच वाजायला आले होते. फिरायला जायचा बेत त्याने आज रद्द केला होता, कारण त्याला आज बराच कंटाळा आला होता. त्यातच आज रविवार असल्यामुळे दुकानही बंद होते. कालच त्याने लायब्ररीतून 'सुवर्णमेरू' ही कादंबरी आणली होती. त्याने ती कादंबरी घेतली, आरामखुर्चीत आपले प्रस्थान मांडले. आणि तो ती कादंबरी वाचण्यात अगदी गर्क होऊन गेला. प्रेमाच्या सुवर्णमेरूचे वर्णन आणि तेथील सौंदर्य यांच्या अथांग सागरामध्ये तो बुडून गेला होता. सदाही स्वयंपाकघरात काम करीत होता. तेंव्हा माजघरात अगदी शांत वातावरण होते. मंगलला आजूबाजूचे विशेष भान नव्हते.....

सहाच्या सुमाराला रत्नाने तेथे प्रवेश केला. आज या वेळी घरात मालकांना पाहताना तिला विशेष नवल वाटले. पण ती तशीच चटकन स्वयंपाक घरात निघून गेली. घरात गेल्यावर तिने प्रथम चहा तयार केला. सदा मागील बाजूला कसल्यातरी कामात गर्क होता. ती स्वतःच चहा घेऊन तेथे आली. मंगलची समाधी मात्र अजून उतरली नव्हती. ती हळूच चहा पुढे करीत म्हणाली,

''घेता ना चहा ?''

या शब्दांनी मात्र मंगल भानावर आला. आपल्यासमोर रत्ना उभी आहे हे त्याने पाहिले. रोज सदा चहा घेऊन येतो. आज रत्नाने कसा काय आणला? त्याच्या मनात चलबिचल झाली. तिच्या हातातला कप त्याने घेतला. रत्ना दुसरीकडेच बघत तेथे उभी होती. चहा घेता घेता मंगलची नजर तिच्यावर खिळली. खुर्चीमागील टेबललॅम्पचा प्रकाशाचा झोत तिच्या पांढऱ्या शुभ्र साडीवर आणि गोऱ्यापान देहावर पडला होता. ती सुंदर आहे असं निश्चित विधान तिच्या बाबतीत करता न आलं तरी ती भारी आकर्षक आहे हे कबूल करायलाच हवं! तिच्या मुखावर असामान्य सौंदर्याची दीप्ती नव्हती, पण मुद्रेवर विलसणारे तेज आणि दिव्यता होती. डोळे काळेभोर नव्हते, पण दृष्टीमध्ये दुसऱ्याच्या अंतःकरणाचा वेध घेणारी कमालीची भेदकता होती. तिचे सौंदर्य मोह घालणारे नव्हते. मादक तर मुळीच नव्हते, पण ते सात्विक होते आणि त्यात किंचित सौम्यतेची झाक असल्याचा भास होई. मंगलच्या हातातील चहाचा कप तसाच राहिला. तो तिच्याकडे नजर रोखून पाहू लागला. डोळ्यांच्या जिव्हा करून तो तिचे सौंदर्यपान करू लागला. पण इतक्यात तिने त्यांच्याकडे पाहिले. ते आपणाकडेच पाहात आहेत हे पाहताच तिचे नेत्र लाजेने चूर झाले. पुन्हा त्यांच्याकडे पाहाण्याचे तिचे धाडस झाले नाही. मंगलच्याही ते लक्षात आले. तोही मनातून शरमला आणि त्याने हातातील कप एका क्षणात रिकामा केला.

''हं. घे.'' कपबशी त्याने पुढे केली. पण तो ताबडतोब चाचरला. तिला आपण ताबडतोब एकेरी शब्दानेही संबोधू लागलो. हे न कळत घडले तरी मागाहून त्याच्या लक्षात आले. रत्नांनी कपबशी घेतली आणि ती निघून गेली. मंगल तसाच विचार करीत बसला. त्याच्या मनात पुन्हा थैमान सुरू झाले. पण हे थैमान

एककल्ली होते. अस्मतचा विचार आता जवळ जवळ दूर झाला होता. अस्मत राहिली मुंबईला ! तिचा इकडे काय संबंध ? तिला आपण वचन दिले आहे..... दिले असेल. वचन दिले म्हणून काय झालं ? वचन नेहमी पाळण्याकरिताच असतं असं कुठे आहे ? ते पाळणं वा न पाळणं त्या त्या परिस्थितीवर अवलंबून असतं! आणि हा तरी काय वचनाचा काळ आहे ?.... काय करायचं आहे त्या वचनाला? ....जाने दो ! अस्मत बघता येईल पुढच्या पुढे ? सध्या नको. आणि रत्ना अस्मतपेक्षा काय वाईट आहे ? ज्या जमातीने आपल्या घराण्याचा सत्यानाश केला त्यापैकीच, त्या मुसलमानांपैकीच अस्मत एक तरुणी ! छे.... काय करायचं आहे असल्या जातीतल्या पोरीशी ? बस्स ! अस्मतचा नाद आजपासून सोडून द्यायचा. आजपासून आपल्या जीवनाच्या बागेत रत्नाला माळिणीची जागा द्यायची. आपला जीवनबगीचा ती फार सुंदर फुलविल.......

अशाप्रकारे विलक्षण विचारात तो अगदी गढून गेला होता. थोड्याच वेळात सदा तेथे आला. त्याने दुकानात कोणीतरी आल्याचे सांगितले. तेव्हा कुठे तो शुद्धीवर आला आणि त्याने दुकानात कोणीतरी आल्याचे कळल्यामुळे तो खाली निघून गेला. ....

*****

# १३.

रत्नांने सर्व कामे आटोपली. इतर काही काम नसल्याने ती स्वयंपाकघरातच स्वेटर विणीत बसली होती. अर्धवट राहिलेला एक स्वेटर तिने आज हातावेगळाही केला होता आणि दुसरा एक स्वेटर ती विणीत होती. स्वेटर विणता विणता ती मध्येच स्मितहास्य करीत होती. तिच्या डोक्यामध्ये कसलेतरी विचारचक्र चालू होते यात शंका नव्हती.

सदा खाली जाऊन मित्रमंडळीत पत्ते खेळत बसला होता. त्याचे तोंड पानांनी चांगलेच रंगले होते. पत्त्याचा डावही चांगला रंगात आला होता. ब्रिजचा डाव अगदी जोरदारपणे चालू असताना ते अगदी आजूबाजूच्या जगाला अजिबात विसरून गेले होते.

मंगल जेवल्यानंतर झोपला होता. त्याला झोपून आता जवळ जवळ तीन तास झाले होते. त्याचीही आता उठण्याची चिन्ह दिसत होती, कारण तो मधूनच एकदोनदा आळस देऊन पुन्हा पडे. तसाच त्याने पुन्हा एकदा आळस दिला, पण आळस देताना त्याचा हात एकदम कॉटच्या दांडीवर आदळला. त्यामुळे तो चटकन हात चोळीत उठला. आणि केस सारखे करीतच तोंड धुण्यासाठी बाथरूमकडे गेला.

मंगलला पाहताच रत्नाने आपला पदर सारखा केला. आणि उगीचच काहीतरी हालचाल केली. मंगल तोंड

धुऊन बाहेर आल्यावर नॅपकिनने तोंड पुसता पुसता त्याचे लक्ष विणलेल्या स्वेटरवर गेले.

''व्वा! सुंदर विणता की स्वेटर तुम्ही !'' तो स्वेटर उचलीत म्हणाला.

रत्ना नुसती हळुवारपणे हसली. मंगल तसाच पुढे म्हणाला,

''मला द्याल का एक विणून छानपैकी ?''

''देईन ना !''

''कधी ?''

''तुम्ही म्हणाल तेंव्हा !''

''उद्यापासून करा सुरुवात. किती पैसे देऊ लोकरीला ?''

''सध्याच नको पैसे. माझ्याकडे आहे लोकर.''

''पण लोकरीचे पैसे ?''

''ते बघू पुढे !''

''बरं आहे.'' असे म्हणून तो माजघरात आला. कपाटाच्या आरशासमोर जाऊन त्याने कंगव्याने केस सारखे केले आणि पुन्हा स्वयंपाकघराच्या दारात येऊन तो म्हणाला,

''चहा करता ना ?''

''हो. करते ना.'' तिने विणायचे साहित्य तेथेच गुंडाळून ठेवले आणि स्टोव्ह पेटविण्यास सुरुवात केली. मंगल हे सारे लक्षपूर्वक पाहात होता. ती चहाला आधण घेण्यास उठली तेव्हा मंगलही दाराजवळ असलेल्या पाटाच्या चवडीवर बसला. बसल्या बसल्या काहीतरी ठरवून तो म्हणाला,

''तुम्ही ईस्ट पटेल नगरला राहता नाही का ?''

''हो.''

''मग तुम्हाला जायला यायला फारच लांब पडत असेल. पायीच जाता ना?''

''हो.''

''मग असं केलं तर !''

''काय ?'' तिने उत्सुकतेने विचारले, कारण तिला खरोखरीच या रोजच्या त्रासाचा कंटाळा आला होता.

''तुम्हाला ती बाजूची खोली राहायला दिली तर ?''

रत्ना जरा घुटमळली. तिला काय उत्तर द्यावे हेच कळेना. ती विचारी मुद्रेनेच थोडा वेळ स्तब्ध राहिली.

''का ? काही अडचण आहे का ?''

''काही अडचण नाही, पण सर्व सामान तिकडून हलवायचे म्हणजे.....'' काहीतरी बोलायचे म्हणून ती बोलली.

''सामान आणायचा काय प्रश्न ? सदा मोटारीतूनसुद्धा सर्व सामान आणील!''

आता मात्र रत्ना निरुत्तर झाली. तिला आता होकार देण्याशिवाय दुसरा मार्गच नव्हता. त्याने पुन्हा विचारले,

''मग ?''

''चालेल!''

''मग आज संध्याकाळीच सदाला जा तुम्ही बरोबर घेऊन आणि आणा सर्व सामान इकडे.''

तिने मानेनेच नुसता हुंकार दिला आणि चहाचा कप पुढे केला. आतापर्यंत चहा तयार झाला आहे, याकडे मंगलचे लक्षच नव्हते. चहाचा कप पुढे केलेला पहाताच तो म्हणाला,

''थांबा जरा. सदाला हाक मारतो. खाली बसला असेल पत्ते खेळत.''

तो गॅलरीत गेला आणि तेथून त्याने सदाला हाक मारली. ताबडतोब सदा हाक देऊन वरती आला. स्वयंपाकघरात चहा वगैरे तयार झालेला पाहून तो बघतच राहिला. मंगल त्याला म्हणाला,

''बस. चहा घे. आज तुला एक नवीन कामगिरी पार पडायची आहे.''

''काय ?'' सदाने चहाचा कप हाती घेता घेता विचारले. रत्ना स्मितहास्य करीत त्या दोघांकडे आळीपाळीने चोरून पाहात होती. मंगलचे किंवा सदाचे तिच्याकडे लक्षच नव्हते.

''आता पाच वाजता जाऊन रत्नाच्या घरचे सामान आणून या शेजारच्या खोलीत टाकायचे. गाडी घेऊन जा.''

''का?'' सदाने आश्चर्याने विचारले.

‘‘अरे विचार कर. आज ईस्ट पटेल नगरवरून पहाटेच्या वेळी यायचे आणि इतक्या लांब रात्री आठ वाजता पायी जायचे हे तुला कसे वाटते ?’’

‘‘त्रासाचे आहे खरे.’’

‘‘म्हणूनच मी शेजारच्या खोलीत राहायला यायचा सल्ला दिला.’’

सदाला काल रात्री बागेत मंगलला दिलेला सल्ला आठवला. त्याची अंमलबजावणी इतक्या लवकर होईल हे त्याच्या स्वप्नातही नव्हते. शिवाय ‘ते शक्य नाही’ म्हणताच त्या क्षणी सदाने त्याचा नाद सोडून दिला होता. पण जे होते आहे ते सारे बऱ्यासाठीच होते आहे असे जाणून त्याला फारच समाधान वाटले. हाच विचार करून तो म्हणाला,

‘‘फारच सुंदर कल्पना आहे. मग त्याला पाच कशाला वाजवायचे ? शुभस्य शीघ्रम ! आत्ताच जातो.’’

‘‘तसे कर. त्या तयार होत असल्या तर जा आत्ताच.’’

सदाने रत्नाला विचारले, ‘‘काय मग जायचे का आत्ता ?’’

ही काय उचलबांगडी लावली आहे या कल्पनेने रत्ना भांबावून गेली, पण सदाचा प्रश्न ऐकून ती सरळच म्हणाली,

‘‘चला.’’

तिने तेथील सर्व पसारा आटोपला. पातळ सारखे केले आणि ती निघाली. सदानी गाडी बाहेर काढली व ते दोघे मोटारीने निघून गेले. मंगल गॅलरीतून हे सारे पाहात होता. त्याला आता फारच आनंद झाला.......

*****

# १४.

आज कॉलेजला सुट्टी होती. कुंदाचे जेवणखाण झाले होते. तिला काहीच करमत नव्हते. तिने घड्याळ पाहिले. जरा इकडे तिकडे केले. इतक्यात पोस्टमनने लेटरबॉक्समध्ये टपाल टाकल्याचा इशारा झाला. पाकीट हाती घेऊन ते कुठून आले आहे ते पाहिले. दिल्लीहून ते आले आहे हे तिला ताबडतोब कळले. तिला फार आनंद झाला. आईला सांगून ती तडक अस्मतकडे निघाली.

अस्मतचेही सर्व काही आटोपून ती आरामखुर्चीत बसली होती. वाचण्यात ती अगदी गर्क झाली होती. कुंदाने हळूच मागून जाऊन तिचे डोळे झाकले. अस्मतने ते सोडवायचा बराच प्रयत्न केला, पण तिला ते शक्य झाले नाही. कुंदाने आवाज चढवून विचारले,

''कोण आहे ओळख ?''

पण अस्मतने एकदम ओरडून सांगितले, ''सोड ना कुंदटले......''

त्यासरशी कुंदाने हात सोडवून विचारले,

''रागावलीस एवढी ?''

''मग किती घट्ट धरलेस तू डोळे ?'' ती डोळे चोळीत म्हणाली.

''सहज डोळे झाकले नाहीत तर एवढी रागावलीस माझ्यावर नि पुढे त्यांनी.......''

‘‘बस्स कर. सदानकदा तू त्यांच्यावरून माझी सारखीच चेष्टा करतेस.’’ रागातच ती म्हणाली.

‘‘मग काय करू ?’’

‘‘काय करू म्हणून काय विचारतेस ?’’

‘‘पण काही खोट आहे का त्यात ? बरं ते असू दे. आज एक गंमत सांगणार आहे मी. बरोबर आणले आहे मी. ओळख काय आहे ते ?’’

‘‘कादंबरी असेल.’’ तिने हसत हसत उत्तर दिले.

‘‘नव्हेच मुळी.’’

‘‘म....ग....काहीतरी खाऊ असेल.’’

‘‘नाहीच मुळी.’’

‘‘म..ग.... कशापैकी आहे ?’’

‘‘ते नाही सांगायचं.’’

‘‘मग नाही बाई मला ओळखता येत. तूच सांग.’’

‘‘हरलीस? हे पहा.....’’ म्हणून तिने हळूच पाकीट दाखविले.

पाकीट पाहिल्यावर अस्मतने एकदम तिच्या हातावर झेप घेतली, पण कुंदाने चटकन हात बाजूला घेतला. तिने पुन्हा तो हात धरून पाकीट घेण्याचा प्रयत्न केला. पण व्यर्थ. तिला काही ते पाकीट मिळू शकले नाही. शेवटी ती चिडली. ‘‘दे ना पाकीट.’’

‘‘मग घे ना.’’ जरा लांब उभे राहूनच हात पुढे करून कुंदाने म्हटले. ती ते घेण्याकरिता पुन्हा पुढे गेली. पण कुंदाही तशीच मागे मागे जाऊ लागली. अस्मत अगदी रडकुंडीला आली. ‘‘पुन्हा तुझ्या नावावर पत्रच मागवणार नाही मी. असं काय करतेस ?’’

‘‘नको मागवू....’’

अस्मत जास्तच चिडली. ती पुन्हा खुर्चीत येऊन खाली मान घालून रडण्याचे सोंग करू लागली. तेव्हा कुठे कुंदा ते पाकीट घेऊन तेथे आली आणि तिला समजावणार इतक्यात सावध असलेल्या अस्मतने कुंदाच्या हातचे पाकीट पळविले. कुंदा तिच्याकडे पाहातच राहिली. अस्मतने पाकीट खोलले. ती वाचू लागली.

दिल्ली ता. * * *

प्रिय अस्मत,

तुला पुष्कळ दिवसात पत्र पाठविले नाही म्हणून राग आला असेल. तुझी पत्रेही मला पोहोचली. पण धंद्यामुळे पत्र लिहायला सवडच मिळत नाही. आता मी हाच धंदा फिरतीवर करणार आहे. त्यामुळे माझे पत्र पुन्हा येईपर्यंत पत्र पाठवू नकोस. कदाचित तुझे पत्र मी नसताना कोणाचे हाती पडले तर घोटाळा होईल. प्रेमपत्र दुसऱ्याच्या हाती पडणे बरे का? तूच सांग. रागावू नकोस. तुला मी लवकरच पत्र पाठवीन. निराश होऊ नकोस. फार काय लिहू? इकडे मला मुळीच करमत नाही. तिकडे येण्याचे माझे किती विचार चालतात पण काय करू? नाईलाज आहे. कुंदालाही माझा जयहिंद सांग.....

तुझाच,

मंगल.

पत्र वाचून होताच ती उशीवर कपाळ टेकवून मुसमुसून रडू लागली. कुंदाला याचा काहीच अर्थ कळेना. तिच्या हातातील पत्र घेऊन कुंदानेही ते वाचले. तिलाही वाईट वाटू लागले. तरी पण ती अस्मतला धीर देतच होती.

''अस्मत, रडू नकोस. उठ. काही कामाकरिता ते फिरतीवर राहाणार असतील. मग रडून काय होणार आहे? उलट तू येथे रडलीस की त्यांना तिकडे जास्त त्रास होईल.''

'त्यांना तिकडे त्रास होईल' हे शब्द ऐकताच तिने आपले अश्रू आवरले. तिला जीव जवळ जवळ नकोसा झाला. प्रत्यक्ष विरहही तिने कसातरी सहन केला पण आता पत्रव्यवहारसुद्धा बंद पडत होता. तिच्या मनाला हे सहन होईना. पुरुषांची जातच मेली असली. किती निर्दय मनं असतात त्यांची. दुसऱ्यांची त्यांना काहीच पर्वा वाटत नाही..... अस्मत अगदी बहकल्यासारखी बडबडत होती. कुंदा तिची समजूत घालीत होती. तिलाही मनातून मंगलचा भयंकर राग आला होता. पण ती विचारी होती. तिने आपला राग आवरला आणि ती अस्मतला शांत करीत होती......

असाच कितीतरी वेळ निघून गेला......

*****

# १५.

दोन दिवस झाले मंगल तापानी फणफणत होता. वाटेल वाटेल ते बरळत होता. सदा डॉक्टरकडे खेपांवर खेपा घालीत होता. ताप काही कमी व्हायचे चिन्ह दिसेना. डॉक्टरही अगदी कोशिश करत होते. दुपारपासून डॉक्टर मंगलजवळून हलले नव्हते. ताप एकाएकी आला... एकाएकी वाढला... आणि एकाएकी उग्र स्वरूप धारण केले. रत्ना खिन्न मुद्रेने त्याच्याकडे पाहत होती. सदा तर जवळ जवळ अर्धमेलाच झाला होता. डॉक्टरनी औषधाचे दोन डोस त्याला दिले होते. दुसरा डोस घेतल्यावर मात्र तसा थोडासा फरक दिसू लागला. बरळणे जरा कमी झाले. नाडीचे ठोकेही थोडे ठिकाणावर आले होते. डॉक्टरनी हे सांगताच सदाच्या आणि रत्नाच्या तोंडावर हास्य विलसले. रात्रीचे दहा वाजून गेले होते. मंगल आताशी कुठे शुद्धीवर येत होता. डॉक्टरनी कॉफी करण्यास सांगितले. तेव्हा रत्ना कॉफी करायला गेली. तोपर्यंत मंगल हळूहळू शुद्धीवर येत होता. कपाळावर कोलनवॉटरची पट्टी सतत ठेवली जात होती. थोड्याच वेळात मंगल पूर्ण शुद्धीवर आला. आणि त्याने पाणी मागितले. त्या वेळीच त्याला कॉफीची जरुरी होती, म्हणून सदाला डॉक्टरनी कॉफी झाली का ते बघण्यास सांगितले. इतक्यात रत्ना कॉफी घेऊन आलीच. मंगलला सदाने कॉफी पाजली आणि कोलनवॉटरची पट्टी पुन्हा बदलून त्याने कपाळावर ठेवली. अंगात तरीपण

दोनपर्यंत ताप होता. सर्व आटोपून अकरा वाजता डॉक्टर निघून गेले. सदा आणि रत्ना तेथे बसले. मंगल जागाच होता. त्याचा आवाज अगदी खोल गेला होता. तो क्षीण आवाजात म्हणाला,

''झोपा जा तुम्ही दोघंही. कशाला जागता विनाकारण ?''

''तुम्हीच आता झोपा पाहू. झोप जर लागली नाही तर अजून ताप वाढेल. मग झोपू आम्ही.'' सदा त्याच्या डोक्यावरून हात फिरवीत म्हणाला. त्याने कोलनवॉटरची पट्टी बदलली. तो रत्नाला म्हणाला,

''रत्ना, तू झोप जरा वेळ. मग वाटल्यास उठवतो मी तुला.''

''तुम्हीच झोपा. फार दगदग झाली आहे तुम्हाला.''

पुढे कोणीच काही बोललं नाही. उशापायथ्याशी सदा, रत्ना बसलेले होते. मंगलला लवकरच चांगली झोप लागली. रत्नाचे डोळेही तारवटलेले होते. हे पाहून सदाने पुन्हा सांगितले,

''जा बाळ. तू झोप जरा वेळ. मग उठवतो मी तुला.''

रत्ना जाऊन झोपली. सदा एकटाच तिथे बसला होता. मंगल झोपला होता. त्याला गाढ झोप लागली होती. ताप अजूनही थोडा होताच. मधून मधून घाम येतच होता. सदा तो हळूच पुसत होता. ताप उतरू लागल्यापासून त्याला किती आनंद झाला होता. नाहीतर सदा फारच घाबरला होता. रत्ना हताश झाली होती. आणि दुसरे म्हणजे त्याच्या अचानक आणि अनपेक्षित दुखण्याचे त्यांना आश्चर्य वाटत होते. घाबरण्याचे मूळ कारण तेच होते.....

रत्ना झोपली, पण तिला नीट झोप लागेना. मधूनमधून ती जागी होई. एकदा तर ती दचकून जागी झाली. ती ताबडतोब उठली आणि मंगलच्या तेथे आली. सदा अजून बसूनच होता. तिने घड्याळाकडे पाहिले. साडेतीन वाजून गेले होते. सदाने तिला पुन्हा जाऊन झोपण्यास सांगितले, पण ती गेली नाही. तेव्हा थोड्या वेळाने चहा करण्यास तिला सांगितले. रत्नाने स्वयंपाकघराचा रस्ता धरला. चहा करता करताच तिने तोंड धुतले आणि चहा झाल्यावर सदाकाकाला चहा घेऊन ती बाहेर आली.

''तू घेतलास ?'' सदाने विचारले.

''नाही अजून.''

''मग जा तू घे.'' सदाने तिच्या हातातला कप घेत म्हटले. रत्नाही कप देऊन निघून गेली. तिनेही चहा घेतला. तिथले सर्व आवरून ती बाहेरची कपबशी नेण्याकरिता आली. तेव्हा मंगल जागा झाला होता. तिने कपबशी घेतली आणि आत येऊन पुन्हा स्टोव्ह पेटवला. पाणी गरम केले आणि बाहेर सदाकाकांकडे नेऊन दिले. कॉफी तयार केली. कॉफी घेतल्यावर मंगलला जरा हुशारी वाटली. तो अंथरुणावर पडला होता खरा, पण कालच्यापेक्षा आज त्याच्या चेहऱ्यावर काहीतरी चैतन्य असल्याचे दिसून येत होते.

रात्री सांगितल्याप्रमाणे सकाळी नऊ वाजता डॉक्टर आले. त्यांनी मंगलला तपासले. त्या वेळी टेम्परेचर नॉर्मलवरच होते.

''काय मर्चण्टसाहेब, कस वाटतंय आता आपणाला ?'' डॉक्टरांनी विचारले,

''बरं आहे आता.'' किंचित आणि क्षीण हास्य करीत मंगलने उत्तर दिले.

''पडूनच रहा दोन दिवस. मी संध्याकाळी येतोच पुन्हा.'' असे म्हणून ते जायला निघाले. जाताना औषधांकरिता सदाला ते बरोबर घेऊन गेले. मंगलजवळ रत्ना एकटीच बसली होती. मंगलने रत्नाकडे पाहिलं.

''किती घाबरवलंत दोन दिवसात ?'' रत्नाने विचारले.

''नुसतं घाबरवणंच ठरलं ते. मेलो असतो तर बरं झालं असत.''एक दीर्घ उसासा टाकीत मंगल म्हणाला.

''का एवढे का कंटाळलात जीवनाला ?''

''माझ्या दुर्दैवी जीवनाच्या दुःखाची सीमा झाली. सुखाचा एक कवडसा सुद्धा माझ्या दृष्टीला पारखा झाला. घोर निराशेच्या वणव्यामध्ये मी होरपळून निघत आहे. दुर्दैवी अंधार हाच माझा सखा! जीवनात प्रकाश नाही. जीवनात जगण्यासारखं काहीतरी आहे तोपर्यंत जगावं माणसाने. वृक्षसुद्धा कंटाळला की आपली पाने टाकून देतो. मग आपण तर बोलते चालते जीव.''

''आपले जीवन कशामुळे इतके शुष्क झाले आहे ?'' तिने गंभीर होऊन विचारले.

''ज्या जीवनामध्ये मायेचा उमाळा नाही, प्रेमाचा ओलावा नाही ते जीवन शुष्क नाही तर काय ?''

मंगल अगदी खोल आणि आर्त आवाजात बोलत होता. रत्ना अगदी गंभीर झाली होती. सदाकाकांकडून तिला त्याच्या एकाकी जीवनाची माहिती थोडीफार कळली होती. त्यामुळे तिने फारसे त्याला विचारले नाही. ज्याप्रमाणे आपण आपल्या सर्वांना गमावून बसलो, त्याचप्रमाणे त्यांची स्थिती होती, हे तिला माहीत होते. सदाने ते अविवाहित असल्याचे सांगितले होते. आपण जीवनाच्या अंतापर्यंत जाण्यासाठी ज्याचा हात हाती घेतला तो जीव फक्त चार दिवसही माझ्या सहवासात राहू नये, किती खेदाची गोष्ट आहे? आता मी एकटी.... हेही एकटे आहेत..... तिच्या मुखावर एक चमत्कारिक हास्य फुलले. ती हळूच पण भारावल्यागत होऊन म्हणाली,

''मायेचा उमाळा आणि प्रेमाचा ओलावा....'' तिने त्याच्याकडे पुन्हा एकदा नजर फिरविली. मंगल ही तिच्याकडे पहात होता. दोन दृष्टीचे मिलन झाले. रत्नाही थोडीशी लाजली. मंगल किंचित हसला. रत्ना हळुवारपणे म्हणाली,

''...आणि तोच मिळाला तर !''

''मग जगायला काय हरकत आहे ?'' तो अधीरतेने म्हणाला. दोघांची पुन्हा नजरानजर झाली. इतक्यात सदा आल्याची चाहूल लागल्याने रत्नाने मागे वळून पाहिले. सदाला समजायचे ते यापूर्वीच समजले होते. तो नुसता हसला. रत्ना पुन्हा उठून घरात गेली. सदा उशाशी येऊन बसला आणि हसत हसत हळूच म्हणाला,

''काहीतरी पाणी मुरतंय इथं आज !''

मंगलनेही मृदू स्मित करीत सदाच्या हसण्याला साथ दिली.

*****

# १६.

रजनीचे साम्राज्य उलथून पाडण्यासाठी रविराज आपल्या शयनमंदिराला रामराम ठोकून स्वारीला निघाले होते. त्याचा सारथी आता रथ सज्ज करून उभा होता. रविराजा रथामध्ये आरूढ झाला. अरुणने घोडे चौफेर उधळले. अंबारीपथावरून गुलाबी रंगाची धूळ जिकडे तिकडे पसरू लागलेली दिसत होती.....

रत्नाने चहापाणी आटोपून स्नानाची तयारी केली. इतक्यात मंगल येऊन दारातच उंबऱ्यावर बसला.

''आज पुन्हा चहाची तल्लफ आली आहे. चहा करणार जरा ?''

''तुम्हाला पाहिजे तर करते.''

''मला पाहिजे, म्हणून तर सांगतो, पण सगळ्यांसाठीच कर.''

तिने चहाचे आधण ठेवता ठेवता सहज विचारले.

''स्वेटर पाहिजे होता ना तुम्हाला ? तयार आहे.''

रत्ना आपल्या खोलीत गेली आणि तिने काल विणून ठेवलेला स्वेटर आणला. तांबड्या लोकरीने विणून त्याला तळाशी निळ्या पांढऱ्या लोकरीचे पट्टे घेतले होते. तो त्याच्या हातात देत तिने विचारले.

''कसा आहे ?''

त्याच्याकडे निरखून पहात तो म्हणाला.

''वा ! फारच सुंदर ! इतका हायक्लास स्वेटर मी कधीच

पाहिला नव्हता.''

''अहाहा.... ! जसं काही अगदी खरंच !''

''खरंच नाहीतर काय खोट ? तुम्हा बायकांपुढं कसं बोलावं हेच कळत नाही. खरं बोललं तर खोटं वाटतं आणि खोटं बोललं तर तेही पटत नाही.''

''मग काहीच सांगू नये !'' ती फुरंगटून म्हणाली.....

''मग जमदग्नीच्या रुद्रावताराची आठवण होते.'' तो हसत हसत म्हणाला.

तीही त्याच्याकडे पाहून हसली. नंतर लवकरच दोघांचे चहापान होऊन तो दुकानात गेला आणि सदाला पाठवले.

''आज मला टाकून चहा प्यालीस नाही का पोरी ?'' हातात कपबशी घेत सदा म्हणाला.

''त्यांनी सांगितलं मग काय करू ?'' ती गुन्हेगार स्वरात म्हणाली.

''अस्स्स !'' तो हसत हसत तिच्याकडे पाहात म्हणाला.

रत्नाही स्मित हास्य करीत त्याच्याकडे पाहात होती.......

प्रतिपदेचा चंद्र ज्याप्रमाणे पौर्णिमेपर्यंत कलेकलेने वाढत जातो, तद्वतच रत्ना मंगलचा प्रेमेंदू क्षणाक्षणाला, दिवसादिवसाला वाढतच होता. दिवसामागून दिवस लोटले. एक दिवशी सायंकाळी सहाच्या सुमाराला रत्ना स्वयंपाकाची तयारी करीत होती. इतक्यात तेथे मंगल आला. तो म्हणाला,

''रत्ना, आज मी तुला एक गंमत देणार आहे. पण एका अटीवर.''

''काय ?''

''आज आपण दूरवर फिरायला जायचं.''

रत्ना जरा गोंधळली. तिला फिरायला जायचा प्रसंग आज नवीनच होता. पण त्याने पुन्हा विचारले,

''येणार ना ?''

तिचा नाईलाज झाला आणि तिने शेवटी होकार दिला.

''मग राहू दे हे सारे. आल्यावर कर. चल, बदल कपडे.''

रत्ना उठली. तिने तोंड धुतले. कपडे बदलले. पावडर वगैरे सौंदर्यप्रसाधनाचा समाचार घेतला आणि ती तयार झाली. मंगलही कपडे करून तयार होता. दोघेही मोटारीने निघाले. ते दूर एका टेकडीवर गेले होते. दिनकर आता क्षितिजापलीकडे आपल्या शयनमंदिराची वाटचाल करीत होता. अस्पष्ट असा संधिप्रकाश पडला होता. ते दोन प्रेमी जीव आजूबाजूची निसर्गशोभा पाहात टेकडीवर बसले होते. दोघांच्या मनात एकाच विचारांचे वादळ सुरू होते. दोघांचे मन एकाच गोष्टीकडे ओढ घेत होते, परंतु मनात आलेले विचार जिभेवरच घुटमळत, अधरखिंडीतून ते बाहेर पडू शकत नव्हते. प्रत्येकाला संकोच वाटत होता. मधूनमधून प्रत्येकाची नेत्रपल्लवी चालूच होती. त्याचे नेत्रभाव एकच होते. पुष्कळ वेळ झाला कुणी काहीच बोलले नाहीत. नंतर मंगल म्हणाला,

"रत्ना, किती वेळ गप्प रहाणार अशी ?"

"वसंताशिवाय कोकिळेला कंठ कसा फुटणार ?"

"मग आता तरी बोलशील ना ?"

"काय बोलावे हेच कळत नाही."

रत्ना जरा विचार करू लागली. आज कितीतरी दिवस न सुटलेले कोडे तिच्या डोक्यात पुन्हा थैमान घालू लागले. तिने धीर करून तो प्रश्न आज विचारायचे ठरविले. बऱ्याच वेळाने ती म्हणाली,

"एक विचारू ? राग नाही ना येणार ?"

"काय वाटेल ते विचार. आम्ही बायकांसारखे रागवत नसतो....."

"आपलं नाव......"

रत्ना चाचरतच उच्चारली. मंगल आश्चर्याने थक्क झाला, कारण आपलं नाव हिला केंव्हाच माहीत झालं असेल अशी त्याची कल्पना होती. तो म्हणाला,

"अजून नाव नाही माहीत माझं ?"

"कस माहीत होणार ? तुम्ही कधी सांगितलं नाही. सदाकाका तुम्हाला नेहमी 'मालक' म्हणून संबोधितात. येणार जाणारे मर्चण्टसाहेब म्हणतात. नावाचं उल्लेख येतोच कुठे ? माझा मात्र एक अंदाज आहे की दुकानाचे आणि आपलं नाव एकच असेल."

मंगलला आश्चर्याचा धक्काच बसला. तरी तो विचार करू लागला. समजा, अस्मतचे कदाचित पत्र आलेच तर ते 'मंगल' या नावावरच येणार. हिला तर माझे नाव माहीत नाही. तिची जी समजूत आहे तीच कायम राहू द्यावी. त्यात काय बिघडणार आहे ? असा काहीतरी मजेदार विचार करून त्याने पुन्हा चेष्टेचा सुरात विचारले,

''काय ? तुझा काय अंदाज आहे म्हणालीस ?''

''आपलं नाव विजयच असेल म्हणून.''

''मग काय म्हणतेस नाव माहीत नाही म्हणून ?''

''खरंच ! आपलं नाव विजयचं आहे?'' तिने आनंदातिरेकाने विचारले,

''मग काय खोटं ?''

रत्ना किंचित हसली. ती थोडा वेळ काहीच बोलली नाही. नंतर मंगलने कोटाच्या खिशातून एक सोन्याचा पट्टा असलेलं लेडीज रिस्टवाच काढले. ते आपल्या हातात तसेच लपवून ठेवले आणि रत्नाचा हात हातात घेऊन तिला विचारले,

''आज काय देणार आहे सांग बरं ?''

''मला नाही माहीत.''

''तरी पण.''

''अंगठी.'' हात धरल्याचे अनुरोधाने तिने उत्तर दिले.

''नाहीच. हरलीस ना शेवटी ?'' असे म्हणून त्याने तिच्या हातात रिस्टवाच बांधले. ते पाहून तिला आश्चर्यातिशयाने बोलायलाच येईना. तरीपण ती हळूच म्हणाली,

''अय्या ! इतके भारी ?''

''कसले भारी. तुझ्यापेक्षा नक्की कमी किमतीचे आहे ते.''

रत्ना स्तंभितच झाली. तिचा घड्याळाचा हात मंगलच्याच हातात होता. त्याच हाताला कुरवाळीत तो म्हणाला,

''रत्ना, हा हात असाच माझ्या हाती राहील ना ?''

रत्नाने मंगलकडे पाहिले. तिच्या डोळ्याकडूनच मंगलला मुकभाषेत जे उत्तर

मिळाले त्याने खरोखरीच मंगलचे डोळे धुंद झाले....

लवकरच तो आणि ती घरी यायला निघाले. येताना ते कमला मार्केटच्या रस्त्यानेच आले. रस्ता अगदी गजबजलेला होता. मोटार भररस्त्याने अगदी सावकाश चालली होती. इतक्यात मंगलचे लक्ष एका मोठ्या पाटीवर खिळले.

'नयना फोटो स्टुडिओ'

त्याला एक नवीन कल्पना सुचली. या फोटोस्टुडिओला भेट देण्याची त्याला इच्छा झाली. गाडी रस्त्याच्या कडेला घेतच त्याने रत्नाला विचारले, पण रत्नाच्या संमतीपूर्वीच गाडी फुटपाथच्या कडेला लागली. आणि ते दोघे स्टुडिओत गेले. तेथे जाऊन मंगलने आपली फोटोचीही इच्छा तृप्त करून घेतली आणि ते घरी परतले.

*****

# १७.

झोपेतून मंगल एकदम दचकून जागा झाला. त्याने झटकन उठून लाईट लावली. डोळे चोळून आजूबाजूला एकदा बघितले. कुठे काहीच नव्हते. सदाही झोपला होता. त्याला जरासा धीर आला. त्याने घड्याळाकडे पाहिले. साडेतीन वाजले होते. तो लाईट विझवून पुन्हा कॉटवर पडला. पडल्या पडल्या तो कसला तरी विचार करू लागला. पाच दहा मिनिटांतच तो उठला आणि पायसुद्धा न वाजवता स्वयंपाकघरात आला. स्वयंपाकघरात अलीकडच्या बाजूने एक दरवाजा होता. हळूच आवाज न करता त्याने तो उघडला आणि तो पलीकडच्या खोलीत आला. त्याच खोलीतून पुढच्या खोलीत जायला रस्ता होता. तेथील दरवाजा सताड उघडा होता. मंगल चोरपावलाने आत गेला. खिडकीच्या बाजूलाच पलंगावर रत्ना झोपली होती. तिच्याकडे मंगल थोडा वेळ पाहातच उभा राहिला.

रत्ना, तो आपल्या मनाशीच विचार करू लागला. बाहेर पडलेल्या चंद्रप्रकाशाचं अर्धवट अंधुक तेज जरी तुझ्या मुखावर पडले असले, तरी तुझ्या सौंदर्याचे तेज त्यामुळे द्विगुणित होऊन अधिक खुलून दिसल्याखेरीज राहात नाही. निसर्गनिर्मित चंद्रिकाही तुझ्या सौंदर्यामुळे तुझ्यासमोर येण्यास धजत नाहीत. नाहीतर बाहेरील जगतीतलावर आपल्या सौंदर्याचा प्रकाश पाडणाऱ्या चंद्रिकेनं

तुलाच तेवढे अंधारात ठेवण्याचा प्रयत्न का केला असता ? रमणीय सौंदर्य देवते! तुझ्या सौंदर्याला कोण आकर्षित होणार नाही ? नंदनवनातील असंख्य गुलाबाच्या फुलत्या फुलात माधुर्य नाही इतके माधुर्य रत्ना, तुझ्यासारख्या मानवी सजीव फुलात आले, म्हणून तुला आपलीशी करण्याचा मोह कोणाला होणार नाही?

....मला क्षमा कर अस्मत, मला क्षमा कर. कारण हा अपराध माझा नसून सर्वस्वी हीचा आहे. पाषाणाच्या बनविलेल्या मूर्तीही देवता समजून चालणाऱ्या जगात, बहिःप्रदेशातल्या कोणत्याही दगडाला शेंदूर फासून देव्हाऱ्यात देवता म्हणून पुजणाऱ्या जगात रत्ना, तुझ्यासारखी प्रत्यक्ष हृदयात वास्तव्य करून राहाणाऱ्या माझी जिवंत देवता माझ्यासमोर असताना मला तुझी भक्तिभावाने पूजा करावीशी का वाटणार नाही. देवी..... रत्ना !.....

याचप्रमाणे विचारात गढून गेलेला मंगल तिच्या पलंगाजवळ गेला. तिच्या पलंगाला स्पर्श करताच त्याला कसलीतरी आठवण झाली. त्याने मागे वळून पाहिले. त्याच्या सर्वांगावर भीतीचे रोमांच उभे राहिले. 'कदाचित अस्मतला हे कळले तर ? आपण पलंगाजवळ रत्ना निद्रादेवीच्या अधीन असताना तिच्याजवळ, त्यातूनही अशा शांत वेळी पापवासनेने उभे आहोत. अशा वेळी अस्मत येथेच आली तर....... नको...... नको..... अस्मत, मी तुझा विश्वासघात करीत नाही. पण माझ्या हृदयाला रागाची भीती दाखवू नकोस. तूच सांग, मी तरी काय करू ?' असे एकदम मोठ्याने त्याला म्हणावेसे वाटले. दारू प्यालेल्या माणसाप्रमाणे आपले देहभान रत्नाजवळ तो विसरला. परंतु पुन्हा त्याच्या मनात समाधानाचा नवीनच विचार उद्भवला. 'आता आपण मुंबईला जायचे नाही. अस्मतला पुन्हा कधी भेटायचं नाही. मग अस्मतला हे कळलं तरी काय हरकत आहे ? समोर आलीच तर तिला स्पष्ट सांगू, 'तुझा माझा काय संबंध?'....आणि याच विचारावर त्याने आपले स्वतःचे समर्थन करून घेतले. आणि तो पलंगावर हळूच बसला. त्याने आपला उजवा हात हळूच तिच्या गालावरून फिरविला. इतक्यात रत्ना दचकून जागी झाली. ती एकदम ओरडली, कोण आहे ?
पण मंगलने तिच्या खांद्यावर हात ठेवीत हळूच सांगितले,

''गप्प. ओरडू नकोस. मी आहे.''

‘‘कोण ? विजय ?.......’’ ती स्वर खाली घेत घाबरत घाबरत म्हणाली,

‘‘तुम्ही कसे आलात इकडे ?’’

इतक्यात स्वयंपाकघरात कसलातरी आवाज झाला. मंगल अधिकच घाबरला. तो तसाच दचकून उठला. सदा उठला वाटत!... असे खालच्या आवाजात पुटपुटत तो चोरपावलाने आल्यामार्गाने हळूहळू पुढे सरकला. रत्ना स्तंभित होऊन सारे पाहात होती. ती पुरी भांबावली होती. तिला या प्रकारचा अर्थच कळेना....मंगल तसाच हळू हळू पुढे जात होता. तो स्वयंपाकघरात आला. तेथील लाईट बंद होती. त्याने हळूच दार लावले आणि नंतर लाईट लावून आजूबाजूला पाहिले. कोणीच नव्हते. तो तसाच चोरपावलांनी माजघरात आला. सदा झोपलेलाच होता. तो पुन्हा जाऊन कॉटवर तळमळत पडला..... तिकडे रत्नही आपल्या पलंगावर तळमळत पडली होती...... तिचाही जीव बेचैन झाला होता......

*****

# १८.

दुपारी सर्व कामे आटोपून रत्ना आपल्या खोलीत आली. तिने स्वेटर मोजून पाहिले. ते पुरे झाले होते. आज बुधवार असल्याचेही तिच्या ध्यानात आले. तिने ते स्वेटर घड्या करून पिशवीत घातले आणि पर्स घेऊन ते पोहचते करण्यासाठी ती कमला मार्केटच्या मार्गाला लागली. तेथे जाऊन तिने ते स्वेटर दुकानाच्या मालकाजवळ दिले. त्याने स्वेटर तपासून मोजून घेतले आणि तिला विचारले,

''किती पैसे झाले ?''

''मागील बाकीसह पस्तीस रुपये.''

मालकांनी वहीचा सल्ला घेऊन तिला पस्तीस रुपये दिले. रत्नाने ते पर्समध्ये ठेवले आणि ती रस्त्याला लागली. जेव्हा ती जहांगीर स्ट्रीटला आली, त्या वेळी तेथे विशेष रहदारी नव्हती. ऊन रखरखीत पडले होते. अशा वेळी रत्ना फुटपाथवरून चालली होती. ती स्वतःच्या तंद्रीतच चालली होती म्हणायला हरकत नाही....

दुरून एक सुंदर पर्स हातात घेऊन एक तरुणी येत आहे ते लांबूनच दोघांनी हेरले होते. ती पर्स बाहेरून सुंदर आहे तशी आतूनही सुंदर असली पाहिजे असा त्यांचा अंदाज होता, म्हणून ते तेथल्याच एका बिल्डिंगच्या बंद जिन्याखाली लपले. फुटपाथला लागूनच जिना होता. त्या जिन्याखालून हात जर पुढे आणला तर ती पर्स तेथे बसूनही त्यांना गुल करता येत होती........

जेव्हा ती जिन्यासमोर आली तेव्हा केशवने एकदम हात पुढे नेऊन तिच्या हाताला हिसडा देऊन पर्स हस्तगत केली आणि डोळ्याचे पाते लवते न लवते तोच ते जिन्याखालून पळून जाऊन मागच्या बाजूला पसार झाले. रत्ना आजूबाजूला पाहू लागली. पण तेथे कोणीच नव्हते. मग पर्स नेली कुणी? चोर असला तरी मागे वळेपर्यंत कुठे नाहीसा होणार ? अशी तिची कल्पना होती. ती भुताटकी वगैरे तर नाही ना असा तिला संशय आला. तरीपण ती दुःखाने अगदी व्याकूळ झाली. ती पाच दहा मिनिटे तशीच उभी राहिली. समोर क्वचित चारपाच मिनिटांनी एखादा मनुष्य येई. पण घडलेला प्रकार कोणाला सांगण्याचे धाडस तिला झाले नाही. ती तशीच दुःखी अंतःकरणाने घरी आली आणि पलंगावर निपचित पडून राहिली. ती अगदी बेचैन झाली होती. कितीतरी वेळ ती त्याचा विचार करीत होती. चार वाजून गेले. मंगल वरती आला. घरात येऊन स्वयंपाकघरापर्यंत एक फेरफटका टाकला. पण सदाशिवाय त्याला घरात दुसरे कोणीच दिसले नाही. 'रत्ना कुठे गेली मग?' तो स्वतःच्या मनाशीच पुटपुटला आणि दिवाणखान्यात येऊन त्याने काहीतरी साफसुफ करीत असलेल्या सदाला विचारले,

''रत्ना कुठे गेली रे ?''

''मला नाही ठाऊक. पुष्कळ वेळ झाला. अजून आली नाही.''

तो रत्नाच्या खोलीकडे गेला. तो दार उघडे होते. तो आत गेला. रत्ना पलंगावर चिंताक्रांत होऊन पडली होती. तिला त्या स्थितीत पाहताच मंगलने तिला घाबऱ्या घाबऱ्या विचारले,

''काय झाले रत्ना ?''

रत्नाने चमकून बाजूला पाहिले. विजय बोलत होता. ते काय बोलले होते ते तिने अर्धवट ऐकले होते.

''काही नाही.''

''काही नाही कसं ? चांगली कसली तरी काळजी लागली आहे ना तुला?''

रत्नाची मुद्रा अधिकच गंभीर झाली. तिला आता सांगणे भाग होते. म्हणूनच घडलेली सर्व हकीकत तिने विजयला सांगितली आणि पुन्हा चिंताक्रांत मुद्रेनेच त्याच्याकडे पाहू लागली.

''मग एवढी रडकुंडीला कशाला आलीस ? पस्तीस रुपयाचाच प्रश्न आहे ना? मग ते मिळाले तर तुला शांत वाटेल का ? मी देतो चल.''

''छे.पस्तीस रुपयाचा काय प्रश्न ?'' त्यांनी एवढी तयारी दाखवल्यावर रत्नाला उसने अवसान आणणे भाग पडले आणि म्हणूनच ती तसे म्हणाली.

''मग कसला विचार करतेस ?''

काहीतरी आणखी बोलायचे म्हणून तिने सांगितले. ''त्यांत आपला फोटोही होता.''

''जाऊ दे. त्यात काय ? आपण दुसरा काढू.''

आता मात्र रत्नाला बोलायला जागाच नव्हती. मंगलने तिला हाताला धरून स्वयंपाक घरात आणले आणि चहा करायला लावले. तिनेही चहा केला. तिघांनीही तो चहा घेतला. मंगल जाता जाता हसत म्हणाला,

'वेडी कुठली!......'

पर्स घेऊन केशवने आणि कमलाकरने जे पलायन केले ते थेट पुढच्या रस्त्याला कमला मार्केटमध्येच आले. येता येता ती पर्स स्वतःजवळच्या दुसऱ्या एका पिशवीत घालायला ते विसरले नाहीत. त्यांनी लवकरच आग्रारोडवरचा तलाव गाठला. तलावावर आल्यावर त्यांनी पलीकडच्या झाडीमध्ये प्रवेश केला. दुपारच्या वेळी तिकडे कोणी चिटपाखरूही फिरकत नसे. अशी साधारण माहिती त्यांना होतीच आणि म्हणूनच त्यांनी ती एकांत जागा निवडली होती. एका झाडाखाली बसून त्यांनी आजूबाजूला नजर फिरवली. कुठेही कोणीही नव्हते. केशवने पिशवीतील पर्स काढली. पर्स दिसायला खूप सुंदर होती. ती पर्स उघडून त्यांनी आतील नोटा बाहेर काढल्या आणि मोजल्या. त्यांची तोंडे उतरली.

''इतकी सुंदर पर्स वापरतात आणि आत पाहिले तर पस्तीस रुपये.'' कमलाकर तिरस्काराने म्हणाला.

केशवचाही चेहरा उतारलेलाच होता, परंतु तेवढे तरी मिळाले ना? आजचा दिवस तर वाया गेला नाही ना, असा विचार करून तो म्हणाला,

''जाऊ दे रे कमळ्या, आजचा दिवस तर फुकट गेला नाही.....तेवढेच!'' असे म्हणत त्यांनी दुसरे काही आहे का हे पाहण्यासाठी पुन्हा पर्समध्ये हात

घातला. त्यांना दोन फोटो मिळाले. लहानच कॉपीज होत्या, परंतु तो फोटो पाहताच केशवला काहीतरी वाटले खास! आणि तो एकदम ओरडून म्हणाला, कमळ्या, हा फोटो तुला ओळखीचा वाटतो का रे? कमलाकरने तो फोटो निरखून पाहिला. जिची पर्स आपण पळविली त्याच स्त्रीचा तो एक फोटो होता. पण तिच्या शेजारी जो तरुण होता तो कोण ? हा प्रश्न होता. त्या दोघांनाही तो चेहरा ओळखीचा वाटत होता. त्यांनी पुष्कळ विचार केला. या दिल्लीमध्ये आपल्या ओळखीचा चेहरा म्हणजे एक फार मोठे आश्चर्य आहे असे त्यांना वाटले. त्यांनी त्या फोटोवर बराच विचार केला. दुसरा फोटो होता तो कुठल्या तरी नाटकातला दोन मुलींचा सीनवर घेतलेला फोटो होता. त्याचे त्यांना विशेष काही वाटले नाही. त्याने त्या तरुणांचा चेहरा न्याहाळण्याचे कार्य सुरू ठेवले. पण त्यांना तपास लागेना. त्यांची स्मृती मठ्ठ झाली होती म्हणा वाटलं तर ! त्या फोटोवर स्टुडिओचा शिक्का पाहिला. – नयना फोटो स्टुडिओ– त्यांना एक नवीन कल्पना सुचली आणि त्यांनी ते पस्तीस रुपये खिशात घातले. पर्सचा पुन्हा एकदा सल्ला घेतला. ती अगदी रिकामी होती. त्यांनी तशीच तेथील झुडुपात फेकून दिली.

फोटो घेऊन ते स्टुडिओच्या रस्त्याला लागले. ते झपझप पावलं टाकू लागले...... ते दोघे स्टुडिओत आले त्या वेळी मालक खुर्चीवर सिगरेटचे झुरके घेत बसला होता. त्याला पाहताच कमलाकर म्हणाला, ''नमस्ते जी !''

''नमस्ते !'' त्या मालकानेही त्यांचे स्वागत केले.

''फोटो काढायचे आहेत?'' त्याने त्या दोघांना एकदम विचारले. नाही. जरा वेगळंच काम होतं आपणाकडे. कमलाकर आपल्या कामाकडे वळू लागला. मालकाचा चेहरा मात्र उतरला.

''काय काम आहे?'' त्याने आंबट चेहरा करून विचारले.

''हा फोटो आपणाकडे काढला आहे ना?'' केशवने खिशातील फोटो दाखवीत विचारले.

''हो.'' मालकाने फोटो पाहताच पुन्हा विचारले, ''मग ?''

''मग हा तरुण कोण आहे ?''

''त्याला फाईल पाहावी लागेल. सध्या मला वेळ नाही.''

मालकांनी हळूच गोळी सोडली आणि काय परिणाम होतो ते पाहात बसला. केशवने आणि कमळ्यानेही विचार केला की, याचा हात ओला केल्याशिवाय आपले काम होणार नाही. तिथे आपला काहीतरी लाग लागेल यात शंका नाही. असा काहीसा विचार करून केशवने त्याला विनवले,

Please, I will give you one rupee. Will you do this?

मालकानेही थोडासा विचार केल्यासारखे केले आणि निगेटिव्ह वगैरे पाहून त्या नंबरवरून पावती बुक तपासले आणि पावती काढून त्यावरचा पत्ता सांगितला.

'विजय वाच कंपनी', ९०४, चांदणी चौक.'

त्या दोघांनी काहीतरी ठरविले आणि या पत्त्यावर तलाश लावण्याचा त्यांनी निश्चय केला आणि ते निघाले. तेव्हा मालक त्यांना हाक मारीत म्हणाला,

''अहो, अहो, एक रुपया ?''

''द्यायचा का ?''

''मग ? वेळ नसताना तुमच्यासाठी एवढी उठाठेव केली. ''

''आमच्यासाठी ?''

''हो. हो. तुमच्यासाठी.'' मालकाचा सूर चढला.

''आमच्याकरिता केलेस मग रुपया कशाला ?''

''तुम्हाला रुपया द्यायचा आहे की नाही ?'' त्याने चेवाने विचारले.

''नाही दिला तर काय करणार आहेस ?'' केशवने हसत हसत विचारले.

''पोलिसांना तेथे बोलाविन.''

''आणि काय करशील?''

''फोटो चोरल्याचा आरोप ठेवीन तुमच्यावर.''

''पुरावा ?''

''कुठूनही गोळा करिन.''

''त्या वेळी पाहून घेऊ मग.''

''हं. इतके असाल असं वाटलं नव्हतं मला.''

''आता कळलं का ?'' असे म्हणत ते निघून गेले. मालक शिव्या देत तणतणत खुर्चीवर डोके खाजवीत बसला. त्याचा चेहरा पार उतरून गेला. तुरी दिली लेकाच्यांनी हातावर शेवटी.........

केशवने आणि कमलाकारने तेथून निघून तडक चांदणी चौक गाठला. त्यांनी सगळीकडे नजर फिरविली आणि 'विजय वाच कंपनी' हुडकून काढली. ते एक घड्याळाचे जंगी दुकान होते. खुर्चीवर एक तरुण गृहस्थ बसला होता. जवळच एक वयस्कर मनुष्य उभा होता. त्या दोघांचे काहीतरी संभाषण चालू होते. समोर असलेल्या हॉटेलमधून सारे निरीक्षण नीटपणे करता येईल, या हेतूने ते ह्या हॉटेलात शिरले. बाहेरच्या बाजूला बसूनच त्यांनी त्या तरुणाचे निरीक्षण चालविले. फोटोमधील तरुण तो हाच आहे हे त्यांनी प्रथमदर्शनीच ओळखले होते. पण तो तरुण आपल्या ओळखीचा आहे याबद्दल त्यांची पुन्हा खात्री झाली. आणि ते सत्यही ठरले. थोडा वेळ विचार करून केशव म्हणाला,

''आपल्या कॉलेजमध्येच होता हा.''

ती कल्पना लक्षात येताच कमलाकर आनंदातिरेकाने म्हणाला,

''Found it Fount it अरे, तोच तो शेखचा प्रियकर नार्वेकर.''

केशवलाही त्याची आता पूर्ण ओळख पटली आणि बील चुकते करत ते बाहेर आले. त्यांनी तेथेच आजूबाजूला राहून त्याच्या घरावर पाळत ठेवली. दुसऱ्या मजल्यावर चढण्याच्या जागा हेरून ठेवल्या आणि दुसरे दिवशी आपले कार्य साधायचे ठरवून ते मोकळे झाले......

आणि त्यांनी पुन्हा कमला मार्केटचा रस्ता धरला. संध्याकाळी पुन्हा ते त्या स्टुडिओत गेले. ते परत आलेले पाहून मालक जरा घाबरलाच. पण त्याला आनंदही झाला. अशा संमिश्र भावनेमध्ये असतानाच कमलाकर म्हणाला.


''या फोटोची डुप्लिकेट कॉपी देणार का एक ?''

''पहिला आणि हा मिळून दोन रुपये द्यावे लागतील.''

''हे घे दोन रुपये.''

दोन रुपये घेऊन, तो डुप्लिकेट कॉपी काढण्याच्या कामाला लागला. तोपर्यंत ते दोघेही तेथेच बसले होते. लवकरच दोन कॉपीज कमलाकरजवळ त्याने आणून दिल्या. ते दोघेजण निघून गेले. मालकाला आनंद झाला. त्याने आपल्या किल्लेदार मिशीवरून एकदा हात फिरवला आणि तो स्वतःशीच पुटपुटला, एकाच्या ऐवजी दोन रुपये काढले की नाही ? नावाचा छगनलाल आहे छगनलाल...

*****



.कमळ्या हा चेहरा तुला ओळखीचा वाटतो कां रे ?

# १९.

अमावास्येची रात्र होती. सगळीकडे दाट अंधार पसरला होता. समोर फुटावर उभे असलेले माणूस सुद्धा दिसत नव्हते. दोन वाजून गेले होते आणि इतका वेळ मागच्या बागेत लपून बसलेले ते दोघेजण इमारतीच्या मागच्या बाजूला असलेल्या मोरीच्या लोखंडी पाइपवरून हळूहळू वर चढून गेले. त्याच्या बाजूलाच असलेल्या कठड्यावरून ते पुढे पुढे सरकत होते. सरकत सरकत ते मंगल झोपला होता त्या खोलीजवळच्या खिडकीत आले. खिडकीचा दरवाजा बंद होता. आता मात्र त्यांना विचार पडला. त्यांना कुठून प्रवेश करावा हेच सुचेना. कारण त्यांनी फक्त एवढा एकच मार्ग हेरून ठेवला होता. त्या वेळी अंधारात दुसरा मार्ग शोधणे कठीण होते. तसेच त्यांनी जरा पुढे सरकायचे ठरविले. केशव पुढे सरकून गेला. कमलाकर सरकून गेल्यावर त्याचा हात खिडकीच्या दाराला लागला. तोच ते दार जरा ढकलले गेले. त्याने केशवाला खूण केली. त्यांचे एक तरी कार्य पार पडले होते. ते त्या खिडकीतून अगदी आवाज न करता आत आले. त्यांनी बॅटरीच्या साहाय्याने सर्व काही पाहून घेतले. कमरेची रस्सी सोडून आणि स्कार्फ काढून त्यांनी त्या म्हाताऱ्याची वाट लावायचे ठरविले. आवाज न करता अचानक झडप घालून केशवने त्याच्या तोंडात स्कार्फचा बोळा कोंबला. कमलाकारने तोपर्यंत हातपाय बांधून

टाकले. त्याच स्कार्फने डोळेही बांधून टाकण्यास ते विसरले नाहीत. हे काम त्यांनी इतक्या सफाईदारपणे की एवढ्या वेळात थोडा सुद्धा आवाज झाला नाही. सदाच्या तोंडात इतक्या शिताफीने बोळा कोंबला की, त्याला ओरडायला वेळच मिळाला नाही. त्याला तेथेच ठेवून ते मंगल कडे वळले. कमळ्याने मंगल वर पिस्तूल रोखले आणि जादा आवाज न करता केशवने मंगलला उठविले. मंगल जेव्हा जागा झाला तेव्हा त्यांनी पॉवरफुल बॅटरीचा झोत त्याच्या तोंडावर एकदम सोडला. त्यामुळे मंगल एकदम घाबरला. त्याची बोबडीच वळली. तो ओरडण्यासाठी तोंड उघडणार इतक्यात कमळ्याने त्याला हळूच दम दिला.

''ओरडशील तर गोळीला बळी पडशील. लक्षात ठेव. अतिप्रसंग ओढवण्याच्या नसत्या भानगडीत पडू नकोस.''

मंगल आता पूर्ण जागा झाला होता. तो अगदी घाबरला होता. त्याला काय करावे हे सुचत नव्हते. तो त्यांच्याकडे नुसता पाहात राहिला, पण पाहता पाहता त्याने टेबललॅम्पकडे आपला हात वळवला. इतक्यात केशवच्या ते लक्षात आले. त्याने पुन्हा दम दिला.

''नार्वेकर, गप्प बैस. Don't try to be smart ! तुला पुन्हा सांगतो.''

''कोण तुम्ही ? आणि माझे नाव तुम्हाला कसे माहीत ?'' त्याने अगदी हळू आवाजात नि कापऱ्या स्वरातच विचारले.

''आम्ही ? हं......जे तुझ्याबरोबर दोन वर्षांपूर्वी चौपाटीवरची भेळ खाण्यात आनंद मानीत होते ते तुझे जानी दोस्त.... ज्यांनी तुझ्या प्रेयसीला छळणाऱ्यात भाग घेऊन त्याचा अतिरेक करून एक असुरी आनंद मिळविणारे तुझे झालेले शत्रू काळे नि गोरे ! पाहा...... असे म्हणून त्यांनी टेबललॅम्प लावला आणि लगेच विझविला. मंगलनेही त्यांना ओळखले. तो अजूनही भेदरलेल्या स्थितीतच होता. दोघांनीही त्याच्यावर पिस्तूल रोखून धरले होते.

''नार्वेकर, आज तुझा जीव घ्यायला अगर तुझे घर फोडायला आम्ही आलो नाहीत, तर तुला एक जाब विचारायला आलो आहोत.'' कमलाकरने पहिली सलामी दिली.

''काय विचारणार तुम्ही ? विचारा आणि लवकर चालते व्हा इथून.''

‘‘हा फोटो तू ओळखतोस का ?’’ असे म्हणून केशवने तो फोटो त्याला बॅटरीच्या उजेडात दाखविला.

‘‘होय.’’

‘‘कोणाचा आहे तो ?’’

‘‘माझा आणि एका तरुणीचा आहे.’’

‘‘ह्या तरुणीवर तुझे प्रेम आहे ना ?’’

‘‘होय.’’

‘‘सध्या तुझे मन संपूर्ण तिच्यावर आहे की नाही ?’’

‘‘होय.’’

‘‘मग शेखला वचन का दिलंस ?’’

‘‘ते विचारण्याचा तुमचा काय संबंध ?’’ मंगल चपापला.

‘‘तोंड आवर नार्वेकर. नीट बोल. नाहीतर प्राणाला मुकशील. आम्हाला शेखनी पाठवलं आहे खरी माहिती काढायला.’’

‘‘शेखनी ?’’

‘‘हं. शेखनी. आता हा फोटो शेखला नेऊन द्यायला तुझी काही हरकत आहे का ?’’

‘‘नको. काळे तो फोटो मला परत दे. शेखला काही एक कळू देऊ नकोस. तुला वाटेल तो मोबदला द्यायला मी तयार आहे.’’

‘‘दे मग. दे दहा हजार रोख.’’

‘‘दहा हजार ?’’

‘‘हो हो दहा हजार ! नाहीतर याच पावली चालते होतो. या पुढील परिणामाची तयारी ठेव म्हणजे झाले.’’

‘‘नको नको. आण तो फोटो आणि घे ही रक्कम.’’

तो कॉटवरून उतरून कपाटाकडे गेला. कपटाचा कप्पा उघडून त्याने पैसे काढले. अजूनही दोन पिस्तूल त्याच्यावर रोखलेली होती.

रत्ना खडबडून जागी झाली. शेजारी काहीतरी आवाज येतो आहे हे तिने ऐकले. पण स्पष्ट ऐकू येत नव्हते. ‘दहा हजार रोख ’ असे काहीतरी अस्पष्ट शब्द

तिच्या कानी आले होते. तिला धीर धरवेना. ती घाबरली आणि भेदरलेल्या मनःस्थितीत स्वयंपाकघराच्या दरवाजातून दिवाणखान्याकडे येऊ लागली. तोच तिला अस्पष्ट उजेडात सदा बांधलेल्या स्थितीत आढळला. ती एकदम किंचाळली. त्याबरोबर दोघांचे लक्ष मागे वळले. कमलाकरने एकदम तिच्या तोंडावर बॅटरीचा झोत पाडला. ती काल दुपारचीच तरुणी आहे हे त्यांनी तत्क्षणीच ओळखले.

केशवने मंगलवर रोखलेले पिस्तूल सावधगिरीने मागे घेतले नव्हते. त्याचे सर्व लक्ष मंगल वर होते. कमलाकर पुढे झाला.

''ओरडू नकोस. प्राणाला मुकशील.''

तरीपण तिने ऐकले नाही. ती बेभान झाली होती. तिने एकदम विचारले,

''कोण तुम्ही ?''

त्यासरशी कमलाकरने रत्नाला दंडाला धरून दूर लोटून दिले आणि तो माघारी फिरला. मंगल आता जास्तच घाबरला होता.

''हं. चल आटप. पैसे काढ लवकर.'' असे म्हणून कमळ्याने त्याच्यावर पुन्हा बॅटरीचा झोत सोडला.

रत्ना किंचित आदळली खरी, पण तशीच ती धडपडत उठली आणि झटकन मधल्या खोलीत असलेल्या सदाच्या खिशातील किल्ल्या तिने घेतल्या. तिच्याकडे कोणाचेच लक्ष नव्हते. आपल्या खोलीच्या दरवाजातून ती चटकन दुकानाच्या मागच्या बाजूला आली आणि कुलूप उघडून तिने डिरेक्टरीवर झडप घातली. तिने चटकन नंबर शोधून काढला आणि जवळच्याच फोनवर तिने तो लावून घेतला. ती भराभर बोलू लागली.

''हॅलो... हॅलो... इन्स्पेक्टर ?... बरं आहे लवकर पाठवा...कोण? इन्स्पेक्टर?... हं अगदी हातघाईवर प्रकरण आहे. ताबडतोब निघून या... काय?.... हं... विजय वाच कंपनी ९०४, चांदणी चौक.....अगदी लवकर या...हं....''

तिने रिसिव्हर खाली ठेवला आणि पुढील बाजूने ती फटीतून पाहू लागली...... मंगलने दहा हजाराचे बंडल दिले. कमलाकरने ते तसेच खिशात घातले. फोटो मंगलच्या अंगावर फेकून आल्या मार्गानी ते निघून गेले. जाताना 'याची वाच्यता कुठे केलीस तर गाठ आमच्याशी आहे,' असे बजावून जाण्यास ते विसरले

नाहीत......

रत्ना दुकानाच्या फटीतून पाहातच होती. तिला दूरवर प्रकाश दिसला. आणि तो आपल्याकडे येत आहे याची तिला खात्री झाली. ....

ते दोघेजण निघून गेल्यावर मंगलने लाईट लावली. सदा निश्चेष्ट स्थितीत पडला होता. त्याला सोडवून त्याच्या तोंडात त्याने पाणी घातले. तो शुद्धीवर आला. ताबडतोब त्याला रत्नाची आठवण झाली. तो तसाच स्वयंपाकघराच्या दिशेने गेला. तेथील दरवाजा उघडाच होता. तो रत्ना, रत्ना करीतच तिच्या खोलीत आला. पण ती तेथेही नव्हती. पुढचा दरवाजाही उघडा होता. तो जास्तच घाबरला. दुरून दिसणारा प्रकाश अगदी जवळ जवळ येत होता. लवकरच तो फाटकाजवळ आला. त्याबरोबर रत्ना मागच्या दरवाज्याने बाहेर आली. तिथे चटकन कुलूप लावून ती पुढे सरकली......

इन्स्पेक्टर फाटकाजवळ येताच फटफटीवरून खाली उतरले. त्यांनी बॅटरीच्या प्रकाशात आधी आजूबाजूला पाहाण्यास सुरुवात केली. इतक्यात दुकानाच्या मागच्या कोपऱ्याकडे त्यांना हालचाल दिसली. ते एकदम ओरडले,

Hands up!

रत्ना चटकन पुढे आली. इंस्पेक्टरही सामोरे येत होते. बॅटरीच्या प्रकाशात जेव्हा त्यांना ती स्त्री असल्याचे कळले तेव्हा ते एकदम पुढे झाले. रत्ना एकदम पण हळूच म्हणाली,

''चला वरती.''

''कोण आपण?'' त्याने दरडावून विचारले.

''मीच आपणाला फोन केला. लवकर वर चला.''

इन्स्पेक्टरनी एका पोलिसाला खाली ठेवून दोन पोलीस आपल्या बरोबर घेतले आणि ते रत्नाबरोबर वर गेले.....

मंगल उघड्या दरवाजातून बाहेर आला होता. तो अजून भेदरलेल्या स्थितीतच होता. तो माणसाची चाहूल लागताच दचकला आणि दाराजवळ उभा राहून इकडे तिकडे मागेपुढे वळून पाहू लागला. इतक्यात समोरून दोन तीन माणसे येत असावीत असे त्याला वाटले. तो पुन्हा भीतीने व्याकूळ झाला. तरीपण त्याने

दरडावले, कोण आहे ?

इन्स्पेक्टरनी बॅटरीचा झोत टाकीत त्याला रोखले.

''विजय'' असे म्हणून रत्ना एकदम इन्स्पेक्टरला मागे टाकून पुढे सरकली.

''कुठे गेले ते दोघेजण ?'' तिने विचारले.

मागोमाग इन्स्पेक्टरला पाहताच तो म्हणाला,

''उशीर झाला जरा. त्यांना जे काही करावयाचे होते ते करून गेले.''

''काय केलं ?''

''दहा हजार रुपये दम देऊन घेऊन गेले.''

''दम देऊन ?'' इन्स्पेक्टरनी विचारले.

''नुसता दम नव्हे, पिस्तूल रोखून.'' मंगल.

''किती जण होते ?''

''दोघे जण.''

''कुठून गेले ते ? आम्हाला जरा जागा दाखवाल का ?''

''चला.'' असे म्हणून ते पाचजण मंगलच्या खोलीत आले. त्यांनी इन्स्पेक्टरला खिडकीतून ते कसे गेले वगैरे सांगितले.....

''तुम्ही ओळखत होता तर त्यांना ?'' इन्स्पेक्टरनी त्याच्या तोंडी त्यांची नावे ऐकून चमकून विचारले.

''हो तर.''

''काय म्हणालात त्यांची नावे ?'' त्यांनी एका पोलिसाला ती उतरून घेण्यास सांगितले.

''केशव काळे आणि कमलाकर गोरे.''

''अस्स्स !'' म्हणून त्यांनी खाली जाऊन खिडकी खालच्या बागेतून त्या भिंतीवरच्या कठड्यावरून जाण्याचा मार्ग शोधून काढला. तो थेट मागच्या गॅलरीपर्यंत होता. त्याच्या पुढे त्यांना लोखंडी पाईप दिसून आला. त्यांनी त्यांचा वर जाण्याचा मार्ग एवढ्यावरून हुडकून काढला. बागेत त्यांनी आजूबाजूला पाहाण्यास सुरुवात केली. त्यांची प्रत्यक्ष पाऊले त्यांना कुठेच दिसली नाहीत. त्यांच्या रबरी बुटाचे आल्यागेल्याचे ठसे मात्र जागोजागी दिसत होते. गंजलेल्या पाइपवर हाताचे ठसे

तरी दिसतात का ते पाहण्याचा त्यांनी प्रयत्न केला, पण तिथेही त्यांची निराशा झाली. पण त्याच्या मागाहून लक्षात आले की, येताना ते याच पाइपवरून घसरत आले. म्हणून ते त्यांच्या जाण्याच्या मार्गावरील ठशांच्या रोखाने पुढे सरकू लागले. त्या रोखानेच ते थेट सडकेपर्यंत आले. पण पुढे डांबरी रोड असल्याने त्यांचा तपास खुंटला. एक दीर्घ उसासा सोडून ते मंगल कडे वळून म्हणाले,

''तुमच्या घरामध्ये त्यांनी काय काय केलं ते अगदी सविस्तर आणि अगदी हळूहळू सांगा पाहू !''

मंगल ने घरात घडलेला सर्व प्रकार त्यांना सांगितला. इन्स्पेक्टरनी नुसते ऐकून घेतले. रत्ना आणि सदा माडीवरच होते. तेथूनच ते नुसते पाहात होते, कारण रत्ना बरीच घाबरलेली होती म्हणून सदाही तिच्याबरोबर वरच राहिला होता. इन्स्पेक्टर आणि मंगल वर आले. त्यांनी तेथेच घरात आणखी काही पुरावा सापडतो का ते पाहण्यास सुरुवात केली. मंगलने सदाला बांधलेली रस्सी आणि तोंडात कोंबलेला तो स्कार्फ इन्स्पेक्टर जवळ दिला. स्कार्फ न्याहाळून पाहण्यास इन्स्पेक्टर विसरले नाहीत. पण त्यावर त्यांना विशेष काहीच सापडले नाही. शेवटी तो रस्सी आणि तो स्कार्फ घेऊन ते जायला निघाले. जाताना त्यांनी दोन तीन पोलीस खाली ठेवले होते. जाता जाता ते मंगलला म्हणाले,

''घरात अगर बागेत एखादी कमीजास्त नवीन वस्तू दिसली, तर तिला मुळीच हात लावू नका. नुसती पाहून ठेवा. आणि बागेतही विशेष सकाळी तुम्ही कोणी फिरकूच नका. मी साडेआठ नऊला येतो. खाली पोलीस आहेतच.'' असे म्हणून इन्स्पेक्टर निघून गेले.

सदा, रत्ना, मंगल एकमेकांच्या तोंडाकडेच पाहात बसले. मंगलने मात्र फोटोचा उल्लेख रत्नाजवळ मुळीच केला नाही आणि त्या वेळी सर्वजण घाबरलेले असल्यामुळे काय झाले? म्हणून कोणीच कोणाला विचारले नाही. चार वाजून गेले असल्यामुळे जो तो आपल्या उद्योगालाच लागला......

सकाळी नऊ वाजले असतील. दोन तरुण कमला मार्केटमधील एका मोठ्या हॉटेलमधील काही पदार्थांचा समाचार घेत होते. मधूनमधून ते आजूबाजूला पाहात होते. येणाऱ्या जाणाऱ्याकडेही ते पाहात होते आणि बशावर बशा संपवीत होते. कारण ते फारच दमलेले होते. जास्त दमल्यामुळे त्यांना भूकही सपाटून लागल्याचे दिसत होते, पण त्यांची मुद्राही भेदरलेलीच होती. ते सारखे इकडे तिकडे पाहातच होते. इतक्यात एकाची नजर एका कोपऱ्यात बसलेल्या इसमावर दृढ झाली. तो एकदम चपापला आणि हळूच तोंड फिरवून दुसऱ्याला म्हणाला,

''कमळ्या, घात झाला. ते बघ खान तेथे कोपऱ्यात बसले आहेत. आपल्याला पळून जाणे भाग आहे.''

कमळ्यानेही त्यांना पाहिले. तोही चपापला. पण चेहऱ्यावर शक्यतो हास्य ठेवीत ते दोन रुपयाची नोट मालकाला देऊन चटकन बाहेर पडले. बाहेर ठेवलेली आपली सायकल घेऊन ते तसेच पायी भरभर चालू लागले. कारण डबलसीटनेही गावातून जाताना त्यांना धोका वाटला.... तो कोपऱ्यात बसलेला इसमही चटकन उठला. हॉटेलचे बील सारून तोही बाहेर आला. त्याने आजूबाजूला पाहिले. ते दोघेजण सायकल हातात घेऊन भरभर चालत असलेले त्यांना दिसले. त्यांनी काहीतरी मनाशी ठरविले. तोही भरभर त्यांच्या मागोमाग जाऊ लागला. केशव कमळ्याने मुद्दाम बोळाबोळातून जाण्यास सुरुवात केली. हेतू हा की, मागचा इसम घोटाळ्यात पडावा आणि त्याने आपला नाद सोडावा. पण त्याने त्यांचा पुरा पिच्छाच पुरवायचा ठरविले होते. गल्लीबोळातून चौकशी करीत त्यांचा पाठलाग तो इसम करीत होता. असेच दहा पंधरा मिनिटे निघून गेली. शेवटी गनिमी पाठलाग संपला. केशव, कमलाकर दिल्ली आग्रा रोडवर आले. गावाबाहेरच होते ते जवळ जवळ. मागचा तो इसम अजून त्यांचा पाठलाग करीत होता.....

शहराबाहेर आल्यावर कमळ्या सायकलवर बसला. केशवने मागे नजर टाकली. तो इसम अजून मागे होता. केशवने पिस्तूलला हात घातला आणि तेथेच तो थांबला. कमळ्याही झाडाला धरून सायकलसह उभा राहिला. केशवने पिस्तूल बाहेर काढले. तो इसम फार जवळच होता. आजूबाजूला एवढ्या तिघांशिवाय चिटपाखरूही दिसत नव्हते. त्या इसमाने पुन्हा विचार केला आणि तो तसाच

माघारी फिरला. जाता जाता तो सारखा मागे पाहात होता. कमळ्याने सायकल सुरू केली. केशव मागच्या कॅरेजवर बसला होता. तो इसम तसाच पुन्हा शहरात चालला होता......

‘‘कमळ्या, तो पुन्हा आपला पाठलाग करेल. लवकर चल.’’

केशवने कमळ्याला चुचकारले. कमळ्यानेही पॅडल जोरात मारायला सुरुवात केली.....

तो इसम जवळ जवळ धावतच गावात आला. जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये जाऊन दोन पोलीस त्याने मदतीला मागितले. हवालदारानेही त्यांना सलाम करून दोन पोलीस दिले. चटकन तीन फटफट्या भाड्याने घेऊन ते तिघे पुन्हा त्यांच्या पाठलागाला निघाले. जाताना शस्त्र बरोबर घ्यायला मात्र ते विसरले नाहीत. जय्यत तयारीनिशीच ते निघाले होते. पोलीस स्टेशन सोडून ते पुढच्याच रोडला आले. इतक्यात मागाहून कोणीतरी हाक मारल्याचा भास झाल्यामुळे त्यांनी मागे पाहिले. त्या तिघांनीही फटफट्या थांबविल्या. मागाहून येणारी फटफटी त्यांच्याजवळ आली.....

‘‘मि. खान, तुम्ही कोणाच्या पाठलागाला निघाला आहात ? अगदी जय्यत तयारीत निघालतसे.’’

‘‘का? आपणाला काही सांगायचे आहे काय ? मला सध्या सवड नाही.’’

‘‘अहो, पण तुम्ही कुणाचा पाठलाग करणार आहात ?’’

‘‘ते दोन तरुण डाकू आहेत. मग ?’’

‘‘दोन तरुण डाकू ?’’

‘‘हं. मि. दुर्वे, आमचा वेळ घेऊ नका आता. जाऊ का मी ?’’

‘‘पण जरा थांबाच. त्यांची नाव माहीत असतील आपणाला ?’’

‘‘मग ?’’

‘‘सांगा ना जरा.’’

‘‘कमलाकर गोरे आणि केशव काळे’’

‘‘गोरे आणि काळे ?’’ दुर्वे इन्स्पेक्टर एकदम चमकले.

‘‘ते पळाले ? आणि तुम्ही त्यांचा पाठलाग करता आहात ? मुंबई सोडून

येथे त्यांना धरायला येण्याचे प्रयोजन काय ?'' दुर्वे इन्स्पेक्टरनी खान इंस्पेक्टरवर प्रश्नांची सरबत्ती चालविली.

''एका तरुणीच्या खुनाचा संशय आहे त्यांच्यावर. तेव्हा सी.आय.डी. ख्यात्यातर्फे यावं लागलं. बरं झालं का आता ? जाऊ का ?''

''मीही येतो ना. मलाही त्यांना पकडायचे आहे. मी त्यांच्याच मागावर आहे. काल दरोड्यासारखेच गमतीदार प्रकरण घडले एक.''

''बरं चला महाशय आता. गप्पा मारीत वेळ काढू नका. खान जरा चिडूनच म्हणाले आणि त्यांनी आपली फटफटी स्टार्ट केली..... चार फटफट्या दिल्ली आग्रा रोडवर धावू लागल्या.

क्षणाक्षणाला वेग वाढत होता. अत्यंत चवताळून आणि तुफान वेगाने ते चौघे जात होते. बऱ्याच वेळाने त्यांना दूरवर वळणावर एक सायकल दिसली. त्यांना आता आवेश चढला होता. जरा वेग कमी करूनच ते त्या सायकलचा पाठलाग करू लागले.....

सायकल अगदी वेगात ठेवण्याचा कमलाकर हिरीरीने प्रयत्न करीत होता. मागच्या कॅरेजवर बसलेल्या केशवने मागाहून फटफट्या येत आहेत हे हेरले. मघाचे खान इन्स्पेक्टरच आहेत हेही त्याने ताडले. त्याने कमलाकरला सांगितले,

''कमळ्या, इन्स्पेक्टर येत आहेत लवकर चल...''

कमळ्या, आणखी वेग वाढवू लागला... इन्स्पेक्टरही जोरात पुढे येत होते...

केशवने इन्स्पेक्टर मागे अगदी जवळ येत आहेत हे पहिले. त्याने घाबरत घाबरतच कमलाकरला सांगितले,

''कमळ्या, आता सायकल चालवता चालवता हत्यार खाली ठेव. सायकल जोरात जाऊ दे. मी मागाहून त्यांना आवरायचा प्रयत्न करतो. वेग कमी करू नकोस. मी पडलो तरी वेग वाढवून पुढे हो... आले... आले बघ. चल... चल लवकर कमळ्या...'' असे म्हणताच त्याने पिस्तूल काढले.... जरा एका अंगाला होऊन तो बसला...

इन्स्पेक्टर अगदी दहाबारा हातावर आले होते...

धुळीचे लोट आकाशात चालले होते......

धाड..... धुळीच्या लोटातून एक आवाज आला. इतक्यात त्या आवाजाबरोबर एका पोलिसाच्या हातावर गोळी लागली. तो खाली पडला, पण पडता पडता तोल सावरून तो फटफटीवर पुन्हा आरूढ झाला.....

धाड.... धाड.... धाड.... एका मागून एक आवाज येतच होते.

कमळ्याने आपली सायकल रोडच्या बाजूला असलेल्या धुळीच्या पायवाटेवरून नेण्यास सुरुवात केली. त्यामुळे धुळीचे लोट वाढू लागले. इन्स्पेक्टरना त्यामुळे पुढचे काहीच दिसेना. त्यांनी वेग अगदी कमी केला....

धाड.... तो पहिला पोलीस तत्क्षणीच जमिनीवर लोळला. खाननी ते पाहाताच दातओठ खाऊन फटफटी पुढे नेली आणि रस्त्याच्या दुसऱ्या बाजूने त्यांनी पाठलाग सुरू केला....

कमलाकर अगदी वेगात सायकल ठेवण्याचा प्रयत्न करीत होता.... केशव पिस्तूलचे आवाज करण्यात गुंग झाला होता..... खान साहेबांनीही थोडासा धीर येताच आपले पिस्तूल बाहेर काढले....पण.....पण दुर्दैवाने घाला घातला.

धाड.....खानच्या हातातले पिस्तूल जोराने कुठेतरी फेकले गेले. त्यांच्या हाताला जोरात हिसका बसला. फटफटीवरून पडता पडता तोल सावरीत त्यांनी आपली गती पुन्हा धारण केली....

दुर्वे तोपर्यंत पुढे गेले......

सायकल आणि दुर्वेची मोटारसायकल आता समोरासमोर आली होती. कमळ्याच्या सायकलची पॅडल आता जोराने फिरत होती. रस्त्याच्या दुसऱ्या बाजूने दुर्वेंच्या फटफटीची चाकेही जोरात फिरत होती. बाजूला येताच दुर्वेंनी पिस्तुलाला हात घातला. केशवाचे लक्ष मागे होते. कमळ्याने ते पाहिले. तो मगापासून पिस्तूल रोखून राहिला होता. पण मागे असणाऱ्या गाडीवर तो पिस्तूल झाडू शकत नव्हता आणि आता आलेली संधी दवडण्यासही कमलाकर तयार नव्हता. त्याने दुर्वेवर पिस्तूल रोखले. दुर्वेनी पिस्तूल बाहेर काढले मात्र......

धाड.....दुसऱ्याच क्षणी दुर्वे जमिनीवर आपटले.

मागून येणाऱ्या दोन फटफट्या पुन्हा केशवने हेरल्या.

धाड..... त्याने दुसरे पिस्तूल काढून एक बार केला. दुसरा पोलिसही खाली पडला.

अजून एक जण राहिला आहे.... कमळ्या, सूट पुढे. मी येथल्या एका झाडावर चढतो. पिस्तूल रोखलेले आहे बघ मागाहून. जपून जा. जोरात सायकल ने. पिस्तुलाचा उपयोग करायला विसरू नकोस. पळ....... असे म्हणताच चालू सायकलवरून त्याने एका वडाच्या पारंबीला धरले. सायकल सोडून दिली आणि पारंबीवरून सरसर तो वरच्या डहाळीवर गेला मात्र.....

धाड......मागून एक आवाज आला.....

त्याच रोखाने केशवनेही झाडावरून पिस्तूल झाडले....

एकदम फा....ड असा आवाज झाला आणि झाडाखालीच एक फटफटी आडवी झालेली केशवला दिसली.

फटफटीचा टायर फुटताच मात्र खान साहेब घाबरले. त्यांचे दुसरे पिस्तूलही कुठे उडाले होते. झाडावरून एक विकट हास्याचा ध्वनी त्यांच्या कानी आला. त्यांनी चमकून वर पहिले....

“Hands Up !” खान साहेब सारा जोर एकवटून ओरडले आणि त्यांनी जंबिया बाहेर काढला.

“Hands Up !” तितक्याच जोरात खानच्या कानात प्रतिध्वनी घुमला.

केशवनेही तितक्याच चलाखीने आपला जंबिया बाहेर काढला.....

डोळ्याचे पाते लवते न लवते तोच खानन्नी जंबिया वर फेकला. केशव डोळ्यात तेल घालून बसला होता. त्याने तो वार तसाच चुकवला. जंबिया फांदीला जाऊन लटकला. केशनेही आपला जंबिया भिरकावला. खानन्नी तो चुकविण्याचा प्रयत्न केला....पण दुर्दैव तेथेच आडवे आले... उजव्या दंडावरच तो जंबिया बसला. ते धाडकन खाली आदळले...

मागे फटफटीचा आवाज येत नव्हता... कमलाकरनेही ते हेरले. त्याने मागे पाहिले. मागची धूळ आता बरीच निवळली होती. दूरवर त्याने नजर रोखली. कुठे कोणीच नव्हते. एक मनुष्य मात्र फटफटीजवळ पडलेला त्याला लांबून दिसला. त्याला वाटले, ‘केशव तरी सुरक्षित आहे ना?’ तो सायकलवरून खाली उतरला...

शहराच्या बाजूने एक मोटार भरधाव येत होती.... केशव पुन्हा घाबरला... त्याने पिस्तूल सावरले.... आणि एक बार हवेत केला.... मोटारीचा वेग अगदी कमी झाला....

कमळ्याही दुरून येत असलेली मोटार पाहून घाबरला. त्यानेही सायकलला पुन्हा हात घातला. पण मोटारीपुढे सायकलचा टिकाव लागणार नाही, हे जाणून त्याने पिस्तुलाचा आधार घेण्याचे ठरविले आणि पहिली सलामी हवेत दिली....

मोटार अगदी सावकाश आली... केशवने पारंबीवरूनच मोटारीमध्ये एकदम उडी घेतली... आणि पिस्तूल रोखले.

गाडीमध्ये ड्रायव्हर एकटाच होता... तो घाबरला... गाडी एकदम उभी राहिली....

गाडी चालू ठेव..... पिस्तूल रोखून केशवने ड्रायव्हरला दरडावले....त्याने हळूहळू आणि दबकतच गाडी चालू केली.....

मोटार हळूहळू चालूच होती..... ड्रायव्हर घाबरला होता..... थोडे पुढे येताच लांबून एक सायकल केशवाला दिसली आणि झाडाच्या बाजूलाच कमळ्या उभा होता...

खान तसेच बेशुद्धावस्थेत पडले होते...

''कमळ्या'' केशवने जोरात हाक मारली.

कमळ्या एकदम पुढे आला. चालू मोटरमध्येच तो झटकन चढला. ड्रायव्हर आता तर फारच घाबरला होता...'एकाला दोन' तो हळूच पुटपुटला.....

घाबरू नकोस.... गाडी पुढे नेणार आहेस काय ?'' केशवने खालच्या आवाजात विचारले.

''हो....हो...''

''कुठे ?''

''आ...गऱ्याला''

''मुंबईला येणार का ?''

''न....न....नको.....'' तो चाचरत म्हणाला.

''पाच हजार रुपये देतो.''

''पाच....हजार !'' त्याचा चेहरा जरा खुलला.

''नेतोस का ?''

''नेतो.''

''गाडी फास्ट सोड मात्र.''

''हा साहेब.'' असे म्हणून त्याने स्पीड वाढविला... गाडी भरधाव सुटली.... दिल्ली – मुंबई रोडवर मोटारीचा आवाज घुमू लागला...

तास दीडतासाने खान साहेब शुद्धीवर आले. थोड्याच वेळात ते उठून उभे राहिले. दंडातून अजून रक्त येतच होते. त्यांनी रुमाल काढला. त्याचे एक टोक दातात धरून डाव्या हातानी तो रुमाल त्यांनी दंडाच्या जखमेवर बांधला. स्वतःची मोटारसायकल खलास झाली आहे हे त्यांनी पाहिले. ते हळूहळू मागे आले. तेथे एक फटफटी त्यांना दिसली. बाजूला इन्स्पेक्टर दुर्वे पडले होते. त्यांच्या जवळ जाऊन त्यांनी पाहिले. ते बेशुद्ध होते. त्याची फटफटी व्यवस्थित आहे का ते पाहिले. ती व्यवस्थित होती. खान फटफटीवर स्वार झाले.

थोडे पुढे येताच थोड्या थोड्या अंतरावर त्यांना ते दोन पोलीसही बेशुद्ध पडलेले पाहायला मिळाले. त्यांच्याकडे एकवार नजर फिरवून ते भरवेगाने सरकारी दवाखान्यात आले. तेथे डॉक्टरकडे जाऊन त्यांना त्या तिघांनाही ॲम्ब्युलन्स पाठवून आणून घेण्याविषयी सांगितले आणि दंडाला ड्रेसिंग करून घेऊन तेथेच त्यांनी पोलीस ऑफिसला फोन केला. दोन मिनिटे सर्व माहिती देऊन त्यांनी नंतर घड्याळ पाहिले. आणि ताबडतोब विमानतळाकडे फटफटी सोडली.....

*****

# २०.

सूर्य क्षितिजावर येऊ लागला होता. पूर्व दिशेने ताम्रवस्त्र परिधान केले होते. रत्ना गुलाबाची आणि दुसरी चांगली चांगली फुले तोडीत असावी. मंगलही बागेत शीळ घालीत हिंडत होता. प्रभात समयी रत्नाचा कंठ मोकळा झाला....

दोन मनांचे होईल का मिलन ?  ।।ध्रु.।।
नीरीच्या घोळी पाय घुटमळे
मन उडुनी ते फिरे कुणीकडे
वसंत तो बहरला
फिटेल का नेत्रांची गुंफण ?
होईल का मिलन ?
थरथर थरथर काया कापे
सागर मंथन अरे थबकले
अमृतघट तो आला
करुनि घे अधरामृता प्राशन
होईल का मिलन ?
निलीम सागर निलीम अंबर
हेलकावती लाटा सुंदर
घेती आता धाव
पलीकडे क्षितिजाशी पाहून
होईल का मिलन ?

आज अचानक मनात दाटे
पदर आज हा कसा सळसळे
गुलाम चोर आता
करुनी घे देहाचे क्षालन
होईल का मिलन ?..........

मंगल गाणं ऐकून मंत्रमुग्ध झाला होता. तिचे गाणे संपले तरी तो शीटीमध्ये ध्रुवपद गुणगुणतच होता. रत्ना एका फांदीला धरून उभी होती. शीळ वाजवता वाजवताच त्याने खिशातून एक फोटो काढला आणि शीळ वाजवीतच त्याने तो तिला आपल्याच हातात धरून दाखविला. फोटो पाहून रत्ना चकित झाली. हा फोटो इथे कसा काय आला? तिला क्षणभर शंका आली. यांनीच ती पर्स.... पण छे !.... ते शक्य नाही..... इतक्यात तो फोटो तिने त्याच्या हातातून चटकन घेतला आणि ती न्याहाळून पाहू लागली. तिची मुद्रा शंकित दिसू लागली. मंगलही तिच्याकडे पाहू लागला....

''आपण काढलेली ही कॉपी नव्हे. ही जरा फिक्कट आणि काळसर दिसते आहे आणि लाईट कमी मारली आहे या कॉपीमध्ये. अशी नव्हती आपली पहिली कॉपी.'' ती गंभीर आणि शंकित नजरेने म्हणाली.

मंगलही विचारात पडला. 'मग ही डुप्लिकेट कॉपी असली पाहिजे. त्यांनी आपल्याला चांगलंच बनवलं तर. आपल्या हातात एक कॉपी देऊन दुसरी कॉपी ते घेऊन गेलेत. आता ते नक्की अस्मतकडे जाणार. आणि......' तो मनातल्या मनातच म्हणाला. स्टुडिओत जाऊन येतो मी. असे म्हणून तो तेथून निघाला. रत्ना त्याच्याकडे पाहातच राहिली.

जाता जाता त्याने ठरवले की, पुढच्याच गाडीने मुंबईला जाणे भाग आहे आता.....

*****

# २१.

केशव आणि कमलाकर हे दुसऱ्या दिवशी रात्री आपले राहिलेले कार्य पुरे करण्यासाठी निघाले. पण त्यांची शंभरी आता पूर्ण भरत आली होती. मुंबईचे सी.आय.डी. त्यांच्या पाळतीवर होते. हे त्यांनाही माहीत होते आणि म्हणूनच त्यांनी आजचे कार्य फार उत्तम रीतीने हाताळायचे ठरविले. त्यांना आज फार सावधगिरी बाळगावी लागणार होती. ते एका गेस्ट हाऊसमध्ये गेले. तेथेही एक दोन माणसे त्यांच्या पाळतीवर होतीच. वर जाता जाता त्यांना दोन माणसे दिसली. त्यांचा वेष मुसलमानी होता. लांब लांब दाढ्या होत्या. त्यांना एक युक्ती सुचली. त्या दोघांना त्यांनी बोलावून घेतले आणि विचारले,

''तुमचे कपडे आम्हाला देता का ? दोनशे रुपये मोबदला आणि आमचे कपडे तुम्हाला देतो.''

''दोनशे रुपये ?'' त्यांच्यापैकी एक उद्गारला.

''आणि तुमचे कपडे ?'' दुसरा उद्गारला.

''हो...'' दोघांनीही सूर चढवला.

आणि कपड्यांची अदलाबदल झाली. त्यांना दोनशे रुपये आणि कपडे देऊन टाकले. ते आपल्या रूममध्ये आले. त्यांनी आपल्या मुखवट्याना दाढी लावली. त्या मुसलमानी पेहरावात ते ऐटीत गेस्ट हाऊसच्या बाहेर पडले. आजूबाजूला कोणाला कल्पनाही आली नाही की, मगा गेलेले गृहस्थ आहेत म्हणून.

ते मुकाट्याने पुढे चालू लागले. ते जवळ जवळ अस्मतच्या घरापर्यंत आले असतील नसतील तोच त्यांना पुन्हा शंका आली. तो हळूच म्हणाला,

''कमळ्या, कोणीतरी हेरते आहे अजून आपल्याला.''

''बघू या पुढच्या पुढे. हे नुसते हेरून काय करतील ?''

असे म्हणून ते झरझर अस्मतच्या घराच्या मागे आले. दाट अंधार होता. ते मागच्या भिंतीवरून पाईपच्या आधाराने वर चढू लागले. ते जवळ जवळ वर चढून गेलेही असतील नसतील तोच त्यांना जरा दूरवर शिट्ट्यांचे आवाज ऐकू येऊ लागले. ते जरा गोंधळले. चटकन वर येऊन एका खिडकीतून त्यांनी आत उडी घेतली आणि खिडकी पुन्हा बंद केली....

इतक्यात पलंगावर झोपलेली अस्मत दचकून जागी झाली. तिची दातखीळच बसायची वेळ आली होती. ती 'चोर चोर' म्हणून ओरडणार तोच तिच्यावर पिस्तूल रोखले गेले.

''शेख घाबरू नकोस. आम्ही चोर नाहीत. तुझ्याकडे डाका घालायला आम्ही आलो नाहीत. तुला एक अत्यंत महत्त्वाची की ज्याच्यावर तुझे जीवन अवलंबून आहे अशी गोष्ट सांगायला आलो आहोत... पण एकाच अटीवर...''

अस्मत गोंधळली होती. तिला वरील शब्दांनी धीर आला. आपले नाव त्यांना माहीत आहे म्हणजे, हे कदाचित खरेही असू शकेल, असे समजून तिने एकदम विचारले,

''कोणती अट?''

''पोलीस आमच्या मागोमाग आले आहेत. ते घरात येतील आता. त्यांना थापा मारून पिटाळून लाव. तुझ्या जीवनाचा घडा आमच्या हातात आहे. दिल्लीहून आलो आहोत आम्ही.''

तिच्या डोळ्यात एकदम प्रकाश पडला. हे प्रकरण काहीतरी मंगलविषयी असेल... पोलिसांना परतून लावावे.

इतक्यात खाली कसलातरी गोंधळ ऐकू आला. खोलीचे दार बाहेरून लावून घेऊन ती खाली आली. तो दारात पोलीस उभे. आईजवळ ते काहीतरी बोलत होते. आई बावरली होती. घाबरली होती. इतक्यात अस्मत तिथे आली.

''काय भानगड आहे ?'' तिने विचारले.

''कोणी चोर तुमच्या घरात आले आहेत काय ?''

''कोण? नाही.... मी जवळ जवळ दोन तास झाले वाचत बसले आहे. कोणीच आलं नाही. कुठं आवाजही झाला नाही.''

पोलिसांचा नाईलाज झाला. ते निघून गेले. आईलाही धीर आला. तरीपण ती अस्मतला म्हणाली,

''बाळ, खालीच झोप आता.''

''नको. काय होतंय त्याला ? कोण यायला लागलंय ?''

असे म्हणून ती माडीवर जाऊ लागली. आईही निघून गेली. अस्मत खोलीत आली आणि तिने लाईट लावली.

''गेले सारे पोलीस.'' ती म्हणाली. त्यांनी एक दीर्घ सुस्कारा टाकला.

''शेख, तुमचं नार्वेकरवर निस्सीम प्रेम आहे ना ?''

अस्मत जरा चपापली. ''हो. पण तुम्हाला त्याच्याशी काय करायचं आहे? कोण तुम्ही?'' तिने घाबरत घाबरत प्रथम विचारले.

त्यांनी दाढी आणि मुखवटा काढला आणि विचारले,

''ओळखलं का आता ?''

अस्मतने जरासा विचार केला. त्यांच्या चेहऱ्याचे निरीक्षण केले आणि थोड्या वेळातच ती म्हणाली,

''काळे आणि.....''

''अगदी बरोबर.''

पण ती जास्तच घाबरली. तिच्या डोळ्यापुढे रेल्वेतील प्रसंग उभा राहिला. घाबरण्याचे काही कारण नाही शेख. तुझ्या केसाला धक्का लावणार नाही आम्ही.

''आमच्या पहिल्या प्रश्नाच उत्तर दे.''

''काय ?''

''तुझं नार्वेकरवर निस्सीम प्रेम आहे का ?''

''होय.''

''त्यांनी दुसऱ्या एखाद्या स्त्रीशी प्रेमसंबंध ठेवलेला तुला कळला तर तू

काय करशील ?''

''काय ?'' ती चपापून उच्चारली. ''तुम्ही म्हणता तरी काय हे ?''

''योग्यच बोलतो आहोत.'' असे म्हणून त्यांनी खिशातले दोन्ही फोटो काढले आणि एक फोटो दाखवीत तो म्हणाला,

''हा नार्वेकरचाच फोटो आहे ना ?''

फोटो पाहाताच ती जवळ जवळ किंचाळायलाच लागली. पण पुन्हा आई वगैरे जागी होऊन वर येईल या भीतीने ती गप्प बसली.

''ओरडू नकोस. जागे होतील कोणी. मग ?

''तो फोटो तुम्ही मला द्या आणि तो दुसरा फोटो कसला आहे बघू.''

''एकाच पर्समधील दोन फोटो आहेत हे.'' दुसरा फोटो हाती देत केशव म्हणाला.

दुसरा फोटोही ती न्याहाळून पाहू लागली. तिला कसली तरी आठवण झाली. 'हाच फोटो कुंदा कडेही आहे.' ती स्वतःशीच पुटपुटली.

''बरं. हे दोन्ही फोटो द्या मला.''

''दहा हजार रुपये द्यावे लागतील.''

ती एकदम गोंधळली.

''इतके नाहीत माझ्याजवळ सध्या.''

''मग ?''

''पाच हजार रुपये आहे. देऊ का ?''

त्या दोघांनी काहीतरी विचार केला आणि म्हटले, दे.

अस्मत शेजारच्या खोलीत गेली आणि पेटीतल्या नोटा घेऊन आली. त्यांना त्या देऊन टाकल्या. कमलाकरने ते फोटोही तिच्या अंगावर फेकून दिले आणि म्हणाला, Good Night. बसा भांडत आता. असे म्हणून ते दोघे निघून गेले.

अस्मत रात्रभर विचार करीत होती. 'आपणाला पत्र पाठवू नको म्हणून त्यांनी सांगितलं, त्याचं कारण हेच असावं. मला वचन देऊन ते दुसऱ्या स्त्रीशी प्रेम करतात. हे का ?...... एकाच पर्स मधील दोन फोटो.... मग हा दुसरा फोटो कोणाचा ? त्याच स्त्रीचा लहानपणीचा असला पाहिजे; पण त्याची कॉपी कुंदाकडेही आहे. त्यापैकी एक फोटो कुंदाचाही आहे. मग ही स्त्री कोण?...'

असाच विचार करीत अस्मत तळमळत पडली होती....

सकाळी लवकर उठून तिने सर्वकाही भरभर आटोपले. चहा वगैरे घेऊन ती कुंदाकडे आली. कुंदाचेही नुकतेच सारे आटोपले होते. तिने घाबरलेल्या अस्मतला पाहिले.

''काय ? इतक्या सकाळीच येण केलंस.''

''काम आहे जरा.'' ती भरभर म्हणाली.

''काय ?''

''जरा वर जाऊ चल.''

कुंदाला काहीच कळेना. पण अस्मत काहीतरी गोंधळात आहे हे मात्र तिने जाणले आणि त्या दोघी वर गेल्या. वरती जाताच अस्मतने तिला पाहिजे असलेला भिंतीवरचा एक जुना फोटो काढून घेऊन त्या दोघी कॉटवर बसल्या.

अस्मतने स्वतः जवळची तीच कॉपी फक्त काढली आणि त्या दोन फोटोतील साम्य पाहू लागली. कुंदा तिच्याकडे इतका वेळ फक्त स्तब्धतेने पाहात होती. ती म्हणाली,

''काय पाहतेस अस्मत ?''

''हे दोन फोटो अगदी सारखे आहेत की नाही ?'' तिने आतुरतेने विचारले.

''हो. मग ?'' कुंदाने अस्मतकडची कॉपी हातात घेऊन म्हटले.

''कोणाचा आहे हा फोटो ?''

''नववीत असताना नाही का संमेलनाच्या नाटकात आमच्या दोघींचा सिन घेतला होता काणे सरांनी ?''

''कोण गं दोघी ? मला नाही आठवत.''

''मी आणि शोभा नार्वेकर.''

''शोभा नार्वेकर....... '' ती दीर्घ उसासा टाकीत म्हणाली.

''का ? काय झाले ?''

''बरं. हा फोटो तुला कोणाचा वाटतो ?'' दुसरा फोटो दाखवीत अस्मतने अगदी निर्विकार चेहऱ्याने विचारले.

''काय गं हे ?'' कुंदा एकदम चमकली.

''काही नाही. Fate is against me now ! किस्मत का खेल !

तिने दोन्ही फोटो हातात घेतले.

''या दोन्ही फोटोंचा काय संबंध ? एकाच स्त्रीजवळ असलेले हे दोन फोटो आहेत.''

कुंदाने दोन्ही फोटोचे निरीक्षण केले. लवकरच तिला कळून चुकले की, शोभाचा आपल्याबरोबर असलेला लहानपणीचा तो फोटो आहे. त्याच प्रमाणे हा हल्लीचा पण तिचाच फोटो असला पाहिजे. कारण चेहऱ्यात पुष्कळ साम्य दिसते आहे. ती मनाशीच काहीतरी पुटपुटली. तीन वर्षापूर्वी शोभा ही कुंदाची चांगली मैत्रीण होती. तीन वर्षां पूर्वी शोभाने कोणालाही न सांगता अचानक मुंबई सोडली होती. तेंव्हापासून कुंदाला तिचा पत्ता माहीत नव्हता. त्यामुळे तीन वर्षापूर्वीच्या चेहऱ्यात विशेषसा फरक काय पडणार? त्यामुळे तो फोटो शोभाचाच असल्याचे तिने निश्चित ठरविले आणि तिने निर्णय दिला,

''हे दोन्ही फोटो शोभा नार्वेकरचेच आहेत हे अगदी नक्की.''

''हं... शोभा नार्वेकर.....'' ती पुन्हा उच्चारली.

''पण अस्मत, मंगलचे तिच्यावर प्रेम आहे हाच याचा अर्थ ना ?''

''होय. पण विशेष हे की, शोभा नार्वेकर ही त्याची सख्खी बहीण आहे. कुंदा......''

''बहीण ?....'' ती जवळ जवळ किंचाळलीच.

थोडा वेळ कोणी काहीच बोलले नाही. नंतर अस्मत म्हणाली,

''कुंदा, मी जाते. आत्ताच्या आत्ता पत्र लिहून टाकते. एक्स्प्रेस डिलिव्हरीने.''

कुंदा काहीच बोलली नाही. ती नुसती दारापर्यंत तिच्याबरोबर आली मात्र......

*****

# २२.

दिवाळीची आरास साऱ्या दिल्लीमध्ये धुमधडाक्यात सुरू होती. आज दिवाळीचा शेवटचा दिवस होता. पहाटे अभ्यंगस्नानाने सुरुवात झाली. घरोघरी पणत्या तेवत होत्या. रस्त्यारस्त्यावर शोभेच्या दारूचे आवाज निघत होते. दिवाळी दीपोत्सव उत्साहाने साजरा झालेला दिसत होता. आकाशातल्या तारका लोपल्याचा भास होत होता. अंबरपट अवनीवरच आहे की काय असे वाटत होते.

चोहीकडे आनंदी आनंद होता.....

...पण रत्ना दुःखी चेहऱ्याने स्वयंपाकघरात बसली होती. तिच्या हृदयाला आज काहीतरी डाचत होते. तिला पूर्वस्मृतींने घेरले होते.... आज भाऊबीज. कराचीत असताना तिला ती अखेरची भाऊबीज आठवली. तिने हातातली अंगठी काढली. तिचा वरचा कप्पा उघडला. आत अगदी लहानसा फोटो होता मंगलचा. शोभा मंगलला ओवाळीत असलेली त्यात दिसत होती. त्या वेळची कुमारी शोभा नार्वेकर आता बालविधवा रत्ना दिवेकर झाली होती, पण त्या वेळचा मंगल कुठे आहे आता? आज भाऊबीज म्हणून तिला अधिक तीव्रतेने त्याची जाणीव झाली. दादा..... दादा..... दादा !!!
असे म्हणून तिने तसेच भिंतीला डोके टेकले...

थोड्याच वेळात सदा एक पत्र घेऊन आत आला. ''मुंबईहून पत्र आले आहे एक.'' तो म्हणाला.

रत्ना भानावर आली.

''पत्र ? कोणाचं आहे ?''

''मुंबईचं आहे बुवा. कुणाचं आहे कोण जाणे ?''

रत्नाने ते पत्र सदाच्या हातून घेतले. पत्र घेऊन फोडता फोडता ती म्हणाली.

''ते गेले ते अजून आले नाहीत. कुठे गेलेत कोण जाणे ?''

तिने पत्र फोडून वाचयला सुरुवात केली....

प्रिय मंगल.

पहिलेच शब्द वाचताना भोवळ आल्यासारखी वाटली.

''कोणाचं आहे पत्र हे ?'' तिने सदाला विचारता विचारता पाकिटावरचा पत्ता वाचला.....

''The Propriter of Vijay Watch Co,

Vijay Watch Co. New Delhi.''

''पत्ता तर त्यांचाच आहे.'' ती खोल आवाजात उत्तरली. हे आहे तरी काय? असे संतापाने म्हणत तिने पत्र वाचण्यास सुरूवात केली.

'आपण मला पत्र पाठवू नकोस असे लिहिले होते. आपण कारण दाखविलेत ते फिरतीवर जाण्याचे, पण फिरतीवर जाण्याचे कारण दाखवून दुसऱ्या एका स्त्रीच्या तुम्ही प्रेमात सापडलात. तुमच्या नव्या प्रेमात माझा काटा नको म्हणून माझा पत्रव्यवहार बंद केलात. मंगल, येथून जाताना दिलेले वचन आपणाला आठवते आहे का ? दुसऱ्या स्त्रीच्या नादी लागलात तेंव्हा त्या वचनाची आठवण आपणाला झाली का ? स्त्री म्हणजे पुरुषाच्या हातचे बाहुले वाटले का तुम्हाला, की जे पुरुषांनी वाटेल तसे नाचवावे ?

मंगल, मला सोडून परस्त्रीच्या प्रेमात सापडताना आपण कसला तरी विचार केलात का ? आपण ज्या स्त्रीशी प्रेम करता ती शोभा नार्वेकर प्रत्यक्ष आपली सख्खी बहीण आहे हे साधे नातेही तुमच्या लक्षात आले नाही. किती अनाचार चालविला आहे तुम्ही ? तुम्हाला आपल्या बहिणीवर प्रेयसीवत प्रेम करताना जनाची तर नाहीच पण मनाचीही काहीच लाज वाटली नाही ना ? कुठे गेली तुमची नेहमीची सद्‌सद्‌ विवेकबुद्धी? तुम्ही काय करायचे ठेवले आहे या कृत्यांनी?

हजारो मानव जन्माला येतील, प्रेमी जीवन जगातील, पण आपणासारखे आपणच जगलात हे लक्षात ठेवा.

वचनाला विसरून नैतिक धर्मालाही आपण सोडलंत. स्त्री म्हणजे भाजीपाला नव्हे की यःकश्चित फूल नव्हे; की वाटलं तर आस्वाद घ्यावा नाहीतर पायदळी फेकून द्यावं. तिला मानवी मन असतं हे लक्षात असू द्या. तिने तुमच्या एकाच वेळी चार अवस्था सांभाळल्या आहेत. माता म्हणून ती तुम्हाला जन्म देते. भगिनी म्हणून ती तुम्हाला आपल्या कर्तव्याची पंचारती करून ओवाळते. पत्नी म्हणून ती तुमच्या संसारात अर्धांगी होऊन प्रवेश करते. कन्या म्हणून ती तुमच्या पोटी जन्म घेते. लक्षात ठेवा मंगल. या स्त्रीच्या प्रत्येक अवस्थेशी पुरुषांनी एका ठरावीक नैतिक कर्तव्यांने वागायचे असते. आपला नैतिक अधःपात करून घेत आहात, भगिनीच्या प्रेमात सापडून ! भगिनी ही जीवनाच्या मार्गाकडे नुसती बोट दाखवणारी मार्गदर्शक देवता आहे, पण त्या मार्गावरून तुम्हाला जायला मदत करणारी स्त्री, ती तुमची एक आणि फक्त एकच तुमची सहचारिणी असते. केवळ स्त्री ही नादान पुरुषांकरिता बनविलेली चैनीची वस्तू नसून नीतिमत्तेनी चालणाऱ्या पुरुषांकरिताच ती कर्तव्याची भूमिका आहे. समजलात ?

विचार करा मंगल. आपण हे काय चालवल आहे ? आजपासून तीन दिवसांनी तुम्ही मला जगात कुठेही पाहू शकणार नाही. आपल्या प्रेमाच्या मृगजळावर मी जगले आणि आपल्या प्रेमाच्याच मृगजळावर मी मरणार आहे हे विसरू नका.

बस्स ! फार काय लिहू ? माझी लेखणी, माझा हात असमर्थ आहेत आपणाला लिहायला.....

आपली यमपाशाभिलाषी,

– अस्मत –

रत्नाने पत्र वाचले. ती ते पत्र तसेच धरून कितीतरी वेळ उभी होती. उभे राहताना तिला भिंतीचा आधार घ्यावा लागत होता. ती त्या कागदाच्या घड्या करीत होती. पुन्हा उघडीत होती. पुन्हा घड्या घालीत होती आणि नजर समोर रोखली होती. तिचा चेहरा अगदी निर्विकार झाला होता.....

काही वेळाने खाली पडलेले पाकीट तिने उचलले आणि पाठवणाऱ्याचा पत्ता वाचला.

कु.अस्मत शेख.

२०५, लेडी जमशेटजी रोड,

आयडियल होम, माहीम,

मुंबई १६.

ती तशीच थोडा वेळ स्तब्ध राहिली. पुन्हा थोड्या वेळाने तीने हाक मारली,

''सदाकाका !''

सदा आला. तो दारातच होता तोपर्यंत ती म्हणाली,

''गाडी बाहेर काढा. विमानतळावर जायचं आहे आत्ता.''

सदा प्रसंग साधारण जाणून होता. दुःखी वातावरण दिसल्याने तो जास्त बोलण्याच्या भानगडीत पडला नाही. रत्नाने घाईघाईने पातळ बदलले. तिजोरी उघडून पैसे घेतले आणि खाली आली. सदाने गाडी स्टार्ट केलेलीच होती.....

*****

# २३.

सायंकाळी मुंबईत जिकडे तिकडे दीपोत्सवास सुरुवात झाली होती. लहान लहान बाळ गोपाळ दीपावलीची मजा मनमुराद लुटत होते....

....आणि मंगल माटुंगा स्टेशनवर उतरून आयडियल होमकडे त्वेषाने जात होता. दारात येताच त्याने दारावरील बेल वाजविली. एका वयस्कर स्त्रीने दार उघडले.

''अस्मत आहे का घरात ?'' मंगलने मागचा पुढचा विचार न करता विचारले.

''कोण आपण ?'' तिने शंकित स्वरात विचारले.

''मंगल नार्वेकर.'' त्याने निर्विकार मुद्रेने उत्तर दिले.

''मंगल.....'' ती स्त्री चपापली. तिची मुद्रा एकदम गंभीर झाली. ती दोन पाऊले एकदम मागे सरकली. मंगलही पुढे जाण्याच्या उद्देशाने दाराच्या आत आला.

''कराचीत नाहीसा झालेला मंगल......'' ती अडखळत उच्चारली. तिचे डोळे अजूनही डबडबलेले होते. मंगल तिच्याकडे पाहू लागला. तोही थोडा घोटाळला. त्यालाही काहीतरी वाटू लागले होते खास.

''रडता का तुम्ही ?'' त्याने विचारले.

ती जास्तच रडू लागली. तिने आपला डावा हात पुढे केला आणि विचारले, ओळखतोस का ही अक्षरे ?'' मंगलने ती दोन अक्षरे वाचली...... 'उमा'

आई म्हणून त्याने तिला एकदम मिठी मारली.

''बाळ.. मंगल,'' अश्रुपूर्ण नेत्रांनी ती त्याला अभिषेक घालीत होती.

खाली कसली गडबड चालू आहे हे पाहण्यासाठी अस्मत खाली आली. तिने तो सारा प्रकार पाहिला मात्र....

''आईऽऽऽ...'' ती एकदम ओरडली.

मंगल आणि आईनेही मागे वळून बघितले.

''शोभा !'' मंगल अस्मतच्या पाया पडायला थांबला. ''मी चुकलो. भगिनीशी प्रेम करताना माझा देह तेंव्हाच का नष्ट झाला नाही?........'' तो बरळत चालला होता.

अस्मत भांबावली होती. याचा तिला काही उलगडा होईना. ...मंगल बरळतच होता.

''शोभा..... मला क्षमा कर....''

इतक्यात मागाहून उघड्या दरवाज्यातून एक स्त्री थांबत थांबत आत आली. तिने वरील शब्द ऐकले. ती एकदम ओरडली,

''मंगलऽऽऽ...''

मंगलने चमकून मागे पाहिले.

''रत्नाऽऽऽ ....''

''मी सौ. रत्ना दिवेकर होते, पण कु. शोभाच आहे. मंगल, तुझी बहीण शोभा ती मीच.''

मंगल वेड्यासारखा अस्मतकडे आणि रत्नाकडे आळीपाळीने पाहात होता. आई अगदी भारावून गेली होती.... ती एकदम पुन्हा मंगलकडे धावत गेली.

''मंगल, ही शोभा नाही.... अस्मतकडे बोट दाखवून ती म्हणाली. कराचीत शोभाची नि माझीही चुकामूक झाली. मला तिथे बळजबरीने मुस्लिम धर्म स्वीकारावा लागला. काही दिवसाने मी काराचीतून पलायन करण्याचे ठरविले. त्या वेळी धामधुमीत सापडलेली पोरकी पोर आहे ही. तिचेही जीवन त्या वेळी धोक्यात होते. मी हिला बरोबर आणले. तिला लहानाची नुसती मोठी केली.''

अस्मत आईकडे पाहू लागली.

मंगल रत्नाकडे पाहू लागला...

''मंगल, पाहतोस काय ? ही बघ पटते का खूण तुला ?'' असे म्हणून रत्नाने आपल्या अंगठीचा कप्पा उघडला.

''हीच का ती काराचीतील शेवटची दिलेली ओवाळणी ?'' मंगलने तो फोटो पाहिला. त्याला कराचीतील ती शेवटची भाऊबीज आठवली. त्याच वेळी या फोटोसह ही अंगठी आपण शोभला ओवाळणी घातली होती हेही त्याला आठवले.

''शोभाऽऽऽ....'' त्याचा कंठ दाटून आला. त्याने तिचे पाय धरले. शोभा, मला क्षमा कर.

''उठ, मंगलदादा, उठ.''

आई तिच्याकडेही पाहू लागली होती. रत्नाही तिच्याकडे पाहात होती. आईने तिचा डावा दंड धरला आणि तिच्या ब्लाऊजची बाही जरा वर केली. तेथे एक तीळ होता. तो पाहताच तिने तिला घट्ट पोटाशी धरले.

''शोभाऽऽ बाळ, कुठे होतीस इतका काळ ?'' ती रडू लागली.

इतक्यात कुंदा तेथे आली. तिलाही साधारण या प्रसंगाची कल्पना होती. तिने चटकन शेजारून कुठूनतरी ओवाळणीचे ताट आणून शोभाचे हाती दिले. शोभाने मंगलला भाऊबीजेचा एक मंगल तिलक लावला आणि त्याला ओवाळले.

''दादा, ओवाळणी.....'' तिने ओवाळणीचे ताट त्याच्यासमोर धरत विचारले.

दोन अश्रुबिंदू ताटात ठिपकले.

इतका वेळ स्तब्धतेने पाहणारी अस्मत एकदम ओरडली,

''हे काय चाललंय सारं ?''

''हे काय चाललंय सांगू ?'' असे म्हणत हसत हसत कुंदा तिच्याकडे गेली आणि तिला खांद्याला धरून पुढे आणले आणि मंगलच्या पुढे उभे केले. अस्मत लाजली. ती खाली पाहू लागली.....

अस्मतची हनुवटी धरून कुंदाने तिची मान वर केली आणि हसऱ्या डोळ्यांनी तिच्याकडे ती पाहू लागली. अस्मत अधिकच लाजली.....

रस्त्यावरून चार चार पोलिसांच्या पहाऱ्यातून कमलाकर आणि केशव चालले होते.

आईच्या मिठीतून अस्मतकडे आणि मंगलकडे पाहता पाहताच शोभाने विचारले,

''ही कोण ?''

''वहिनी.'' असे हसत हसत उत्तर देत कुंदाने अस्मतचा हात मंगलच्या हाती दिला......

दोन हातांचे मिलन.......

दोन मनांचे मिलन......

बंधुभगिनीचे मिलन.......

मातापुत्रांचे मिलन.......

**सारेच पुनर्मिलन !!!**

